नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत


अनुक्रमणिका



अनुक्रमणिका







युगवाणी

पंधे गुरुजींबद्दल

'युगवाणी'च्या ह्या अंकाचे मुखपृष्ठ पंधे गुरुजींच्या एका कलाकृतीचे आहे.

श्री. मुकुंद श्रीकृष्ण पंधे हे पंधे गुरुजींचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म १९०२ साली झाला. तर मृत्यू १८ फेब्रुवारी १९९२ रोजी झाला.

पंधे गुरुजी चित्रकार, शिल्पकार म्हणून प्रसिद्ध आहेत.

पंधे गुरुजी विचाराने मानवतावादी होते. कृतीने गांधीवादी होते. स्वातंत्र्य सेनानी होते. जीवनाचे आदर्श सप्तललितकलांच्या माध्यमातून व्यक्त झाले पाहिजेत या विचारांचे होते.

१९२१ साली असहकारिता चळवळीत गांधीजींच्या आदेशांवरून अनेक तरुणांप्रमाणेच पंधे गुरुजींनीही सरकारप्रणित शाळाकॉलेजांवर बहिष्कार टाकला. स्वातंत्र्य संग्रामात उडी घेऊन 'टिळक राष्ट्रीय विद्यालया'ची स्थापना खामगाव येथे केली.

'टिळक राष्ट्रीय विद्यालय' 'पंधे गुरुजींची शाळा' या नावाने ओळखले जाते. 'खास शाळा' म्हणून सरकारने तिला मान्यता दिली आहे. या विद्यालयात इतर शाळांप्रमाणे विद्यापीठे व सरकार यांनी आखून दिलेल्या शिक्षणक्रमांचे व परीक्षांचे बंधन मान्य केलेले नाही. 'शाळांमधून शिकून बाहेर पडणारे विद्यार्थी कोणत्यातरी नोकरीस पात्र व्हावेत' ही पायाभूत कल्पनाच पंधे गुरुजींना मान्य नव्हती. त्यांच्या कलाशिक्षणात सौंदर्य आणि अध्यात्म, विश्वचेतना, राष्ट्रवाद यांचा संगम दिसतो.



चित्रकला, मूर्तीकला, संगीत, नृत्य, अभिनय व इतर कलोपासनांच्या जोडीला व्यवसायाभिमुख शिक्षणावरही त्यांनी भर दिला व सर्वांगीण अभ्यासक्रम आखला. दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या संस्थेतून शिक्षण पूर्ण केले आहे.

शिक्षणातली स्वावलंबनाची सांगड त्यांनी प्रयोगाद्वारे सिद्ध करून दाखवली. टिळक राष्ट्रीय विद्यालयातील कलादालन समृद्ध आहे. गुरुजी म्हणत "आजच्या शिक्षणातून निघालेले पदवीधर हे भावनात्मक शिक्षणापासून वंचित असलेले अशिक्षितच आहेत."

खादी ग्रामोद्योग मंडळ, चरखा संघ, राष्ट्रभाषा प्रचार समिती, स्वातंत्र्य सैनिक संघ अशा अनेक संस्थांशी संलग्न असलेले गुरुजी रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी, विनोबा यांच्या कार्याशी समानधर्मी आहेत.

कलोपासनेचे स्वरूप सांगताना ते म्हणतात, "आजकला व भोग यांचे एक समीकरण बनले आहे. आपल्या देशात प्राचीन काळापासून योगमार्गी कलाकार व कलोपासक यांची परंपरा आहे. गात-गात नृत्य करणारी भक्त मीरा आणि नृत्य करीत करीत गाणारी भक्त मीरा. गात असूनही ती गायिका नाही आणि नृत्य करीत असूनही नर्तकी नाही. ती देहभान विसरलेली, देहातीत अवस्थेतली योगिनी आहे. इंद्रियजन्य सुखाचा लवलेशही जेथे नसतो तोच कलेद्वारा मिळणारा यथार्थ आनंद आहे. यालाच ब्रह्मानंदसहोदर म्हटले आहे.

भोगमार्गी कलाकार यापासून पूर्णपणे वंचित असतो."

रेषेवर विलक्षण प्रभुत्व असलेल्या पंधे गुरुजींनी चित्रकलेत वास्तववादी चित्रशैलीला आपलसं केलं होतं. चित्रकलेच्या षडांगावर एकात्मिक भर देत त्यांनी आपली चित्रकला विकसित करून एका वेगळ्या उंचीवर नेली. शिल्पकलेतही त्यांनी सिमेंट, ब्राँझ इत्यादी सगळी माध्यमे लयबद्धतेनं हाताळून आगळी शिल्पनिर्मिती केली.

'युगवाणीच्या वाचकांकरिता पंधे गुरुजींचे हे स्मरण वैदर्भिय कलोपासनेतील आगळेपण जाणवून देणारे ठरावे.

वर्ष ५७ वे अंक दुसरा

ऑक्टोबर/नोव्हेंबर/डिसेंबर २००६

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी-कवठेकर

सहसंपादक प्रफुल्ल शिलेदार

अनुक्रमणिका

मुखपृष्ठ
पंधे गुरुजी, खामगाव

छायाचित्रण सहयोग
श्री. चंद्रकान्त चन्ने

अंक, मुखपृष्ठ मांडणी व छायाचित्र
विवेक रानडे

रेखाटने
शैला सायनेकर

अक्षरजुळणी व मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली, नागपूर

मूल्य चाळीस रुपये

वार्षिक वर्गणी शंभर रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी ०७१२-२५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४५०५
दूरध्वनी ०७२४-२४५०१८५
भ्रमणध्वनी ९८५०७४२८८१

।। संपादकीय ।।

आज मराठी मुलुखात अस्वस्थता आहे आणि अशांती आहे. ती वातावरणात आहे आणि मनामनात आहे. सर्वच क्षेत्रांच्या भवितव्याविषयी चिंता वाटत आहे. व्यक्तिगत जीवनात आणि सामाजिक पातळीवर हिंसेचा उद्रेक होतो आहे. त्यासाठी कोणतेही निमित्त, कोणतेही कारण पुरते. व्यापक हिताच्या नावाखाली आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्टया दुबळ्या समूहाचा गळा कापला जात आहे. अनेक सुशिक्षित म्हणवणारेही गटा-तटाचाच विचार करतात. शेतकऱ्यांचे प्रश्न फक्त शेतकऱ्यांचे. स्त्रियांचे प्रश्न फक्त स्त्रियांचे. आदिवासींचे प्रश्न फक्त आदिवासींचे. बेकारांचे प्रश्न फक्त बेकारांचे. प्रश्न असा आहे की हे सर्व प्रश्न लेखकाला, स्वतःचे म्हणजे लेखकाचे प्रश्न वाटतात का ? हे सर्व आणि असे आणखी अनेक प्रश्न हे एका महाप्रश्नाचेच सजीव वळवळणारे अवयव आहेत असे असे त्याला वाटते का ? त्याची 'पापणी' जागी आहे काय ? मधूनच असे होते की एखादा लेखक घाईघाईत एखादा प्रश्न हाती घेतो, त्याची ढोबळ कारणे सांगतो, सोपी सोडवणूक करतो, एखाद्या व्यक्तीला किंवा व्यवस्थेच्या एखाद्या घटकाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करून मोकळा होतो. अशा लेखनाला चटकन् प्रसिद्धी मिळते. पण जी परिस्थिती आज आपण पाहतो आहोत तिच्या या अवस्थेची तयारी अनेक वर्षांपासून होत असते. काही शक्ती जाणीवपूर्वक तसे कार्य करीत असतात. ज्या, प्रगतीच्या निदर्शक म्हणून आज गोष्टी दाखविल्या जात आहेत, त्यातून भयसूचक इशारेही मिळत आहेत. आपली प्रतिभा प्रज्ञा आणि श्रम पणाला लावून या स्थितीची मुळे शोधणाऱ्या, तळ गाठणाऱ्या आणि नेटाने मांडणी करणाऱ्या लेखकांची मराठी विश्वाला गरज आहे. काही मोजके लेखक हे कार्य आज करीत आहेत. त्यांना अधिक बळ लाभो.

- नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

अ। नु। क्र। म

  साक्षात / कविता महाजन / २५

॥ वाचनसंस्कृती ॥

डॉ. सुधीर रसाळ

१

वाचन संस्कृतीची मीमांसा करण्यापूर्वी आपण ज्ञान व वाङ्मय यांची संस्कृती आणि वाचनसंस्कृती यासंबंधीच्या आपल्या संकल्पना स्पष्ट करून घ्यायला हव्या. ज्ञान आणि वाङ्मय यांची संस्कृती म्हणजे कुठल्याही भाषिक समाजातील ज्ञान आणि वाङ्मय यांच्या निर्मितीत सहभागी होणाऱ्या व्यक्ती व संस्था, तसेच त्यांची कार्ये आणि या सर्वांचे नियंत्रण करणारी मूल्ये, यांची प्रस्थापित झालेली आणि गतिमान व परिवर्तनक्षम असलेली व्यवस्था. वाचनसंस्कृती म्हणजे कुठल्याही भाषिक समाजातील वाचक, त्याच्या वाचनाच्या गरजा व उपलब्ध असलेली वाचनसामग्री, तिच्याबद्दलच्या त्याच्या अपेक्षा आणि त्याच्या वाचनाची क्रिया घडवून आणण्यात मदतनीस होणाऱ्या संस्था, तसेच या सर्वांचे नियंत्रण करणारी मूल्ये, यांची प्रस्थापित झालेली आणि गतिमान व परिवर्तनक्षम असलेली व्यवस्था. वाचनसंस्कृती म्हणजे कुठल्याही भाषिक समाजातील वाचक, त्याच्या वाचनाच्या गरजा व उपलब्ध असलेली वाचनसामग्री, तिच्याबद्दलच्या त्याच्या अपेक्षा आणि त्याच्या वाचनाची क्रिया घडवून आणण्यात मदतनीस होणाऱ्या संस्था, तसेच या सर्वांचे नियंत्रण करणारी मूल्ये, यांची प्रस्थापित झालेली आणि गतिमान व परिवर्तनक्षम असलेली व्यवस्था. ज्या भाषिक समाजात वाचन करणे ही आपली नित्याची गरज आहे, असे वाटणाऱ्या व्यक्तींची भरपूर संख्या असते, त्या समाजाला वाचनसंस्कृती आहे असे समजले पाहिजे वाचनसंस्कृती असलेल्या समाजाच्या मनोरंजनाच्या, कलास्वादाच्या तसेच ज्ञानप्राप्तीच्या गरजा भागविण्यात वाचनाचा प्रमुख भाग असतो. ज्या समाजाला वाचनसंस्कृती असते त्या समाजाच्या जडणघडणीत, समाजात वेळोवेळी होणाऱ्या परिवर्तनांत, जीवनमूल्यांच्या प्रस्थापनेत, तसेच समाजातील व्यक्तींची संवेदनशीलता किंवा मनोभूमिका तयार करण्यात, ग्रंथवाचनातून मिळणाऱ्या प्रेरणेचा मोठा वाटा असतो. कुठल्याही भाषिक समाजाची वाचनसंस्कृती ही त्या भाषिक समाजाच्या ज्ञानसंस्कृतीचा आणि वाङ्मयीन संस्कृतीचा भाग असते. ज्या भाषिक समाजात ज्ञानविषयक ग्रंथांना आणि वाङ्मयाला संख्येने भरपूर असा वाचकवर्ग लाभलेला असतो त्या समाजात ज्ञान व वाङ्मय यांची निर्मितीही विपुल प्रमाणात होत असते. तसेच ज्या समाजात ज्ञान व वाङ्मय यांची विपुल निर्मिती होत असते त्या समाजात ग्रंथवाचनही वैपुल्याने होत असते. याचा अर्थ असा की वाचनसंस्कृती आणि ज्ञान व वाङ्मय यांची निर्मिती यांचे आंतरिक नाते असून त्या एकमेकींचे नियंत्रण करतात. ज्या समाजात उपर्युक्त गोष्टी अल्प प्रमाणात घडतात किंवा अल्प प्रमाणात असतात त्या समाजात वाचनसंस्कृतीचे अस्तित्व क्षीण स्वरूपात असते.

ज्ञान व वाङ्मय यांच्या संस्कृतीत मुद्रणाच्या

अनुक्रमणिका

तंत्राचा प्रवेश झाल्यावर वाचनसंस्कृती अस्तित्वात आली. वस्तुतः मानवाला ज्यावेळी लेखनतंत्र अवगत झाले त्याचवेळी त्याच्या वाचनास प्रारंभ झाला. परंतु वाचनक्रियेचा प्रारंभ होताच वाचनसंस्कृती अस्तित्वात आली असे मात्र म्हणता येत नाही. याचे कारण मुद्रणतंत्र येण्याआधीच्या काळात, म्हणजे मध्ययुगात, वाचनाऐवजी ग्रंथाचे श्रवणच अधिक प्रमाणात होत होते. मुद्रणतंत्राच्या आगमनपूर्वीच्या या काळाला आपण श्रवणसंस्कृतीचा काळ म्हणू. या काळात प्रामुख्याने धर्मसंलग्न ग्रंथरचना होत होती. परमेश्वराचे नामसंकीर्तन करणे पुण्यप्रद मानले जात होते. पुण्यप्राप्तीसाठी ज्या भक्तिमार्गाचा अवलंब सामान्य माणूस करीत होता त्यात देवाच्या नावाचा जप करणे, त्याचे गुणगान गाणे, त्याच्या प्राप्तीची असोशी व्यक्त करणे, त्याच्या चरित्राचे श्रवण करणे या गोष्टींचा समावेश होता. या काळातील कवी प्रामुख्याने याच गोष्टी आपल्या काव्यातून अभिव्यक्त करीत होते. ललित वाङ्मयाची हीच सीमा होती. थोडक्यात, या काळात लौकिक जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या धर्मनिरपेक्ष वाङ्मयाची निर्मिती नगण्य होती. एकतर कवी आपले काव्य स्वतः लिहून काढीत किंवा त्यांचे शिष्य ते लिहून घेत. अशा प्रकारे निर्माण होणाऱ्या काव्याच्या हस्तलिखित प्रती तयार करणारे व्यावसायिक त्याच्या प्रती तयार करून गावोगाव जाऊन विकीत असत. काव्याच्या हस्तलिखित प्रती तयार करणे हे कष्टाचे आणि वेळ घेणारे काम असे. त्यामुळे या प्रतींची किंमतही जबरदस्त असे. त्या विकत घेणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे असे. गावातील धनिक या प्रती हौसेने घेऊन त्यांचा संग्रह करीत. ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी असे, असे कथाकीर्तन करणारे हरिदास आणि पुराण सांगणारे पुराणिक आपल्या मालकीचा हस्तलिखितसंग्रह बाळगीत. ग्रंथसंग्रह करणाऱ्या धनिकांमध्ये वाचन करणारे फार थोडे असत. गावात होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमातील ग्रंथप्रवचनासाठी, पारायणासाठी किंवा पोथी लावण्यासाठी हे धनिक आपल्या जवळचे हस्तलिखित ग्रंथ पुराणिकांना उपलब्ध करून देत. खरे म्हणजे याच कामासाठी धनिक ग्रंथसंग्रह करीत. गावात चातुर्मासात, विशेषतः श्रावणात, पुराणिक धार्मिक ग्रंथांचे सार्वजनिक वाचन करीत आणि त्यावर आपले स्वतःचे निरूपण करीत. किंवा 'पांडवप्रताप' 'हरिविजय' यांसारख्या आख्यानपर पोथ्या लावल्या जात. त्या ऐकण्यासाठी गावातील लोक देवळात अगर मठात जमत. या पद्धतीत वाचणारा एक आणि ऐकणारे अनेक असत. या प्रसंगी वाचणाराही स्वतःसाठी नव्हे तर श्रोत्यांसाठी वाचन करीत असे. आपल्या देवतेच्या उपासनेसाठी एखादा आपल्या घरी एखाद्या धार्मिक ग्रंथाचे पारायण करी. यावेळी होणारे त्याचे ग्रंथवाचन जरी वैयक्तिक असले तरी ते ग्रंथातील आशय समजून घेण्यासाठीच केले जाई, असे म्हणता येत नाही. ते बहुतेक यांत्रिक असे. कारण पोथीतील आशय समजण्याला नव्हे तर ठरवलेल्या काळात पोथीचे वाचन संपवण्याला महत्त्व असे. आजही छोट्यामोठ्या गावात आणि शहरात पारायणे, प्रवचने होत असतात.

अभंग-पदे ही स्फुट काव्यरचना गायनासाठी असल्यामुळे या प्रकारात वाचनाचा प्रश्नच नव्हता. गायनासाठी पाठांतर असल्यामुळे अक्षर ओळख असलेला एखादा गानकुशल उपासक अभंगाच्या हस्तलिखित गाथेतून किंवा पदसंग्रहातून अभंग-पदे वारंवार वाचून ती पाठ करीत असे. भजनीमंडळात तो ती गात अगर म्हणत असे. भजनीमंडळातील साथीदारांना आणि श्रोत्यांना गायली जाणारी अभंग-पदे ऐकून ऐकून पाठ होऊन जात. देवतांच्या उत्सवप्रसंगी समूहाच्या उपस्थितीत अभंग-पदे म्हटली अगर गायली जात. अशा प्रसंगीही श्रोत्यांना ती पाठ होऊन जात असत. वैयक्तिक उपासनेत प्रातःकाळी आणि सायंकाळी, पाठ केलेले हरिपाठाचे अभंग, भूपाळ्या, पदे आणि पूजाविधीमध्ये आरत्या पारंपरिक चालींवर म्हटल्या अगर गायल्या जात. हरिदास हा या स्फुटरचनांचा आणखी एक वाचक होता. तोही ग्रंथसंग्राहक असे कीर्तनात उपयोजिण्यासाठी तो अभंग-पदे, विशेषतः पदे, मुखोद्गत करीत असे. कीर्तनाच्या श्रोत्यांना ती अनेक वेळा ऐकून पाठ होऊन जात. मध्ययुगीन

वाङ्मयीन संस्कृतीत श्रोत्यांपर्यंत वाङ्मय पोचविण्याचे कार्य कथेकरी, कीर्तनकार, पुराणिक, प्रवचनकार, गायक या व्यावसायिकांमार्फत होत होते. हे व्यवसाय म्हणजे मध्ययुगातील ग्रंथप्रसारणसंस्था होत.

मध्ययुगातील कवी आणि त्यांच्या वाङ्मयाचा श्रोता यांच्यातील संबंधांचा विचारही येथे केला पाहिजे. कारण श्रवणसंस्कृतीला रूप देण्यात ह्या संबंधांचा फार मोठा वाटा असतो. श्रोत्याने काय ऐकावे असे कवींना वाटत होते, आणि आपल्याला कवींनी त्याच्या वाङ्मयातून काय द्यावे यासंबंधी श्रोत्यांच्या काय अपेक्षा होत्या, याचा शोध घेता असे दिसते की या काळातील वाङ्मयावर कवींच्या इच्छेचाच वरचष्मा होता. श्रोत्यांनी काय ऐकावे हे या काळातील कवींनीच निश्चित केलेले आहे. ईश्वरभक्तीचा श्रोत्यांवर संस्कार करणे, त्याला धर्मज्ञान देणे, हे वाङ्मयाचे अंतिम उद्दिष्ट आहे, अशी कवींची भूमिका होती आणि त्यानुसार ते काव्यनिर्मिती करीत होते. वाङ्मयाचे हे उद्दिष्ट असते, हे या काळातील श्रोत्यांनाही मान्य होते आणि हे उद्दिष्ट साधण्यासाठी ते काव्याचे श्रवण करीत होते. म्हणजेच हे वाङ्मय पारलौकिक पातळीवरचे होते आणि या काळातल्या सामान्य माणसाच्या पारलौकिक उद्दिष्टांची गरजही ते भागवीत होते. या काव्यामागील आध्यात्मिक उद्दिष्टांशिवाय या काव्याकडून श्रोत्यांच्या आणखी काही अपेक्षा असणार, या काव्याने त्याच्या इतरही काही गरजा भागवाव्या असे त्याला वाटत असणार. अंगी विरक्ती बाणलेले मोजके संतकवी सोडले तर उर्वरित कवी आणि सामान्य माणसे यांना पारलौकिक जीवनाप्रमाणे लौकिक जीवनाबद्दलही आस्था होती. म्हणून या काव्यात आपल्या जीवनाचे चित्रही उमटावे अशी या काळातल्या श्रोत्यांची (आणि कवींचीही) एक अपेक्षा असली पाहिजे. वाङ्मयातून या लौकिक जीवनाचे, त्यातील भावभावनांचे दर्शनही घडावे, विशेषतः आपल्या श्रृंगारादी सुखदायक लौकिक भावनांचा प्रत्यय वाङ्मयातून घडावा, असे त्याला मनोमन वाटणे स्वाभाविक होते. या अपेक्षेच्या जोडीला काही श्रोते वाङ्मयाकडून स्वप्नरंजनाची, आपल्या अतृप्त इच्छांच्या तृप्तीची अपेक्षा बाळगीत असणार. काहीजण वाङ्मयाकडून कलानंदाचीही अपेक्षा करीत असणार. आध्यात्मिक उद्दिष्टासाठी जन्मलेल्या या वाङ्मयावर श्रोत्यांच्या या गरजांचा आणि अपेक्षांचा प्रभाव अल्प प्रमाणात आणि अप्रत्यक्षपणे पडल्याचे दिसून येते. कृष्ण-गोपींच्या श्रृंगारिक क्रीडांची वर्णने, यज्ञाच्या किंवा विवाहाच्या प्रसंगांत भोजनाचे वर्णन करीत असताना दिल्या जाणाऱ्या समकालीन खाद्यपदार्थांच्या याद्या किंवा नायिकेचे रूपवर्णन करीत असताना महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या दागदागिन्यांचे येणारे उल्लेख किंवा सामराजाच्या 'रुक्मिणीहरण' या आख्यानकाव्यात सासुरवासिनीने सासरी कसे वागावे या संबंधीचा समकालीन रीतींना धरून केला गेलेला उपदेश, एकनाथांनी आपल्या भारुडरचनेत लौकिक जीवनातील घटनाप्रसंग आणि व्यक्ती यांच्या वर्णनांतून घडवलेली आध्यात्मिक रूपके, ही सर्व याच प्रभावाची उदाहरणे आहेत. या काळातील सर्वच कवींनी समकालीन वास्तवाच्या सामग्रीतून अनेक प्रतिमा घडवल्या आहेत. तुकारामांनी समकालीन लौकिक जीवनातील अनेक विसंगतींचे आणि अपप्रवृत्तीचे प्रत्यक्ष दर्शन आपल्या काव्यातून घडवले आहे. त्यामुळे कमीअधिक प्रमाणात या वाङ्मयात आध्यातिमकतेबरोबरच लौकिक जीवनाचे आणि भावनांचे चित्रही उमटले आहे. याशिवाय आध्यात्मिक प्रेरणेतून जन्मलेल्या या काव्याने काही प्रमाणात श्रोत्यांचे स्वप्नरंजन केले, त्याच्या अतृप्त आणि सुप्त असलेल्या इच्छांचे काही प्रमाणात शमनही केले. ज्ञानेश्वर-तुकारामांनी भरपूर, तर काही कवींनी अल्पस्वल्प कलानंदही दिला. काव्याचे आकलन करताना श्रोत्याला (किंवा वाचकाला) हे काव्य आपल्या जीवनाशी संबंधित असल्याचे आश्वासन मिळणे आवश्यक असते. समकालीन वास्तवाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष निर्देश काव्यात आले की, ते आपले वाटू लागते. हे वाङ्मय श्रोत्यांसमोर सादर करताना कथेकरी, कीर्तनकार, पुराणिक आपल्या सादरीकरणात या काव्यातील आशयसूत्राला पूरक अशा लौकिक घटनाप्रसंगांचे वर्णन करून त्यात शृंगाराचे, विनोदाचे मनोरंजनपर रंग भरत असले पाहिजेत. आजही त्यांच्या

सादरीकरणात असे रंग भरले जातात. पेशवाईत लिहिल्या गेलेल्या लावण्यांमध्ये प्रामुख्याने लौकिक जीवनाचा धर्मनिरपेक्ष आशय आला. श्रोत्यांच्या वाङ्मयविषयक इच्छा-अपेक्षांचा उघड प्रभाव प्रथमच लावणी-वाङ्मयावर पडला. श्रोत्यांच्या शृंगारविषयक स्वप्नरंजनाच्या गरजा भागविण्याचे कार्य लावण्यांनी केले. आध्यात्मिक उद्दिष्टाला शृंगारविषयक स्वप्नरंजनाच्या गरजा भागविण्याचे कार्य लावण्यांनी केले. आध्यात्मिक उद्दिष्टाला शृंगारभावना मारक असते अशी भूमिका घेणाऱ्या समाजात लावणीवाङ्मयाला जरी प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकली नाही तरी त्याला छुपी लोकप्रियता मात्र मिळालेली होती.

मध्ययुगीन वाङ्मयावर जरी श्रोत्यांच्या वाङ्मयविषयक गरजांचा आणि अपेक्षांचा प्रत्यक्ष आणि सखोल प्रभाव पडलेला नसला तरी वाङ्मयाच्या आकलन-आस्वादासाठी वापरल्या जाणाऱ्या श्रवणमाध्यमाच्या प्रभावातून या काळातील वाङ्मयाचे रूप निश्चित झाले. श्रोत्यावर भावनिक परिणाम करण्याच्या उद्दिष्टाने शब्दांचा वापर कसा करावा हे ठरविण्यासाठी वक्तृत्वकला अस्तित्वात आली. वक्तृत्व हे श्रोत्यांवर भावनिक परिणाम साधण्यासाठी आणि त्याला विशिष्ट प्रकारची भूमिका घेऊन तिच्यातून कृती करण्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य करते. मध्ययुगातील वाङ्मय श्रोत्यांशी बोलत असल्यामुळे त्यांच्यावर भावनिक परिणाम करण्याची आवश्यकता कवींना वाटत होती. म्हणून या काळातील कवींनी वक्तृत्वशैलीचा अवलंब केला. वक्तृत्वात अलंकारांचा प्रभावी वापर केला जातो. भावनिक पातळीवर त्याचे आवाहन असते ऐकणाऱ्याला कृतिप्रवण करण्याचे कार्य नाट्य करते. श्रोत्याला धर्ममार्गावर चालण्याचे आवाहन नाट्यनिर्मितीतून तीव्रतेने आणि प्रभावीपणे केले जाते. ज्ञानेश्वरांपासून ते मोरोपंतांपर्यंत सातत्याने ही शैली वापरली गेली. ज्ञानेश्वरांसारख्या कवींनी ह्या वक्तृत्वशैलीला काव्यात्म बनवले. काहींचे लेखन मात्र केवळ वक्तृत्वपूर्णच राहिले. या काळातील बहुतांशी लेखन पद्यात केले गेले. कारण गद्यापेक्षा पद्य अधिक चिरेबंद असल्याने कवीच्या मूळ लेखनात तुलनेने प्रक्षेप कमी होत असत. श्रवणसंस्कृतीच्या या काळात मुद्रणतंत्र अस्तित्वात नसल्याने एका हस्तलिखित प्रतीवरून दुसरी प्रत करताना लेखनिक अनेक प्रकारच्या चुका करीत. त्यामुळे काव्याच्या मूळच्या संहितेत अनाकलनीय बदल होत. अनेकदा तोंडपाठ असलेल्या संहितेवरून हस्तलिखित प्रत तयार केले जाई. पाठांतराच्या प्रक्रियेत मूळच्या संहितेत अनेक बदल झालेले असत. त्यावरून प्रत तयार करताना या बदलांत वाढ होत असे. जर मूळचे लेखन गद्यात असते तर प्रती तयार करताना मूळच्या लेखनात मोठ्या प्रमाणात बदल झाले असते. मूळ लेखनाची शुद्धता राखण्यासाठी ते पद्यात रचणे कमी धोक्याचे होते. पद्याच्या वापरामुळे श्रोत्यांसमोर कवींचे लेखन जास्तीत जास्त शुद्ध स्वरूपात येत राहिले. स्फुट कवितेचा रचनाबंध हा श्रवणपद्धतीतूनच घडला. श्रवणाला अनुरूप आणि सोयीचा असा काव्याचा रचनाबंध मराठीच्या आधीपासून प्राचीन काळातच सिद्ध झाला होता. कारण मराठी भाषेच्या अस्तित्वापूर्वीपासून श्रवण हीच वाङ्मयाच्या आकलनाची पद्धती होती. म्हणूनच मध्ययुगीन मराठी कवितेच्या आधी संस्कृत पदरचनेत हा रचनाबंध आढळून येतो. श्रवणपद्धतीतून सिद्ध झालेल्या स्फुट कवितेच्या रचनाबंधाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. श्रोत्याचे श्रवण सुखदायक व्हावे आणि पाठांतरास सोपे जावे म्हणून गायनानुकूल अशा ओवी-अभंग या देशी छंदांचा आणि पारंपरिक मात्रावृत्तांचा वापर, गायनाला उपयुक्त असलेली आणि श्रवणाला आकर्षक बनविणारी लयबद्ध शब्दरचना, ही लय निर्माण करण्यासाठी यमकांची विविधतापूर्ण योजना, चार किंवा दोन ओळींचे कडवे आणि कडव्याच्या अखेरीस पुनरावृत्त होणारे ध्रुवपद, हे घटक स्फुट कवितेच्या रचनाबंधात आणले गेले.

मुद्रणाचे तंत्र अस्तित्वात आल्यावर आपल्या वाङ्मयीन संस्कृतीने श्रवणयुगातून वाचनयुगात प्रवेश केला. मुद्रणामुळे ग्रंथ सहजपणे वाचकांना उपलब्ध होऊ लागले. त्यांच्या किंमतीही सामान्य माणसांच्या आटोक्यात आल्या. ग्रंथप्रकाशनाचा व ग्रंथविक्रीचा

व्यवसाय अस्तित्वात आला. सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली. वृत्तपत्रे, मासिके सुरू झाली. त्यातून वैचारिक-ललित वाङ्मय प्रसिद्ध होऊ लागले. पुस्तके, मासिके आणि वृत्तपत्रे यांतून विविध प्रकारचा लिखित मजकूर वाचकाला सहजपणे उपलब्ध होऊ लागला. ग्रंथांचे स्वत:पुरते, वैयक्तिक वाचन करणे सोयीचे झाले. आपल्याला सवड होईल तेव्हा, आपल्या फावल्या वेळात वाचन करण्याची सोय प्राप्त झाली. त्यामुळे सामूहिक ग्रंथश्रवणाची गरज उरली नाही. दिवसभरातील विशिष्ट वेळी, विशिष्ट स्थळी फक्त धार्मिक ग्रंथांचे श्रवण केले जात असल्यामुळे ग्रंथश्रवणाला धार्मिक विधीचे स्वरूप प्राप्त झाले होते. आता वाचायचे केव्हा, हे वाचकाला ठरवता येऊ लागल्यामुळे वाचनाला धार्मिक विधीचे रूप राहिले नाही. नव्याने शिकवल्या जाणाऱ्या पाश्चात्य विद्या या धर्मनिरपेक्ष असल्यामुळे आणि त्यांच्या अध्ययनासाठी धर्मनिरपेक्ष ग्रंथ वाचावे लागत असल्यामुळे त्याला अशा वाचनाची सवय लागली आणि तो स्वाभाविकपणे पाठ्यपुस्तकांकडून धर्मनिरपेक्ष वाङ्मयाकडे वळाला. हा नवा वाचक धर्मनिरपेक्ष, लौकिक स्वरूपाच्या वाङ्मयाची मागणी करू लागला. या सर्व बदलांमुळे एकूण ग्रंथसंलग्न व्यवहारात वैयक्तिक वाचन करणाऱ्या वाचकाला केंद्रस्थान मिळाले. वाचकाला वाचायला हवे आहे आहे म्हणून त्याच्यासाठी ग्रंथांचे लेखन-प्रकाशन-विक्री आणि त्याच्यासाठीच ग्रंथालये, असा सर्व ग्रंथसंलग्न व्यवहारच नव्हे तर, सर्व वाङ्मयीन संस्कृती वाचककेंद्री झाली. मध्ययुगात लेखक आणि वाचक-श्रोता यांचा प्रत्यक्ष संपर्क किंवा संबंध नसे. आता आपले लेखन कोण, कितीजण आणि का वाचतात हे जाणून घेणे लेखकांना, प्रकाशकांना सहज शक्य झाले. त्यामुळे वाचकांच्या वाचनाच्या गरजा कोणत्या हे त्यांना ठरवता येऊ लागले. मध्ययुगात वाचकाच्या, कलानुभव, करमणूक, स्वप्नरंजन, अतृप्त इच्छांची तृप्ती, माहितीची प्राप्ती, धर्मज्ञान, वास्तवदर्शन, अशा अनेक गरजा आणि अपेक्षा आध्यात्मिक वाङ्मय पूर्ण करीत असे. आता वाचकांच्या वेगवेगळ्या गरजा भागवणारे आणि अपेक्षापूर्ती करणारे विविध प्रकारचे वाङ्मय लिहिले जाऊ लागले. केवळ कलानंद देणाऱ्या वाङ्मयापासून ते अतृप्त इच्छांची तृप्ती करणाऱ्या, अनेकदा अश्लील ठरणाऱ्या, वाङ्मयापर्यंत अनेक प्रकारचे वाङ्मय निर्माण होऊ लागले. प्रत्येक प्रकारच्या वाङ्मयाचा वाचकवर्ग तयार झाला. वाचकांच्या गरजांनुरूप वाङ्मयाचे विशेषीकरण झाले, असेही म्हणता येईल. वेगवेगळ्या उद्दिष्टांतून जरी लेखनकृती निर्माण होत असल्या तरी त्यांच्या सीमा काटेकोर नसतात. स्वप्नरंजनाची गरज भागवणाऱ्या एखाद्या लेखनकृतीतही कलाप्रत्यय देण्याचे सामर्थ्य असू शकते. त्यामुळे लेखनकृतींचा अमूक एक गट कलानंद देणारा आणि अमूक एक केवळ अतृप्त इच्छांची तृप्ती करणारा, अशी काटेकोर विभागणी वाङ्मयक्षेत्रात शक्य नसते. कलाप्रेरणेतून निर्माण होणाऱ्या वाङ्मयात आकृतिबंधाचे, वाङ्मयीन संकेतांचे विविध प्रयोग होत असतात. हे प्रयोग झिरपत झिरपत सर्व प्रकारच्या वाङ्मयात पसरतात. ही प्रक्रिया वाङ्मयक्षेत्रात सतत चालू असल्यामुळे निर्मितीची उद्दिष्टे लक्षात घेऊन त्यांची काटेकोर विभागणी करता येत नाही. तेव्हा वाङ्मयाचे उद्दिष्टानुसारी गट हे स्थूल अर्थानेच घ्यावे लागतात. थोडक्यात, वाङ्मयीन संस्कृती वाचककेंद्री होऊन तिच्यावर काही प्रमाणात वाचकवर्गाचे नियंत्रण प्रस्थापित झाले.

मुद्रणतंत्र उपलब्ध झाल्यानंतरच ग्रंथसमीक्षेला, म्हणजे ग्रंथपरीक्षणाला आणि ग्रंथविश्लेषणाला, प्रारंभ झाला. त्याआधी आपल्याकडे साहित्याचा फक्त सैद्धांतिक विचार होत होता. श्रवणसंस्कृतीमध्ये ग्रंथाच्या प्रत्यक्ष विश्लेषणाला आणि साधार मूल्यमापनाला वाव नसतो. ग्रंथसमीक्षेच्या आकलनास ग्रंथाची संहिता वाचकाला प्रत्यक्षात उपलब्ध असावी लागते. ग्रंथसंहितेच्या आधारेच तो समीक्षकाची मते पारखून घेऊ शकतो. मध्ययुगात ग्रंथसंहिता दुर्मिळ असल्यामुळे वाचकाला समीक्षेचे परीक्षण करणे अशक्य होते. ज्या काळात काव्यग्रंथ विकत घेणे अवघड होते त्या काळात समीक्षाग्रंथ विकत घेऊन आणि तो ज्या काव्याची समीक्षा करीत आहे त्या काव्याची संहिता मिळवून तिच्या आधारे समीक्षकाच्या

अनुक्रमणिका

मतांचे आकलन-परीक्षण करण्याचा खटाटोप करता येणे शक्य नव्हते. मुद्रणतंत्रामुळे आता हे सहज शक्य झाले. आता त्याला छापील ग्रंथ सहजपणे उपलब्ध होत असल्यामुळे समीक्षकाच्या मतांची योग्यायोग्यता त्याला ठरवता येऊ लागली. वाचकाला ग्रंथसमीक्षा मार्गदर्शक ठरत असल्यामुळे ती वाचण्याची गरजही त्याला वाटू लागली. जाणकार वाचक वाङ्मयकृतीबरोबरच तिच्यावरची परीक्षणे, समीक्षालेख असे समीक्षासाहित्यही वाचू लागला. त्यामुळे वाचनसंस्कृतीत ग्रंथसमीक्षेला महत्त्व प्राप्त झाले.

ग्रंथसमीक्षेमुळे लेखकवाचक यांच्या संबंधांना आणखी एक परिमाण प्राप्त झाले. समीक्षक हा ग्रंथाचे मूल्य ठरवणारा, त्याचा दर्जा निश्चित करणारा एक तज्ञ वाचक होय. या तज्ञ वाचकाच्या समीक्षेचा लेखकाच्या लेखनावर आणि वाचकाच्या वाचनाभिरुचीवर परिणाम होऊ लागला. वाचकाला लेखकाकडून काय हवे आहे आणि वाचकाने लेखकाकडून कशा प्रकारच्या लेखनाची अपेक्षा करावी, या दोन्ही दृष्टींनी काही भूमिका लेखकाला आणि वाचकाला समीक्षालेखनातून उपलब्ध होऊ लागल्या. या सर्व परिस्थितीमुळे वाङ्मयीन संस्कृतीतील प्रकाशक-ग्रंथविक्रेता-ग्रंथालये या संस्था आणि लेखक व समीक्षक यांचे लेखनव्यवहारही कमीअधिक प्रमाणात वाचकाभिमुख झाले. वाचकाला वाचनासाठी काय हवे, त्याच्या वाचनगरजा काय आहेत, याचा विचार अनेक लेखक करू लागले. त्यामुळेच वाचकाच्या वाचनगरजा भागवणाऱ्या अनेक प्रकारच्या वाङ्मयाची निर्मिती होऊ लागली. त्या बरोबरच, वाचकाला काय आवडते याचा मला विचार करण्याची गरज नाही; मला जे अभिव्यक्त करावेसे वाटते ते करणे मला महत्वाचे वाटते; वाचकाला वाटले तर तो माझे लेखन वाचील; अशी वाचकनिरपेक्ष भूमिका वाचनसंस्कृतीच्या अस्तित्वामुळे काही लेखकांना घेता येऊ लागली. त्यामुळे वाचकनिष्ठेऐवजी अनुभवनिष्ठा काही लेखकांना राखता आली. वाचनसंस्कृतीच्या अस्तित्वामुळे समीक्षकावर दोन भूमिका वठविण्याची जबाबदारी येऊन पडली. वाङ्मयाच्या स्वरूपाची तात्त्विक मीमांसा करणे आणि प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांचे परीक्षण-मूल्यमापन करून वाचकाला तो ग्रंथ वाचनयोग्य आहे की नाही हे सांगणे; अशा दोन भूमिका समीक्षकावर येऊन पडल्या.

श्रवणसंस्कृतीच्या काळात वाङ्मयाकलना-साठी वापरल्या जाणाऱ्या श्रवणमाध्यमाच्या गरजेतून जसे वाङ्मयाचे रूप, वाङ्मयकृतीचा रचनाबंध सिद्ध झाला तसेच वाचनसंस्कृती प्रस्थापित झाल्यावर पुन्हा वाङ्मयाचे रूप, वाङ्मयकृतीचा रचनाबंध बदलत गेला. हा बदल लक्षात घेण्यासाठी वाचनप्रक्रिया आणि श्रवणप्रक्रिया यांतील भेद लक्षात घ्यायला हवा. श्रवणामध्ये शब्द कानावर पडताच त्याचा जो तात्काळ अर्थ कळतो तेवढीच श्रोत्याच्या आकलनाची मर्यादा राहते. एकामागून एक कानावर पडणारे शब्द, वाक्ये किंवा काव्याच्या ओळी यांच्या तात्काळ होणाऱ्या आकलनातून जो अर्थबंध श्रोत्याला प्राप्त होईल, तेवढेच त्याचे वाङ्मयकृतीचे आकलन असते. त्यामुळे श्रवणातून श्रोत्याला कळणारा वाङ्मयकृतीचा अर्थ स्थूल, ढोबळच असणार. तो प्रामुख्याने वाच्यार्थाचा आणि वाच्यार्थाच्या निकट असणाऱ्या भावनिक अर्थाचा असणार वाङ्मयकृतीत वाच्यार्थाशी प्रत्यक्ष संबंधित नसलेले अर्थाचे अनेक बंध संघटित झालेले असतात. ते श्रवणमाध्यमाच्या कक्षेत येऊ शकत नाहीत. परंतु वाङ्मयकृतीत संघटित झालेले सर्व अर्थस्तर वाचनप्रक्रियेत वाचकाला उपलब्ध होऊ शकतात. श्रेष्ठ कवी, मग तो कुठल्याही काळातला असो, जेव्हा काव्यरचना करतो तेव्हा त्याच्या काव्यात अर्थांचे अनेक स्तर संघटित होत असतात. आपल्या निर्मितीत असे काही घडते आहे याची त्या कवीला जाणीव असेलच असे नाही. मध्ययुगात ज्ञानेश्वरांच्या आणि तुकारामांच्या काव्यात अशी अनेकस्तरीय रचना आढळते. परंतु त्या काळात ज्ञानेश्वरांची ओवी किंवा तुकारामांचा अभंग ऐकताना श्रोत्याला अर्थांचे सर्व स्तर उपलब्ध होणे शक्य नव्हते. श्रोत्याच्या कानावर शब्द पडताच त्यातला पृष्ठभागावरला स्तर त्याला कळणारा असतो. काव्यात एवढेच सांगितले गेले आहे अशी श्रोत्याची

समजूत होते. परंतु वाङ्मयकृती वाचून तिच्यावर निरूपण करणाऱ्या पुराणिकास, कीर्तनकारास आणि संहितेच्या आधारे स्फुट काव्ये पाठ करणाऱ्यास कदाचित तिच्यातील सुप्त, व्यंजित अर्थबंध कळू शकत असणार. त्या काळात कदाचित, एखादा रसिक पुराणिक आपल्या निरूपणातून व्यंजित होणारे अर्थवंधाचे स्तर श्रोत्यापर्यंत पोचवू शकत असेल पण हा योग दुर्मिळच असणार. श्रवणप्रक्रियेच्या या मर्यादांमुळे शब्दांची अनेकस्तरीय रचना करण्याचे आव्हान स्वीकारण्याची गरजही मध्ययुगातील बहुसंख्य कवींना वाटली नाही.

वाचनप्रक्रियेत वाचकाला श्रोत्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य असते. तो वाचनाची गती ठरवू शकतो. वाचन स्थगित करून त्याला हवे तेव्हा ते पुन्हा सुरू करू शकतो. वाचताना तो एखाद्या शब्दावर, वाक्यावर किंवा प्रतिमेवर रेंगाळू शकतो. वाचतावाचता तो पुढचे शब्द वाचण्याचे थांबवून पुन्हा आधीच्या शब्दांकडे, प्रतिमांकडे, वाक्यांकडे किंवा ओळींकडे वळू शकतो. पुढील शब्दांचे मागील शब्दांशी, वाक्यांशी किंवा प्रतिमांशी असलेले नाते तो शोधू शकतो. श्रोत्याला ह्या सोयी उपलब्ध नसतात. वाचकाला प्राप्त झालेल्या या सोयींमुळे लेखक-कवींना शब्दांच्या वाच्यार्थापलिकडच्या अर्थांकडे अधिक लक्ष देणे शक्य झाले. मध्ययुगातील कवींच्या रचनेत हे अर्थ कवींच्या नकळत, त्यांच्या प्रतिभेचा गुणधर्म म्हणून, संघटित होत असत. आता लेखक-कवी अनेकस्तरीय अर्थसंघटना बांधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करू लागले. कथा-कादंबरी आणि कविता या वाङ्मयप्रकारांत सूक्ष्म, व्यामिश्र आणि गूढ अनुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न होऊ लागला. अनेक लेखकांनी कथावाङ्मयात कथारचनेत पाळला जाणारा, आणि मुळात कथाश्रवणाला उपयुक्त असलेला कालानुक्रम आणि कार्यकारणभावानुक्रम मोडला; घटनाप्रसंग आणि व्यक्ती यांचे अमूर्तिकरण व विरूपीकरण केले. कथाकादंबरीचे कथन अधिक सूक्ष्म झाले. या कथनात शब्दांच्या अनेक अर्थच्छटांना महत्त्व आले त्यामुळे अर्थांचे अनेक स्तर कथाकादंबऱ्यांच्या कथनात संघटित होऊ लागले. अशा अर्थच्छटांची बांधणी करण्यासाठी व्याकरणनिष्ठ शब्दानुक्रम मोडणे, शब्दानुक्रमात प्रचलित असलेले तार्किक नाते तोडणे, संज्ञाप्रवाहात जो अतार्किक शब्दानुक्रम प्रस्थापित होत असतो त्याचा कथनात वापर करणे, असे अनेक प्रयोग केवळ वाचनप्रक्रियेमुळे शक्य झाले कथा सांगण्याऐवजी कथानकविरहित कथाकादंबरी लिहिणे केवळ वाचनसंस्कृती अस्तित्वात आल्यामुळे शक्य झाले. कथावाङ्मयात घटनाप्रसंगांचे चित्रण करून ते जणू वाचकाच्या डोळ्यांसमोर घडत असल्याचा आभास निर्माण करणे, हे कथाकादंबरीकाराचे नव्हे तर ते चित्रपट, दूरदर्शन यांसारख्या दृक्-माध्यमांचे कार्य आहे; कथालेखकाचे कार्य घटितांचे शब्दांतून चित्रण करणे हे नसून शब्दांतील विविध अर्थच्छटांनी बांधणी करीत घटितांना अर्थपूर्ण करणे हे आहे; याची जाणीव लेखकांना झाल्यामुळे कथावाङ्मयात चित्रणाऐवजी कथनाला महत्त्व मिळू लागले चित्रणपद्धतीचा वापर करणाऱ्या कथावाङ्मयाचे अधिक समर्थ सादरीकरण दूरदर्शनमालिकांमधून करता येते. कथनात मात्र शब्दांना, त्याच्यातील विविध अर्थछटांना महत्त्व असल्याने कथनप्रधान कादंबरीचे दूरदर्शन-मालिकांत सादरीकरण करणे अशक्य असते म्हणूनच अशा प्रकारच्या कथावाङ्मयाला दूरदर्शनमालिकांचा धोका संभवू शकत नाही.

कथन हे जसे कथावाङ्मयाचे केंद्र झाले तसे कवितेच्या रचनाबंधातही आमूलाग्र बदल झाले. श्रवणसंस्कृतीत श्रवणमाध्यमाच्या गरजेनुरूप कवितेचा रचनाबंध सिद्ध झाला होता. वाचनप्रक्रियेत या रचनाबंधाची अपरिहार्यता उरली नाही. गेयतेला अनुकूल असलेले छंद वापरले जाईनासे झाले. कविता मुक्तछंदात, मुक्तशैलीत लिहिली जाऊ लागली. कवितेत अंत्य यमके दिसेनाशी झाली. कवितेच्या कडव्यांतील ओळींची संख्या आशयानुसारी झाली. आधीच्या रचनाबंधात ओळीतील शब्दानुक्रम आणि शब्दसंख्या छंदानुसारी असे. आता चिरेबंद छंदांचा वापर थांबल्यामुळे ओळीतील शब्दानुक्रम आणि शब्दसंख्या आशयानुसारी झाली. आधी कवी

छंदसुखार्थ भाषेच्या व्याकरणाची मोडतोड करीत. आता अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाची मागणी म्हणून ती मोडली जाते. आधीच्या कवितेत आशयाचे स्पष्टीकरण देणारा भाग असे. प्रतिमांच्या रचनेमध्येही स्पष्टीकरणाचे घटक असत. उपमेमध्ये मुळातच स्पष्टीकरण असते. त्यामुळे मध्ययुगीन काव्यात उपमेची अधिक प्रमाणात योजना केलेली आढळते या काव्यात जेथे रूपके वापरली गेली तेथे रूपकांतील दोन्ही पदांचा स्पष्ट निर्देश केलेला दिसतो. उदाहरणार्थ 'कमलमुख' या रूपकात दोन्ही पदांचा निर्देश आहे. 'कमल' ही प्रतिमा कशासाठी वापरली आहे हे 'मुख' या पदामुळे स्पष्ट होते. कविता ऐकण्याच्या पद्धतीत 'कमल' ही प्रतिमा कळण्यासाठी असा स्पष्ट निर्देश आवश्यक होता. आता वाचनप्रक्रियेतून कवितेचे आकलन करताना कवितेत असा स्पष्ट निर्देश असण्याची गरज उरली नाही. स्त्रीचे वर्णन करताना केवळ 'कमल' एवढाच उल्लेख पुरेसा ठरू लागला. आधीच्या ओळींकडे परत जाऊन 'कमल' या प्रतिमेचा संदर्भ आणि यथार्थता वाचक शोधू शकत असल्यामुळे स्पष्टीकरण देण्याची गरज राहिली नाही. वाचकाला कविता समजावून सांगायची नाही; त्याने स्वतः ती जाणून घ्यायची आहे; वाचकाने कवितेपर्यंत पोचायचे आहे; अशी काव्यनिर्मात्यांनी भूमिका घेतली. कवितेत आणि प्रतिमेत स्पष्टीकरणे देऊन त्या आकलनसुलभ बनविण्याऐवजी अर्थांचे अनेक पदर संघटित करण्याच्या हेतूतून अनेक प्रतिमांच्या संयुगातून घडणारी मिश्र प्रतिमा किंवा संयुक्त प्रतिमा कवी आपल्या कवितेत योजू लागले. आपल्या कवितेत येणारा प्रत्येक शब्द अपरिहार्य असेल याची काळजी कवी घेऊ लागले. थोडक्यात वाचनसंस्कृतीमुळे कवितेचा रचनाबंध अधिकाधिक चिरेबंद होत गेला. या सर्व गोष्टींमुळे कविता दुर्बोध होऊ लागली. मराठीमध्ये वाचनसंस्कृतीचा प्रवेश झाल्यावरही दीर्घ काळ कविता श्रवणसंस्कृतीने सिद्ध केलेल्या रचनाबंधातच लिहिली जात होती; आणि वाचकांना या रचनाबंधाची सवयही झाली होती. त्यामुळे चिरेबंद रचनाबंधातली कविता कशी समजून घ्यायची, असा प्रश्न प्रारंभी त्याच्या समोर होता. या कवितेच्या आकलनाची सवय होईपर्यंत वाचकाला ही कविता दुर्बोध वाटत होती. खरे म्हणजे व्यामिश्र अनुभव परिपूर्णपणे व्यक्त करण्याच्या प्रयत्नातून ती दुर्बोध होत होती. शेवटी या प्रकारच्या रचनाबंधाच्या प्रयोगांनी अंतिम टोक गाठले. दुर्बोध लिहिण्याचेही साचे झाले काव्यविहीन लेखनही केवळ दुर्बोधरचनाबंधामुळे 'काव्य' म्हणून मिरवू लागले आणि असे नकली काव्य लिहिणाऱ्या कवींचा अकारण दबदबा निर्माण झाला.

वाङ्मयस्वादासाठी श्रवणाऐवजी वाचन रूढ झाल्यामुळे लेखक-कवींना वाचकापर्यंत आपली लेखन पोचविण्यासाठी काही करण्याची गरज उरली नाही आणि हळूहळू वाङ्मयाचा रचनाबंध चिरेबंद होत गेला, शेवटी त्यातून नकली वाङ्मय लिहिण्याची सोयही झाली. वाङ्मयाचा चिरेबंद रचनाबंधाकडे होणाऱ्या प्रवासाचा, वाचनसंस्कृतीच्या संदर्भात, एक अनिष्ट परिणामही झाला. लेखक-कवींनी वाचकाला उत्तरदायी असण्याचे नाकारल्यामुळे या चिरेबंद रचनाबंधात येत गेलेली न उकलता येणारी दुर्बोधता आणि त्यातून घडवले जाऊ लागलेले कलाविहीन, यांत्रिक वाङ्मय, यामुळे वाचक या वाङ्मयापासून दुरावत गेला. या प्रकारच्या वाङ्मयाला अत्यल्प वाचक उरला. असे लेखन करणाऱ्या लेखक-कवींचा आणि त्यांचे वाङ्मय केवळ आपल्यालाच कळते आहे, असा तोरा मिरवणाऱ्या वाचकवर्गाचा छोटासा गट अस्तित्वात आला. या लेखक-वाचक गटाचा एक धाक वाङ्मयीन संस्कृतीत प्रस्थापित झाला. हा अनिष्ट परिणाम जर सोडला तर या दिशेने वाङ्मयाने केलेल्या प्रवासात काही उत्तम वाङ्मयकृतीही निर्माण झाल्या हे नाकारता येत नाही. वाङ्मयाच्या विशेषतः कवितेचा रचनाबंध नंतर पुष्कळ सैल जरी झाला असला तरी आपल्या रचनेतून आपले अनुभवविश्व अचूकपणे, काटेकोरपणे व्यक्त करण्याची प्रवृत्ती टिकून राहिली. त्यामुळे आजचे बहुसंख्य वाङ्मय-विशेषतः कविता-आकलनसुलभ असूनही ते स्पष्टीकरणात्मक, पसरट स्वरूपाचे राहिले नाही.

श्रवणसंस्कृतीच्या काळातही पुष्कळसे काव्य

अनाकलनीय, दुर्बोध होते. परंतु वाचनसंस्कृतीच्या काळातल्या, म्हणजे आजच्या काव्यातील दुर्बोधतेहून तिचे स्वरूप भिन्न होते. मध्ययुगातील कवितेतील दुर्बोधता कूट स्वरूपाची होती. आजची कविता अनुभवाची सर्वांगीण अभिव्यक्ती करण्यासाठी भाषेचा अपरिचित वापर करीत असल्यामुळे निर्माण झालेली आहे. ज्ञानेश्वरांच्या कूट रचनेतील पुढील ओळी बघा -

चिंचेच्या पानीं एक शिवालय उभविलें ।
आधीं कळसु मग पाया रे ।
देव पुजों गेलों तंव देऊळ उडालें ।
प्रचिद्ध सद्‌गुरुराया रे ।

या ओळीत एक असंभाव्य, चमत्कृतिपूर्ण घटना सांगितली आहे तिचा आध्यात्मिक अर्थ श्रवणमाध्यमातून सहजासहजी कळणे अवघड आहे. असे असले तरी ही कविता ऐकत असताना श्रोता तिच्यातील चमत्कृतीचा आणि नाट्याचा आस्वाद घेऊ शकतो. या काळातील काव्यातील कूटरचना कळो न कळो तिच्यातील चमत्कृतिपूर्ण, अद्भुत नाट्य श्रोत्यांना आकर्षित करून घेऊ शकत होते. असे काव्य अनाकलनीय जरी असले तरी ते श्रवणीय होते. आजची दुर्बोधता वेगळ्या जातीची आहे. अरुण कोलटकरांच्या पुढील ओळी पाहा

चर्र विझलेला कावळा
माझ्या नशीबाच्या वळणावरती.
त्याच्या चोचीच्या चुलीत
नभनिवडुंग उगवलेला
शून्यावर उगारलेला स्तंभित डोळा.

येथे 'चर्र विझलेला कावळा' (कावळ्याच्या) चोचीच्या चुलीत', 'उगवलेला नभनिवडुंग' 'उगारलेला स्तंभित डोळा' ह्या प्रतिमांमधून कवितेतील 'मी'च्या नशिबाच्या एका वळणासंबंधीची अवस्था व्यक्त होत आहे. तसेच त्यांच्यातून काही सुप्त प्रतिमा व्यंजित होतात आणि प्रकट प्रतिमा व सुप्त प्रतिमा परस्परांशी नाते जोडीत मृत्यूच्या, किंबहुना संपूर्ण विनाशाच्या अनुभूतीचा प्रत्यय वाचकाला देतात. हा प्रत्यय वाचकाच्या मनात अस्वस्थ करून टाकणाऱ्या तीव्र भयाची भावना जागृत करतो. उदाहरणार्थ 'चर्र विझलेला' हे विशेषण कावळ्याचा मृत्यू सूचित करतो पण त्या बरोबरच जळणाऱ्या आणि पाणी टाकताच विझणाऱ्या कोळशाची सुप्त प्रतिमाही जागृत करतो. 'उगवलेला नभनिवडुंग' ही प्रतिमा निवडुंगाच्या काट्यांसारखी टोचणारी किरणे असलेल्या सूर्याची सुप्त प्रतिमा व्यंजित करते. वाचकाच्या मनात सूर्याची प्रतिमा जागृत होताच संपूर्ण आकाशाला मेलेल्या कावळ्याचे रूप प्राप्त होते. कारण त्याच्या 'चोचीच्या चुलीत' हा 'नभनिवडुंग उगवलेला' आहे. संपूर्ण आकाश हा जणू कावळा आणि सूर्योदयप्रसंगी तांबडी झालेली पूर्वदिशा म्हणजे मेलेल्या कावळ्याचे वासले गेल्यामुळे तांबडे दिसणारे तोंड, असे एक चित्र ही प्रतिमा वाचकाच्या मनात उभी करते. आकाशाचे रूप घेणारा कावळा 'चर्र विझलेला' असल्याने आकाश, म्हणजे संपूर्ण विश्व, मृत झाल्याची जाणीव प्रकट होते. मेलेले विश्व म्हणजे फक्त 'शून्य'च. आता नभनिवडुंगाला - म्हणजे सूर्याला 'उगारलेल्या स्तंभित डोळ्याचे' रूप प्राप्त होते. या प्रतिमेतील 'उगारलेला' या विशेषणामुळे विनाशासाठी उचललेल्या शस्त्राची सुप्त प्रतिमा वाचकाच्या मनात जागृत होते. मुळात जीवनदायी असलेला सूर्य सार्वत्रिक विनाश पाहून स्तंभित झाला आहे. आता त्याला उरलेले शून्यही नष्ट करायचे आहे. म्हणून तो उगारलेला डोळा बनला आहे. 'उगारलेला डोळा' या प्रतिमेमुळे सूर्यासाठी वापरलेली 'नभनिवडुंग' ही आधीची प्रतिमा अधिक अर्थपूर्ण होते. आता शून्यरूप बनलेल्या विश्वावर सूर्याच्या पोटातील अग्नीचे शस्त्र चालवले जाणार असल्याने मरून 'शून्य'रूप बनलेल्या विश्वाचेही दहन होणार आहे. हे वाचकाला कळताच 'चर्र विझलेला' ही आधीची प्रतिमा, जळून राख झालेल्या चितेतील हाडे गोळा करताना अजूनही जळत असलेले कोळसे पाणी टाकून विझविण्याची घटना वाचकाच्या मनात जागी करते. 'कावळा' या मृत्यू आणि मृत्यूत्तर विधींशी निगडित असलेल्या प्रतिमेशी हे सर्व जोडले जाते. या ओळींतील सर्व शब्दांच्या आणि प्रतिमांच्या आंतरप्रक्रियेतून वाचकाच्या मनात एक अतार्किक भयस्वप्न साकार होते येथे घडणाऱ्या

आकलनप्रक्रियेत वाचकाला पुढच्या शब्दांचे, प्रतिमांचे आकलन करताना सतत मागील शब्दांकडे, प्रतिमांकडे वळावे लागते. या कवितेचे आकलन करताना वाचकाला 'चर्र विझलेला कावळा' या प्रारंभीच्या प्रतिमेकडे वारंवार जावे लागते. या कवितेच्या संदर्भात घडणारी आकलनप्रक्रिया कविता ऐकण्याऐवजी ती वाचली जात असल्यामुळेच घडू शकणारी आहे. वाचनसंस्कृती प्रस्थापित झाल्यानंतर दीर्घ कालावधी लोटून गेल्यावर कवितेच्या रचनाबंधात ही परिवर्तने झाली. ही परिवर्तने वाचनसंस्कृतीच्या अस्तित्वामुळेच घडू शकली. परंतु एकूण ललित वाङ्मयाच्या रचनाबंधांत झालेल्या या परिवर्तनामागे केवळ वाचनसंस्कृती नाही. विज्ञानाच्या विकासाचा झपाटा, तंत्रविज्ञानाने बदलवून टाकलेले माणसाचे जीवन, मनोविज्ञानात झालेली प्रगती, अशी इतर काही कारणेही यामागे आहेत. परंतु या प्रकारच्या रचनाबंधाचे आकलन वाचनप्रक्रियेशिवाय शक्य होत नाही, ही गोष्टही तितकीच खरी आहे. म्हणूनच या परिवर्तनाच्या श्रेयात वाचनसंस्कृतीला वाटा द्यायला हवा.

वाङ्मयीन संस्कृतीच्या इतिहासात आतापर्यंत तीन प्रकारच्या रचनाबंधात ललित वाङ्मय निर्माण केले गेले. वाङ्मयकृतीतील शब्द ऐकताच किंवा वाचताच श्रोत्याच्या किंवा वाचकाच्या मनात जुळणारा वाच्यार्थाशी निगडित अशा अर्थांचा रचनाबंध, हा रचनाबंधाचा पहिला प्रकार होय. रचनाबंधाच्या दुसऱ्या प्रकारात पहिला रचनाबंध हा पायाभूत असतो आणि त्यातील शब्दांना लगडलेल्या वाच्यार्थाच्या पलीकडील अर्थपुंजांतून अर्थांचे अनेक रचनाबंध सुप्त स्वरूपात अस्तित्वात आलेले असतात. हा रचनाबंध अभिधामूलक लक्षणेसारखा असतो. श्रोत्याला पृष्ठभागावरच्या वाच्यार्थी रचनाबंधाचे तात्काळ आकलन होते. परंतु या रचनाबंधामागे दडलेल्या सुप्त रचनाबंधांच्या आकलनासाठी वाङ्मयकृतीचे वाचन आवश्यक असते. रचनाबंधाच्या तिसऱ्या प्रकारात भाषेचे विरूपीकरण, अपरिचितीकरण केले जाते. शब्दांची प्रचलित रूपे, त्यांचे व्याकरण मोडून टाकले जाते. नवे शब्द घडवले जातात. दोन असंबंधित, अनोख्या वस्तूंमध्ये साम्यविरोधात्मक नाते प्रस्थापित करून आकलनकठीण प्रतिमा घडवली जाते. अनेक प्रतिमा परस्परांत जिरवून त्यातून संयुक्त प्रतिमा घडवली जाते. या प्रकारच्या रचेनतून अर्थांचे अनेक स्तर परस्परांशी संलग्न केले जातात. हा रचनाबंध मोजक्या शब्दांतून अर्थांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढवतो. हा रचनाबंध अधिकार्थसमावेशनक्षम असतो. अरुण कोलटकरांच्या उपर्युक्त ओळी याच रचनाबंधात आहेत. हा तिसरा रचनाबंध जाणून घेण्यासाठी वाचन आवश्यक असते. या तीन रचनाबंधांपैकी पहिला रचनाबंध हा श्रवणसंस्कृतीशी संलग्न आहे. दुसरा रचनाबंध हा श्रवणसंस्कृतीत जसा प्रचलित होता तसाच तो वाचनसंस्कृतीतही रूढ आहे. तिसरा रचनाबंध मात्र केवळ वाचनसंस्कृतीतच वाचनप्रक्रियेसाठी अस्तित्वात आला आहे.

वाचनप्रक्रियेने उकलले जाणारे रचनाबंध अस्तित्वात आल्यावर श्रवणसंस्कृतीच्या काळात सिद्ध झालेला कवितेचा रचनाबंध बाद झाला, असा या विवेचनाचा अर्थ नाही. श्रवणप्रक्रियेला सुसंवादी असणाऱ्या वाङ्मयप्रकारांत आजही हा रचनाबंध आवश्यक असतो. त्यामुळेच तो आजही गीतांमध्ये टिकून आहे. याचे कारण गीत हे वाचण्यासाठी नव्हे तर ऐकण्यासाठी असते. अर्थातच गीताची संहिता वाचलीही जाऊ शकते. ज्या गीताला त्याच्या पृष्ठभागावर असलेल्या अर्थस्तरापलिकडे अनेक सुप्त अर्थस्तर असतात ते गीत वाचावेच लागते. कारण वाचल्यावाचून ह्या सुप्त अर्थस्तरांचे आकलन होणे अशक्य असते. आजही लघुकथा आणि कविता मोठ्या प्रमाणात ऐकल्या जातात. काव्यसादरीकरणासाठी निवडल्या जाणाऱ्या कविता पाहिल्यास त्या श्रवणसुलभ असल्याचे आढळून येईल. विंदा करंदीकर काव्यवाचनासाठी 'त्रिवेणी' 'मुक्त सुनीते' या किंवा यासारख्या कविता निवडणार नाहीत. वाचनासाठी ते 'माझ्या मना बन दगड' 'घेणाऱ्याने घेत जावे' 'घोंड्या न्हावी' या व यासारख्या कविता निवडतील. काव्यसादरीकरणात दिलीप चित्र्यांच्या कविता बसूच शकणार नाहीत.

आज लघुकथाही श्रोत्यांसमोर सादर केली जात असल्यामुळे तिच्यातही लघुकथेचा पारंपरिक रचनाबंध टिकून आहे. द. मा. मिरासदार, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर हे कथाकथनासाठी ज्या कथा निवडीत त्या कथांचा रचनाबंध पारंपरिकच आहे. गंगाधर गाडगीळांची मनोविश्लेषणपर कथा, कमल देसाई, दिलीप चित्रे, श्याम मनोहर, विलास सारंग या लेखकांच्या कथा ऐकण्याऐवजी वाचल्याच पाहिजेत. थोडक्यात, वाङ्मयाकलनासाठी श्रवण आणि वाचन या दोन प्रक्रिया वापरल्या जात असल्यामुळे या दोन प्रक्रियांच्या वैशिष्ट्यांतून आणि गरजेतून ललित वाङ्मयात भिन्न प्रकारचे तीन रचनाबंध अस्तित्वात आले. आजच्या आपल्या वाङ्मयीन संस्कृतीत हे तिन्ही रचनाबंध टिकून आहेत.

२

आता आपण ज्ञानक्षेत्रातील वाचनसंस्कृतीची मीमांसा करणार आहोत. येथे 'ज्ञानक्षेत्र' ही संज्ञा नैसर्गिक आणि सामाजिक विज्ञान, तसेच तत्त्वज्ञान, इतिहास आणि समाजातील नित्य-नैमित्तिक प्रश्नांवरील विचारांसाठी वापरली आहे. नैसर्गिक आणि सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करणाऱ्यांसाठी 'वैज्ञानिक' ह्या संशोधनाची मीमांसा करणाऱ्यांसाठी 'अभ्यासक' या संज्ञा वापरल्या आहेत. तत्त्वज्ञान, इतिहास आणि नित्य-नैमित्तिक सामाजिक प्रश्नांवर लेखन करणाऱ्यांसाठी अनुक्रमे 'तत्त्वज्ञ' 'इतिहासकार' आणि 'विचारवंत' या संज्ञा वापरल्या आहेत. ललित वाङ्मयाच्या क्षेत्रातील आणि ज्ञानक्षेत्रातील वाचनप्रक्रियांचे स्वरूप पूर्णतः भिन्न आहे; ही गोष्ट येथे आपण लक्षात घेतली पाहिजे. वाङ्मयाचे क्षेत्र जसे वाचककेंद्री असते तसे विज्ञान, तत्त्वज्ञान व इतिहास यांची ज्ञानक्षेत्रे असत नाहीत. त्या त्या क्षेत्रातील ज्ञानोपासक हेच या ज्ञानक्षेत्रांचे केंद्र असतात. त्यांची बांधिलकी वाचकांशी नव्हे तर ज्ञानाशी असते. त्यांचे निर्मितीकार्य आणि लेखन वाचकनिरपेक्ष असते. ज्ञानक्षेत्रात तीन प्रकारचे लेखन होत असते. त्यांपैकी एक लेखन केवळ संशोधनपर असते. वैज्ञानिक-संशोधक एखाद्या ज्ञानक्षेत्रात नवे संशोधन करून ते अक्षरबद्ध करतात. त्यांचे संशोधन निबंधरूपाने संशोधनपर नियतकालिकांत किंवा ग्रंथरूपात प्रसिद्ध होते. हे लेखन सामान्य वाचकासाठी नव्हे तर त्या क्षेत्रातील अभ्यासकांसाठी असते. या अभ्यासक-वाचकांच्या वाचनगरजा, त्यांच्या ज्ञाननिर्मात्याकडून अपेक्षा या गोष्टींचा येथे प्रश्नच उद्भवत नाही. अमूक एका संशोधकाचे संशोधन दुर्बोध आहे, अशा तक्रारीलाही येथे वाव नसतो. संशोधकाने आपले संशोधन साधार व तर्कशुद्ध पद्धतीने मांडावे, एवढीच अभ्यासक-वाचकाची अपेक्षा असते. ह्या संशोधनाचे आकलन करणे ही अभ्यासक-वाचकाची जबाबदारी असते. एखाद्या वैज्ञानिकाच्या मूलभूत संशोधनावर भाष्य करणारे, तसेच ज्ञानक्षेत्रातील विशिष्ट विषयावर झालेल्या एकूण संशोधनाची मांडणी करून त्यावर भाष्य करणारे लेखन हा ज्ञानक्षेत्रात होणाऱ्या लेखनाचा दुसरा प्रकार होय. या प्रकारचे लेखन तज्ज्ञ अभ्यासक करतात. ते संशोधकासारखे निर्मितीक्षम असावेत असा आग्रह नसतो. त्यांचे भाष्यपर लेखनही त्या ज्ञानक्षेत्रातील अभ्यासकांसाठीच असते. तिसऱ्या प्रकारचे लेखन हे सर्वसामान्य वाचकासाठी असते. या प्रकारच्या लेखनात ज्ञानक्षेत्रातील संशोधक, त्यांची संशोधनक्षेत्रे, त्यांच्या संशोधनाचे स्वरूप, त्याचे मानवजातीला होणारे फायदे अगर तोटे, हे आणि या स्वरूपाचे ज्ञानक्षेत्रातील प्रश्न सर्वसामान्य माणसाला कळतील अशा भाषेत समजावून सांगितले जातात. सामान्य माणसाला विज्ञान, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांच्या क्षेत्रांत काय घडत आहे यासंबंधी कुतूहल असते. आजच्या जीवनातील सर्वच क्षेत्रे विज्ञानाने व्यापून टाकली असल्याने आजच्या आधुनिक जगातील माणसाला विज्ञानाविषयी विशेष कुतूहल आहे. त्यामुळे या प्रकारच्या-विशेषतः नैसर्गिक विज्ञानासंबंधीच्या लेखनाला जगातील सामान्य माणसाकडून मोठी मागणी असते. याला आपला देश मात्र अपवाद मानावा लागेल.

ज्ञानक्षेत्रातील वाचनसंस्कृती आपल्या देशात

जवळपास अस्तित्वातच नाही असे जर म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. आपल्या देशात नैसर्गिक विज्ञानांच्या क्षेत्रात मूलगामी स्वरूपाचे संशोधन फारसे होत नाही. जे थोडेबहुत संशोधन होते ते भारतीय भाषांतून नव्हे तर ते इंग्रजीमधून होते. त्यामुळे संशोधनपर शोधनिबंध आणि ग्रंथ मराठीत अस्तित्वातच नाहीत. आपल्याकडे विज्ञानशाखेची ज्ञानभाषा फक्त इंग्रजी असल्याने सर्व स्तरांवरचे ज्ञानग्रंथ केवळ इंग्रजीतच उपलब्ध आहेत. म्हणून विज्ञानाच्या अभ्यासकांसाठी निर्माण होणाऱ्या भाष्यपर ग्रंथांच्या लेखनाबद्दल प्रश्नच निर्माण होत नाही. सामान्य माणसासाठी मराठीत विज्ञानावरची प्राथमिक स्वरूपाची परिचयपर पुस्तके अल्प प्रमाणात उपलब्ध असतात. परंतु त्याला फारसा वाचक मिळताना दिसत नाही. विज्ञानाची सुखदायक फळे जरी आपणांस बऱ्याच प्रमाणात मिळत असली तरी विज्ञान आपल्या जीवनाचा, आपल्या संस्कृतीचा अजूनही भाग बनला नाही. आपली वर्तमान संवेदनशीलता, आपली मूल्यसरणी, ह्यांच्या जडणघडणीत विज्ञानाचा वाटा नाही. विज्ञानाचे शिक्षण मातृभाषेतून होत नसल्यामुळे ते आपल्या माणसाचा भाग बनत नाही आणि आपल्या जगण्यातील समस्या सोडविण्याच्या प्रेरणेमधून आपल्या देशात विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रांत संशोधन होत नसल्यामुळे विज्ञान आपल्या जीवनाचा भाग होऊ शकले नाही. या दोन्ही गोष्टी झाल्याशिवाय विज्ञानक्षेत्रात वाचनसंस्कृती मूळ धरू शकणार नाही.

नैसर्गिक विज्ञानासारखीच परिस्थिती सामाजिक विज्ञानांचीही आहे. या क्षेत्रातही जे कमीअधिक संशोधन होते ते इंग्रजी भाषेत. काही विद्यापीठांत सामाजिक विज्ञानशाखेत ज्ञानार्जनाचे माध्यम भारतीय भाषा आहेत. त्यामुळे भारतीय भाषांत-निदान मराठीत तरी या शाखेतील विषयांवरची दुय्यम दर्जाची, गाईडवजा पाठ्यपुस्तके तयार होतात. परीक्षार्थी विद्यार्थी हा त्यांचा वाचक असतो. परीक्षा उत्तीर्ण होताच त्याचा या विषयाशी संबंध तुटतो. नंतरच्या जीवनात तो आपल्या अभ्यासविषयांवरच्या अद्ययावत ज्ञान देणाऱ्या ग्रंथांची मागणी करीत नाही. त्यामुळे सामाजिक विज्ञानांतील अभ्यासकांनी तयार केलेल्या भाष्यपर आणि माहितीपर ग्रंथांची मराठीत निर्मितीच होऊ शकत नाही. जी गोष्ट सामाजिक विज्ञानांची तीच तत्त्वज्ञानाची. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारे काही ग्रंथ आणि काही पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे सोडल्यास तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ग्रंथनिर्मिती झालेली नाही. भारतीय संस्कृतीतील प्रमाणके आणि मूल्यव्यवस्था ज्या भारतीय दर्शनांमधून घडली, त्यांवर काही परिचयपर ग्रंथ लिहिले गेले. भारतीय दर्शने हे तत्त्वज्ञानच नाही, अशी पाश्चात्त्यांची समजूत आपल्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांनी स्वीकारल्यामुळे त्यांचा अभ्यास करण्याबद्दल उदासीनता दिसून येते. मराठीतील इतिहाससंशोधनाचे चित्रही यापेक्षा फारसे भिन्न नाही. इतर ज्ञानशाखांच्या तुलनेत मराठीत इतिहाससंशोधन बऱ्याच प्रमाणात होते. परंतु महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासाच्या पलीकडे हे संशोधन जात नाही. विश्लेषणात्मक-भाष्यात्मक इतिहासलेखन करणारे इतिहासकार तर दुर्मिळच आहेत.

ज्ञानक्षेत्राशी संबंधित असे लेखनाचे आणखी एक क्षेत्र आहे. या क्षेत्रास आपण वैचारिक वाङ्मयाचे क्षेत्र म्हणू. समाजात वेळोवेळी नवनव्या समस्या निर्माण होत असतात. त्यांतील काही समस्या समाजाच्या अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या असतात. या समस्यांना कसे तोंड द्यावे हे समाजाला कळेनासे होते. समाजाचे राजकीय आणि आर्थिक नेतृत्व करणारे राज्यकर्ते, प्रशासक, हे अशा समस्यांच्या संबंधी चुकीचे निर्णय घेण्याचा संभव असतो. त्यामुळे अनेकदा समाजाचे भरून न येणारे नुकसान होऊ शकते. समाजातील प्रस्थापित असलेली काही मूल्ये, काही सामाजिक-सांस्कृतिक संस्था या समाजाच्या हिताच्या दृष्टीने निरुपयोगी झालेल्या असतात. त्यांऐवजी काही नवी मूल्ये, नव्या संस्था स्थापन करण्याची आवश्यकता असते. या सर्व गोष्टींवर चिंतन करणारा आणि त्यांवरील आपल्या लेखनातून समाजाला मार्गदर्शन करणारा विचारवंतांचा वर्ग समाजात असावा लागतो. हा वर्ग समाजात घडणाऱ्या

घडामोडींबद्दल जागरुक असतो. अमूक एका घटनेचे इष्टानिष्ट असे कोणते परिणाम होणार आहेत, याचा त्याला त्वरित अंदाज येत असतो. हे विचारवंत सामाजिक-नैसर्गिक विज्ञानांचे, तत्त्वज्ञानाचे आणि विचारप्रणालींचे तज्ज्ञ अभ्यासक असतीलच असे नाही; तरीही विविध ज्ञानशाखांशी त्यांचा परिचय असतो. त्यांपैकी काहींनी विशिष्ट विचारप्रणालीचा स्वीकार केलेला असतो. हे विचारवंत आपआपल्या तात्त्विक किंवा वैचारिक भूमिकांमधून सामाजिक घडामोडींचा अभ्यास करीत असतात. आपली मते बनवून ती समाजासमोर विचारार्थ मांडीत असतात. अशा विचारवंतांपैकी काही वैज्ञानिक आणि तत्त्वज्ञही असतात. एखाद्या सामाजिक घटनेबद्दल विचारवंतांत परस्परांच्या भूमिकांसंबंधी वाद होतात. विचारवंतांच्या भूमिकांचा, त्यांच्यातील वादांचा, समाजाच्या जडणघडणीवर परिणाम होतो. त्यांच्या विचारमंथनामुळे संस्कृती कालानुरूप परिवर्तनाची गती कायम राखू शकते. ज्या संस्कृतीत विचारवंतांचा वर्ग नसतो ती संस्कृती गतिशून्य बनते. हळूहळू तिची मूल्यव्यवस्था, तिच्या विविध संस्था निकामी होऊ लागतात.

मध्ययुगात महाराष्ट्रातील संतांनी आपल्या काव्याद्वारे विचारवंतांचे कार्य केले होते. एकोणिसाव्या शतकात विचारवंतांचे भरपूर पीक महाराष्ट्रात आलेले होते. विविध प्रकारच्या नियतकालिकांतून आणि ग्रंथांतून या विचारवंतांचे लेखन प्रसिद्ध होत होते. आपल्या मतप्रसारासाठी काही विचारवंत स्वतःची नियतकालिके काढीत होते. त्यातून विचारवंत - पत्रकारांची एक परंपरा महाराष्ट्रात रूढ झाली होती. या विचारवंतांत आणि पत्रकारांत अटीतटीचे वादविवाद झडत होते. या सर्व वैचारिक लेखनाला मोठा वाचकवर्ग लाभत होता. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गात झालेल्या अनेक सामाजिक बदलांना या विचारवंतांचे वैचारिक लेखन कारणीभूत होते.

महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा हळूहळू क्षीण होत गेली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक सुस्थितीसाठी आणि समाजपरिवर्तनासाठी वैचारिक मार्गदर्शन करण्याची गरज बौद्धिक क्षेत्रांत काम करणाऱ्यांना वाटेनाशी झाली. विविध ज्ञानशाखांत कार्य करणारे संशोधक-अभ्यासक जरी असले तरी समाजाच्या स्थितीगतीवर चिंतन करणारे, सामाजिक प्रश्नांचे स्वरूप जाणून घेऊन त्यावर तोडगा सुचविणारे विचारवंत आज दिसत नाहीत. आज विचारवंत-पत्रकारांची परंपरा संपुष्टात आलेली असून वृत्तपत्र चालविणे हा आर्थिक लाभासाठी करावयाचा धंदा बनला आहे; आणि हे मत वृत्तपत्रसृष्टीत आता प्रमाण मानले गेले आहे. पूर्वी वाचकांमध्ये संपादकांच्या वैचारिक भूमिकांबद्दल कुतूहल होते; काही वर्तमानपत्रे केवळ अग्रलेखासाठी वाचली जायची. त्यामुळे लोकांच्या राजकीय-सामाजिक भूमिकांवर वृत्तपत्रांच्या संपादकांच्या मतांचा प्रभाव होता. जनमताला आकार देण्याचे कार्य वृत्तपत्रे करीत होती. राज्यकर्त्यांवरही वृत्तपत्रांचा धाक होता. त्यामुळे जनहिताची कामे वेगाने होऊ शकत होती.

आता समाजहितार्थ केले जाणारे वैचारिक लेखन आणि संख्येने विपुल असलेला त्याचा वाचक भूतकाळात जमा झाले आहेत. वस्तुतः या प्रकारच्या लेखनाची प्रत्येक काळात गरज असते. आज तर अशी परिस्थिती आहे की, वैचारिक लेखन करणाऱ्या विचारवंतांची आणि त्याच्या वाचकांची बहुसंख्येने गरज आहे. कारण आज अनेक गंभीर सामाजिक-राजकीय प्रश्न उपस्थित झाले आहेत. दहशतवाद, आरक्षणावरून जातीजातींत वाढलेले तणाव, सातत्याने होणारे धार्मिक दंगे, मुक्त अर्थव्यवस्थास्वीकृतीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जागोजाग हिंसेचे सुरू असलेले थैमान, असे अनेक सामाजिक-राजकीय प्रश्न आज उभे आहेत. परंतु यांवर चर्चा करणारे, उपाय सुचविणारे, एका विचारवंताच्या भूमिकेबद्दल मतभेद प्रकट करून त्याच्याशी वाद करणारे विचारवंतच दिसत नाहीत. त्यामुळे आजच्या भ्रमित अवस्थेत समाजाला हवे असलेले मार्गदर्शन मिळू शकत नाही. आज महाराष्ट्रात वैचारिक वाङ्मय आणि त्याचा वाचकवर्ग या दोन्ही गोष्टी लुप्त झाल्या आहेत. थोडक्यात, मराठी भाषेत आधुनिक

ज्ञानांच्या क्षेत्रांत वाचनसंस्कृती अस्तित्वात आलेली नाही आणि सामाजिक विचारांच्या क्षेत्रातील पूर्वी असलेली विचारसंस्कृतीची परंपरा आज शिल्लक राहिली नाही.

३

ज्या भाषिक समाजामध्ये ललित वाङ्मयातील उत्तम वाङ्मयकृतींना भरपूर संख्येत वाचकवर्ग मिळतो त्या भाषिक समाजाला वाङ्मयाची संपन्न वाचनसंस्कृती लाभली आहे असे म्हणता येईल. त्या समाजाच्या ग्रंथव्यवहारव्यवस्थेच्या अभ्यासावरून अभिरुचिसंपन्न वाचकांच्या संख्येचा अंदाज बांधता येऊ शकतो. ज्या वाङ्मयाला उत्तम वाङ्मयकृती म्हणून मान्यता मिळालेली असते त्या वाङ्मयकृती त्या समाजात किती प्रमाणात वाचल्या जातात हे अशा पुस्तकांच्या विक्रीच्या वेगावरून व आकडयांवरून आणि ग्रंथालयातून ते वाचणाऱ्यांच्या संख्येवरून ठरवता येते. अभिरुचिसंपन्न समाजामध्ये अशी पुस्तके तात्काळ आणि मोठ्या प्रमाणात विकली जातात. उत्तम वाङ्मयकृतीच्या लेखकांना चांगल्या प्रकारचे स्वामित्वधन मिळते. केवळ लेखनावर त्यांची उपजीविका होऊ शकते. अशा वाङ्मयकृती जेव्हा बाजारात येतात तेव्हा जाणकार वाचकांकडून, समीक्षकांकडून त्यांची त्वरित दखल घेतली जाते. अशा पुस्तकांवर समीक्षकांचे अभिप्राय, परीक्षणे आणि जाणकार वाचकांच्या विश्लेषणात्मक प्रतिक्रिया प्रसिद्ध होऊ लागतात. संपन्न वाचनसंस्कृती असलेल्या समाजात ग्रंथप्रकाशन, ग्रंथविक्री हे लाभदायक व्यवसाय असतात. ह्या समाजातील अभिरुचिसंपन्न वाचक केवळ उत्तम दर्जाची ताजी पुस्तकेच वाचीत नाही तर पूर्वी प्रकाशित झालेल्या अभिजात वाङ्मयकृतीही तो आवर्जून वाचीत असतो. अशा समाजाच्या वाङ्मयीन परंपरेतील प्रसिद्ध होऊन गेलेल्या सर्वच अभिजात वाङ्मयकृतींना सतत मागणी असल्यामुळे त्यांच्या वारंवार आवृत्त्या निघत असतात. मराठी भाषकांच्या समाजात असे दृश्य अजून तरी दिसत नाही. आपल्याकडे वाचकांचीच संख्या एकूण साक्षर लोकसंख्येच्या तुलनेत नगण्य आहे. तीही प्रामुख्याने शहरातच आढळून येते. वाचकांच्या या संख्येत कलास्वादासाठी वाचन करणाऱ्यांची संख्या नगण्य असून करमणूक करणाऱ्या, स्वप्नरंजनपर वाङ्मयाचे वाचन करणाऱ्यांचीच संख्या फार मोठी आहे. ज्या समाजाची वाचनसंस्कृती विकसित झालेली असते त्या समाजातही करमणूकप्रधान, स्वप्नरंजनपर वाङ्मय वाचणाऱ्यांची संख्या कलात्मक वाङ्मय वाचणाऱ्यांच्या संख्येहून जास्तच असते. परंतु त्यांच्यातील संख्यात्मक अंतर तुलनेने कमी असते. मराठीत करमणूकप्रधान, स्वप्नरंजनपर वाङ्मयाच्या अनेक आवृत्त्या निघतात तर कलात्मक वाङ्मयाची हजारभराची आवृत्ती खपायला अनेक वर्षे जावी लागतात. काव्यासंबंधी तर यापेक्षाही वाईट परिस्थिती आहे. प्रकाशक प्रकाशनासाठी काव्यसंग्रह हातातही धरत नाहीत. अनेक कवी नाइलाजाने स्वतःचा काव्यसंग्रह स्वतःच प्रकाशित करतात. मराठी समाजात कलास्वादासाठी ललित वाङ्मयाचे वाचन करणाऱ्यांची संख्या तुलनेने अत्यल्प असल्यामुळे मराठी भाषेची वाचनसंस्कृती संपन्न आहे असे म्हणता येत नाही.

प्रत्येक व्यक्तीमध्ये वाङ्मयाच्या वाचनाची आवड असेलच असे नाही. म्हणूनच सर्व साक्षर वाङ्मयाचे वाचक असू शकत नाहीत. परंतु प्रत्येक व्यक्तीत, मग ती साक्षर असो किंवा नसो, बीजरूपाने अभिरुची अस्तित्वात असते. ती त्याला त्याच्या भाषावापरातून मिळालेली असते. भाषा वापरताना व्यक्ती आपल्या भाषेत कमीअधिक प्रमाणात निर्मिती करीत असते. आपल्या भावनांचा ऐकणाऱ्याला प्रत्यय येईल अशा प्रकारे भाषा वापरत असते. तसेच दुसऱ्याचे सर्जनात्मक बोलणे आस्वादितही असते. या बीजरूप अभिरुचीचा विकास काहींमध्ये कमीअधिक प्रमाणात होतो आणि काहींमध्ये मात्र तो प्राथमिक पातळीवरच राहतो. प्रत्येक व्यक्तीत अभिरुचीचा होणारा विकास हा भिन्न असतो. जगण्याच्या प्रक्रियेत भाषिक व्यवहाराकडून भागवल्या जातील अशा अनेक गरजा व्यक्तींच्या ठिकाणी उद्भुत होत असतात. त्यांची पूर्तता करणारे वाङ्मय

प्रत्येक संस्कृती निर्माण करीत असते. ज्ञानविषयक कुतूहल, नैतिक मार्गदर्शन, मनोरंजन, इच्छापूर्ती, कलास्वाद, अशा या गरजा असतात. म्हणून काहींना ज्ञानविषयक वाङ्मयात रस असतो तर काहींना कलात्मक वाङ्मयात रस असतो. काहींना नैतिक बोधाची आवश्यकता वाटते तर काहींना आपल्या अतृप्त इच्छांची तृप्ती वाङ्मयाकडून करून घ्यावीशी वाटते. थोडक्यात, व्यक्ती आपल्या गरजा भागविणारे वाङ्मय वाचण्यासाठी निवडीत असते. या गरजांचे प्रमाण प्रत्येक व्यक्तीत वेगवेगळे असते. यांपैकी काही गरजांचा काही व्यक्तींत अभाव असू शकतो. अशा व्यक्ती त्या गरजा भागविणारे वाङ्मय आवर्जून वाचीत नाहीत. काही व्यक्तींत काही गरजा निकडीच्या असतात. अशा व्यक्ती त्या गरजा भागवणारे वाङ्मयच सातत्याने वाचतात. अतृप्त इच्छांची तृप्ती घडवणाऱ्या वाङ्मयाबद्दल हे विशेषत्वाने प्रत्ययास येते. आपल्या गरजा भागविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची अभिरुची त्या त्या क्षेत्रातील वाङ्मयाची निवड करीत असते. भाषा व्यवहाराकडून त्याला बीजरूपात मिळालेली अभिरुची त्याला आवडणाऱ्या वाङ्मयाच्या संस्कारातून विकसित होत जाते. त्याच्या सततच्या वाचनातून त्याच्या मनात त्याला हव्या असलेल्या वाङ्मयाच्या स्वरूपाविषयी आणि त्यांच्यातील चांगलेवाईटपणाविषयी काही प्रमाणके स्थिरावतात. परंतु त्याला या प्रमाणकांची स्पष्ट आणि नेमकी जाणीव असेलच असे नाही. ही प्रमाणके वाचकाच्या नकळत, सुप्तपणे त्याला हव्या असणाऱ्या वाङ्मयाची निवड आणि मूल्यमापन करतात.

कलात्मक वाङ्मयाचे वाचन ही ज्याची गरज आहे अशा वाचकांच्या वाङ्मयीन अभिरुचीचा दर्जा एकसारखा असेल असे नाही. प्रत्येकजण आपल्या अभिरुचीच्या उंचीप्रमाणे वाङ्मयकृतीचा आस्वाद घेत असतो. आस्वादकाची अभिरुची कितीही संपन्न असली तरी तो श्रेष्ठ वाङ्मयकृतीचे परिपूर्ण आकलन करून घेऊ शकत नाही. श्रेष्ठ वाङ्मयकृती व्यक्तीप्रमाणे, काळाप्रमाणे नवनवे अर्थ धारण करीत नसते. तिला एकचएक निश्चित, स्थिर आणि अंतिम रूप नसते. कुठल्याही वाचकाच्या आकलनात येणाऱ्या तिच्या आशयापेक्षा आणि रूपापेक्षा तिचा आशय आणि रूप विस्तृत असते. त्यामुळे वाचकाची अभिरुची कितीही संपन्न आणि प्रगल्भ असली तरी वाङ्मयकृती त्याच्या आस्वादात पूर्णतः सामावली जात नाही. सर्वच वाङ्मयकृतींना, किंबहुना सर्वच माध्यमांतील कलाकृतींना स्वतःचा वस्तुनिष्ठ आशय आणि रूप असते. वाङ्मयकृतीचा आस्वाद घेत असताना ती आस्वादकाच्या आकलनात असलेल्या वास्तवातील अनेक घटनांना, आस्वादकाच्या अनेक वैयक्तिक अनुभवांना आपल्या आशयाशी आणि रूपाशी जोडून घेत त्यांना अर्थ आणि रूप देत असते आस्वादकाच्या जीवनातील आणि अनुभवविश्वातील कोणते व किती घटक वाङ्मयकृती आपल्यात सामावून घेणार हे वाङ्मयकृतीच्या वस्तुनिष्ठ घटकांच्या स्वरूपावर, आस्वादकाच्या आकलनक्षेत्रातील वास्तवावर आणि अनुभवविश्वावर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक आस्वादकाच्या आस्वादात अर्थ आणि रूप धारण करणाऱ्या वाङ्मयकृतीतील घटनांचा आणि अनुभवांचा तपशील वेगळा असतो. आपल्या आशयात आणि रूपात आस्वादकाच्या अनुभवक्षेत्राला सामावून घेणे हा वाङ्मयकृतीचा स्वभाव असल्यामुळे प्रत्येक वाङ्मयकृती ही कमीअधिक प्रमाणात अधिकार्थसमावेशनक्षम असते. तेव्हा आस्वादकाच्या वाङ्मयीन अभिरुचीचा दर्जा कोणताही असो, तो आपल्या अभिरुचीच्या कक्षेत वाङ्मयकृतीच्या कलारूपाचा आस्वाद घेऊ शकतो. परंतु सर्व आस्वादकांतील आस्वादात एकाच जातीचा तपशील एकाच प्रकारच्या रूपात संघटित होत असल्यामुळे सर्व वाचकांच्या आस्वादाची जात एकच असते. त्यामुळे प्रत्येक आस्वादकाचे वाङ्मयकृतीचे आकलन आणि मूल्यमापन हे एकाच वाङ्मयवस्तूबद्दलचे असते.

वाङ्मयवस्तूच्या स्वरूपात तिचे वाचन कसे करावे याचे निर्देश दडलेले असतात. वाङ्मयवस्तूचा स्वीकार कुठल्या उद्दिष्टाच्या तृप्तीसाठी करायचा हे वाचकाने वाचनापूर्वीच ठरवलेले असते. आपला स्वीकार वाचकाने कसा करावा या संबंधीचे वाङ्मयवस्तूतील निर्देश आणि वाचकाच्या मनातील

उद्दिष्टे हे जेव्हा एकच असतात तेव्हा त्याचे वाचन यशस्वी होते. अशा वाचनाला आपण 'योग्य वाचन' म्हणतो. योग्य वाचनात वाचकाच्या आस्वादात वाङ्मयकृतीतील सर्वच घटक अर्थपूर्ण बनत असतात. परंतु जेव्हा वाचनासंबंधी वाङ्मयकृतीने सुचविलेली दिशा आणि वाचकाची वाचनोद्दिष्टे यांत काहीही मेळ असत नाही तेव्हा होणारे वाचन हे 'चुकीचे वाचन' असते. एखाद्या वाङ्मयकृतीत लैंगिक अनुभवांची कलात्मक रचना केलेली असते. कलाप्रत्ययाच्या उद्दिष्टाने वाचन करणारा वाचक ह्या अनुभवांकडे कलाकृतीच्या अन्य घटकांप्रमाणेच एक घटक म्हणून पाहील. असे अनुभव त्याला 'अश्लील' वाटणारच नाहीत. आपल्या वाचनात तो त्या वाङ्मयकृतीतील सर्वच घटकांचे आस्थापूर्वक आकलन करील. याउलट अशा वाङ्मयकृतीचे अतृप्त लैंगिक इच्छांच्या तृप्तीखातर वाचन करणाऱ्याला फक्त लैंगिक उत्तेजना देणारे प्रसंगच आवडतील. या वाङ्मयकृतीत लैंगिक अनुभवांत सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या सूक्ष्म मानसचित्रणात त्याला अजिबात रस असणार नाही. लैंगिक अनुभवांची कलात्मक रचना होऊ शकत असल्यामुळे आपणही अशीच वाङ्मयकृती निर्माण करीत आहोत असा दावा करीत काही लेखक लैंगिक उत्तेजना देणारे वाङ्मय लिहून त्याच्या समर्थनार्थ लेखनस्वातंत्र्याचा उद्‌घोष करीत असतात. कलाकृतीनिर्मितीसाठी लैंगिक अनुभवांतून निर्माण होणाऱ्या वाङ्मयकृतीचे जसे चुकीचे वाचन होते तसे मनोरंजनासाठी आणि अन्य हेतूंसाठी लिहिल्या गेलेल्या वाङ्मयाचेही चुकीचे वाचन होते. स्वप्नरंजनपर वाङ्मयवस्तूचे आकलन कलाप्रत्ययाच्या अपेक्षेने करायचे आणि ती कशी कलाविहीन आहे, तिच्यात कोणकोणत्या उणिवा आहेत, हे हिरिरीने सांगायचे, हा प्रकार काही समीक्षक करताना दिसतात, तेव्हा त्यांनी त्या वाङ्मयवस्तूचे चुकीचे वाचन केलेले असते.

वाङ्मयवस्तूचे योग्य प्रकारचे वाचन करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. कलात्मक वाङ्मयापासून ते जाहिरातीपर्यंतच्या वाङ्मयाच्या विस्तृत फलकातील सर्व प्रकारच्या लेखनामध्ये लालित्यनिर्मितीसाठी, कलात्मक वाङ्मयाने घडवलेल्या संकेतव्यवस्थेतील संकेतांचाच वापर केला जातो. या वापरामुळे या फलकातील सर्व प्रकारच्या लेखनात कमीअधिक प्रमाणात लालित्य निर्माण झाले असते. कलात्मक वाङ्मय ही या संकेतव्यवस्थेची जन्मभूमी असते. संकेतव्यवस्थेच्या क्षेत्रात कलात्मक वाङ्मयात सतत नवेनवे प्रयोग होत असतात आणि त्यातून नवनवे संकेत जन्मून त्यांपैकी काही प्रथम कलात्मक वाङ्मयात स्थिरावतात. नंतर ते या फलकातील अन्य प्रकारच्या वाङ्मयात गरजेनुसार स्वीकारले जातात. वाङ्मयाच्या क्षेत्रात सतत चालू असणाऱ्या या प्रक्रियेमुळे या फलकातील सर्व प्रकारच्या लेखनात साम्य प्रस्थापित झालेले असते. वैचारिक लेखन आणि जाहिरातसंहिता यांची उद्दिष्टे स्पष्ट आणि नेमकी असल्याने आणि ती वाचकाच्या नजरेत चटकन भरत असल्यामुळे त्यांचे उद्दिष्टानुसारी वाचन करणे सोपे असते. परंतु आशय आणि रचनाबंध घडवणारी संकेतव्यवस्था यांबाबतीत कलात्मक वाङ्मय आणि मनोरंजनपर, नैतिक, स्वप्नरंजनपर असे इतर प्रकारचे वाङ्मय यांत कमालीचे साम्य असल्यामुळे त्यांचे वाचन चुकीच्या भूमिकेतून होऊ शकते. मग वाचक कलात्मक वाङ्मयाकडून सुखदायक मनोरंजनाच्या अपेक्षा करू लागतात. मनोरंजनासाठी सहजाकलनाची आवश्यकता असते. परंतु व्यामिश्र स्वरूपाच्या काही वाङ्मयकृतींचे सहजनाकलन शक्य नसते. मग वाचक अशा वाङ्मयकृतीतील स्वाभाविक दुर्बोधतेबद्दल तक्रार करू लागतात. तसेच अनेकदा कलाप्रेरणेतून जन्मलेल्या वाङ्मयाकडून समाजपरिवर्तनासाठी मार्गदर्शनाची अपेक्षा करू लागतात. तसेच अनेकदा कलाप्रेरणेतून जन्मलेल्या वाङ्मयाला कलाबाह्य हेतूंमुळेच महानत्व प्राप्त होते, असेही मानू लागतात.

वाङ्मयवस्तू कोणत्याही हेतूतून जन्मलेली असो, तिचे वाचन करताना तिच्यातील कलागुणांची दखल घेणे आवश्यक असते. हे कलागुण या वाङ्मयवस्तूत कोणत्या प्रकारचे कार्य करतात हे लक्षात घ्यावयाचे असते. ते काही प्रमाणात कलाप्रत्ययाचे कार्य करीत असले तरी ते त्याचे

मुख्य कार्य नसते. त्यांचे मुख्य कार्य लेखकाचा निर्मितीहेतू प्रभावी बनविणे, त्याचे उद्दिष्ट वाचकाच्या मनावर सखोलपणे कोरणे हे असते. हे जर लक्षात घेतले नाही तर वाचकाचे वाचन चुकू शकते. तसेच एखादी वाङ्मयवस्तू बोधाच्या, रंजनाच्या किंवा अन्य कुठल्याही हेतूतून निर्माण झालेली असूनही ती संपूर्ण कलाकृती असू शकते. त्यामुळे तिचे आवाहन दुहेरी असते. वाचक अशा वाङ्मयवस्तूचे आकलन तिच्या निर्मितीहेतूच्या संदर्भात जसा करू शकतो तसेच तो कलाप्रत्ययासाठीही करू शकतो. मध्ययुगीन वाङ्मय असेच मिश्र हेतूंतून घडले आहे. त्यामुळे आपण ज्ञानेश्वरी किंवा तुकोबांचे अभंग धार्मिक, नैतिक या हेतूंसाठी आणि कलाप्रेरणेच्या पूर्तीसाठी वाचू शकतो.

जाणकार वाचक आपले वाचनहेतू आणि वाङ्मयवस्तू सुचवीत असलेले तिचे वाचनहेतू यांचा मेळ प्रस्थापित करीतच वाचन करीत असतो. ज्या भाषिक समाजाची वाचनसंस्कृती विकसित आणि प्रगल्भ असते त्या समाजात योग्य वाचन करणाऱ्यांची संख्याही भरपूर असते.

४

आपली वाचनसंस्कृती पुरेशी विकसित नाही, हे आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट होईल. ती पूर्णतः विकसित करण्यासाठी काही उपाय योजिता येतील काय याचा आता आपणास विचार करावयाचा आहे. साक्षर असलेल्या भाषकांच्या एकूण संख्येपैकी बहुसंख्य लोक वाचक असणे, ही विकसित वाचनसंस्कृतीची एक कसोटी मानायला हवी. वाङ्मयनिर्मितीमागे असलेल्या प्रत्येक हेतूतून लिहिल्या जाणाऱ्या वाङ्मयातील जे उत्तम वाङ्मय असेल त्याला मोठा वाचकवर्ग लाभणे, ही विकसित वाचनसंस्कृतीची आणखी एक कसोटी मानायला हवी. म्हणजे कलात्मक, मनोरंजनपर, उद्बोधक, अशा प्रत्येक प्रकारातील चांगले वाङ्मय वाचणाऱ्यांची बहुसंख्या असणे ही विकसित वाचनसंस्कृतीची कसोटी मानायला हवी. म्हणजेच सर्व प्रकारच्या वाङ्मयाला त्या त्या क्षेत्राची संपन्न अभिरुची लाभलेले वाचक मिळायला हवेत. तसेच सर्व प्रकारच्या वाङ्मयाच्या वाचकांतही कलाप्रेरणेने निर्माण होणाऱ्या वाङ्मयाला सर्वाधिक वाचक मिळायला हवा. प्रत्यक्षात तो तुलनेने कमी असतो, पण तो बहुसंख्य असणे ही आदर्शावस्था होय. त्या दिशेने वाचनसंस्कृतीची वाटचाल होत रहायला हवी. विविधहेतूजन्य वाङ्मय हे संकेतांच्या समान वापरामुळे आणि मानवी भावजीवनाच्या समान निर्मितिसामग्रीमुळे परस्परांशी बांधलेले असते. त्यांच्यातील सीमा धूसर असून त्या एकमेकींत मिसळलेल्या असतात. त्यामुळे एका प्रकारच्या वाङ्मयाचा वाचक दुसऱ्या प्रकाराकडे कळत नकळत वळू शकतो. कलाप्रेरणेतून निर्माण होणारे वाङ्मय सोडल्यास अन्य प्रकारचे, विशेषतः मनोरंजनपर आणि स्वप्नरंजनपर वाङ्मय हे यांत्रिकपणे निर्माण होत असते. त्याच्या आशयाचे आणि रूपाचे लवकर साचे बनून जातात. त्यामुळे अशा वाङ्मयाबद्दलचे वाचकाचे आकर्षण काही काळानंतर कमी होण्याची खूप शक्यता असते. कोवळ्या वयात स्वप्नरंजनपर वाङ्मयाचे आकर्षण अधिक असते. परंतु दीर्घकाळ याप्रकारच्या वाङ्मयाचे वाचन करीत राहिल्याने ते अनेकांना निरस वाटू लागते. मग अशा वाचकांच्या अभिरुचीत बदल होऊ लागतो आणि ते कलात्मक वाङ्मयाकडे वळण्याची दाट शक्यता असते. महाराष्ट्रात संगीत नाटकांनी आपल्या प्रेक्षकांतून शास्त्रीय संगीताचा नवा श्रोतृवर्ग घडवला. संगीत नाटकांचे प्रेमी असलेल्यांमधून एक मोठा घटक मनोरंजनपर नाट्यसंगीताकडून हळुहळू अभिजात शास्त्रीय संगीताकडे वळला. इतर प्रांतांच्या तुलनेत महाराष्ट्रात शास्त्रीय संगीताचा जाणकार श्रोता मोठ्या प्रमाणात असल्याचे बोलले जाते. संगीताच्या बाबतीत जसे अभिरुचिपरिवर्तन घडले तसे ते इतर कलांबाबतही घडू शकते. म्हणून वाचन करण्याला महत्त्व असायला हवे; वाचक काय वाचतो याला तुलनेने कमी महत्त्व द्यायला हवे. कुठल्याही प्रकारच्या वाङ्मयाचे वाचन करणारा वाचक असो, वाचन करण्याबद्दल त्याचे स्वागत करण्याची भूमिका घ्यायला हवी.

वाचकांच्या संख्येवर दूरदर्शनचा मोठा

अनुक्रमणिका

परिणाम झाल्याचे सांगितले जाते. संसारी स्त्रिया दुपारच्या फावल्या वेळात मनोरंजनपर कथाकादंबऱ्या वाचीत. पुरुषवर्गही फुरसत होताच मनोरंजनपर कथावाङ्मय वाचीत होता. या वाचकवर्गाची वाचनाची गरज भागविण्यासाठी फेरी ग्रंथालयाचा व्यवसाय प्रस्थापित झाला होता. आता संसारी स्त्रिया वाचनाऐवजी दूरदर्शनमालिका पाहतात. त्यामुळे मनोरंजनपर कथाकादंबऱ्यांच्या उत्पादनावर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. चित्रणपर कथनशैलीत हे मनोरंजनपर कथावाङ्मय लिहिले जाते. आता दूरदर्शनवर घटनांचे आणि पात्रांचे प्रत्यक्ष दर्शन घडत असेल तर चित्रमय कथनाचा दुबळा पर्याय करमणूक करवून घेणाऱ्यांनी का स्वीकारायचा, असा प्रश्न पडतो. तेव्हा या जातीच्या कथाकादंबऱ्या दूरदर्शनपुढे टिकाव धरू शकणार नाहीत, हे उघड आहे. मनोरंजनपर कथावाङ्मयाला आपले अस्तित्व टिकवण्यासाठी आपल्या स्वरूपात बदल करावे लागतील. ज्या कथावाङ्मयाचा कथन हा गाभा आहे त्या कथावाङ्मयाचे माध्यमांतर करता येऊ शकणार नाही, अशा वाङ्मयाला दूरदर्शनपासून धोका संभवत नाही.

आपल्या भाषेत वाचनसंस्कृती अविकसित राहण्याचे मुख्य कारण आपल्या संस्कृतीत वाङ्मयादी कलांना अतिशय गौण स्थान आहे. जोपर्यंत त्यांना महत्त्वाचे स्थान मिळत नाही तोपर्यंत वाचनसंस्कृती पूर्णपणे विकसित होऊ शकणार नाही. सध्याचे वाङ्मयीन वातावरण वाचनसंस्कृतीच्या विकासाला फारसे अनुकूल नाही. गेल्या पन्नास वर्षांत साक्षरतेचे प्रमाण खूपच वाढले परंतु त्या मानाने वाचकांच्या संख्येत मात्र वाढ झाली नाही. आजही पुस्तकांची आवृत्ती कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त पाच हजार प्रतींचीच निघते. छोट्या छोट्या गावात महाविद्यालये निघाली आहेत. परंतु त्यांच्या ग्रंथालयांची अवस्था दयनीय आहे. आज लहानातल्या लहान खेड्यातही वाचनेच्छू पदवीधर तरुण आहेत. परंतु तेथे त्यांना वाचायला पुस्तके उपलब्ध नाहीत. साक्षरतेच्या वाढीच्या प्रमाणात ग्रंथालये वाढली नाहीत.

एखादादुसरा अपवाद जर सोडला तर मराठीत वाङ्मयाला वाहिलेली नियतकालिके नाहीत. मराठी वृत्तपत्रे व साप्ताहिके नव्या पुस्तकांवर केवळ जुजबी अभिप्राय छापण्यापलीकडे वाङ्मयाची दखल घेत नाहीत. समीक्षकांची संख्या इतकी तुटपुंजी आहे की, अनेक महत्त्वाच्या पुस्तकांची दखल घेण्यास समीक्षक उपलब्ध नसतात. त्यामुळे मराठीत अभ्यासपूर्ण परीक्षणे लिहिली जाणे थांबले आहे. वाङ्मयीन परंपरेला आव्हान देणारी एखादी वाङ्मयकृती जर प्रकाशित झाली तर तिच्यावर अनुकूल-प्रतिकूल टीका आणि वाद होत नाहीत. मराठी भाषकांतील उच्चविद्याविभूषितांपैकी अनेकांना मराठीतील चार महत्त्वाच्या लेखकांची नावेही सांगता येणार नाहीत. महाराष्ट्र टाईम्समध्ये नामांकित मराठी भाषकांच्या, त्यांच्या वाचनासंबंधी मुलाखती प्रसिद्ध होत असतात. त्यातील बहुसंख्य मान्यवरांच्या मुलाखतीत केवळ इंग्रजी पुस्तकांचा आणि लेखकांचा गौरवाने निर्देश आढळतो. त्यात फार क्वचित मराठी लेखकांचा आणि पुस्तकांचा उल्लेख असतो. याचा अर्थ हे मान्यवर मराठी वाङ्मय वाचीत नाहीत, असा होतो. (किंवा मराठी वाङ्मयाचा उल्लेख करणे त्यांना कमीपणाचे लक्षण वाटत असण्याचाही संभव आहे.) आता मराठी मुले शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम आणि त्यातही अनेकजण दिल्ली बोर्डाचा अभ्यासक्रम निवडतात. त्यामुळे शालेय जीवनात त्यांचा मराठी भाषाशिक्षणाशी संबंधच येत नाही. त्यांना मराठी वाङ्मयविषयी कसलीही कल्पना नसते. शिक्षणाचे हेच लोण महाराष्ट्रभर पसरले तर त्यातून घडणारा तरुणवर्ग मराठी भाषक असूनही त्याचा मराठी वाङ्मयाशी कसलाही संबंध असणार नाही. भावी काळात जर संपूर्ण महाराष्ट्रात बालवर्गापासूनच इंग्रजी माध्यम राहिले आणि शालेय अभ्यासक्रमातून मराठी विषय अजिबात काढून टाकला तर मराठी वाङ्मय आणि त्याचा वाचकवर्ग या गोष्टी भूतकाळात जमा होतील. सध्याचे शालेय शिक्षण हे भावी काळात निर्माण होणाऱ्या गंभीर परिस्थितीचे दुश्चिन्ह आहे.

आपली भाषा आणि संस्कृती याबद्दलची अभिमानाची भावना आणि त्यांच्या अस्तित्वावर आपली सांस्कृतिक ओळख अवलंबून असल्याची

जाणीव जोपर्यंत मराठी समाजात जागृत होणार नाही तोपर्यंत या परिस्थितीत बदल होणार नाही. सध्या निर्माण होऊ लागलेल्या परिस्थितीला प्रामुख्याने आर्थिक-राजकीय कारणे जबाबदार आहेत. प्रचंड बेकारी, त्यातून निर्माण झालेली जीवघेणी स्पर्धा, अद्ययावत ज्ञानाची फक्त इंग्रजी भाषेतून उपलब्धी, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योगधंद्यासाठी आणि आर्थिक व्यवहारासाठी केवळ इंग्रजी भाषेचा होत असलेला वापर, त्यामुळे नोकऱ्यांसाठी इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची गरज, देशी भाषांच्या विकासाकडे, त्यांचा सर्व जीवनव्यवहारात वापर होईल अशी परिस्थिती निर्माण करण्याकडे राज्यकर्त्यांनी केलेले दुर्लक्ष, अशी काही कारणे सांगता येतील. अशा परिस्थितीत स्वतःच्या भाषेवरच्या आणि संस्कृतीवरच्या प्रेमाला काहीही स्थान असत नाही.

ही परिस्थिती बदलण्यासाठी मुळातून आर्थिक-राजकीय धोरणे बदलली जाणे आवश्यक आहे. परंतु ही गोष्ट अवघड असून नजीकच्या काळात ते शक्य होईल असे दिसत नाही. परंतु आहे ह्या परिस्थितीत काही उपाय मात्र करता येऊ शकतात. इंग्रजी राजवटीत आपल्या भाषेची आणि संस्कृतीची काळजी जनतेनेच घेतली होती. तोच मार्ग आताही अवलंबावा लागणार आहे. आता मराठी भाषा आणि वाङ्मय यांचे शिक्षण देण्याची जबाबदारी महाराष्ट्रातल्या साहित्य संस्थांनी घेण्याची आवश्यकता आहे. मराठी भाषेचे आणि वाङ्मयाचे वर्ग चालवणे, मराठीच्या परीक्षा घेणे, गावोगावी मराठी वाङ्मयावर कार्यक्रम घेणे, मराठी ग्रंथालयाची चळवळ चालवणे, फिरत्या वाचनालयामार्फत गावोगावी पुस्तके पोचवणे, या मार्गाने मराठी भाषेचा आणि वाङ्मयाचा लोकसंपर्क टिकवला जाऊ शकतो. हे मार्ग आजही काही प्रमाणात वापरले जात आहेत. परंतु त्यांचा योजनाबद्ध पद्धतीने वापर आणि विस्तार करण्याची आवश्यकता आहे. आजच्या या परिस्थितीतही अनेक पालकांना आपल्या इंग्रजी भाषेतून शिकणाऱ्या मुलाला मराठी भाषेचे आणि वाङ्मयाचेही शिक्षण मिळावे असे वाटते. त्यामुळे या प्रकारच्या योजनांना चांगला प्रतिसाद मिळण्याचा संभव आहे.

वाचनसंस्कृती पक्केपणाने रुजण्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्याला वाचनाची सवय लावली जाणे आवश्यक आहे. आजच्या दूरदर्शनाच्या मोहाच्या काळात तर विद्यार्थ्याला ही सवय लावण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. मराठीच्या पाठ्यपुस्तकातील जो वेचा वर्गात शिकवला जाईल त्या वेच्याच्या लेखकाने लिहिलेला अन्य प्रकारचा निवडक आणि मोजका मजकूर (प्रत्येक लेखकाचा निवडलेला एखादादुसरा छोटासा उतारा) त्याच आठवड्यात विद्यार्थ्याकडून वाचून घेणे, ज्या कवींच्या कविता तो शिकतो त्या कवींच्या प्रत्येकी किमान दोन कविता विद्यार्थ्याला वाचायला लावणे, विद्यार्थ्याच्या आवडीच्या, पण अभ्यासक्रमाबाहेरील किमान दोन कविता वर्षभरात त्याच्याकडून पाठ करून घेणे, तसेच विद्यार्थ्याकडून करून घेतलेल्या अवांतर वाचनावर वर्षभरात किमान दोन गृहपाठ त्याच्याकडून करून घेणे, या गोष्टींचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करता येऊ शकेल. अभ्यासक्रमात समाविष्ट होणारा हा भाग इतका थोडा आहे की, त्यामुळे त्याच्यावरील अभ्यासाचा बोजा वाढणार नाही आणि तो हे वाचन आनंदाने करू शकेल. ही योजना अंमलात आणण्यासाठी शाळेला पुरेसे समृद्ध ग्रंथालय मात्र हवे. सध्या मराठी शाळा हळूहळू बंद होऊ लागल्या आहेत. परंतु ज्या चालू आहेत त्यात ही योजना राबवता येऊ शकेल.

नुसती वाचकांची संख्या वाढून उपयोगी नाही. पुस्तके विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या वाढायला हवी. महाराष्ट्रात पुस्तके विकत घेणारे वाचक फार थोडे आहेत. बहुतेक वाचकांचा भर ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचण्यावर असतो. पुस्तक एकदा वाचले की नंतर त्याचा उपयोग काय, असा त्याच्यापुढे प्रश्न असतो. पुस्तक जर विकत घेतले तर वाचून झाल्यावर ते कचराच बनते; पण त्याच्यावर बराच पैसा खर्च केलेला असल्यामुळे ते फेकवतही नाही आणि घरात तर त्याची अडचण होते; तेव्हा ते

विकत घेण्याऐवजी ते ग्रंथालयातून वाचण्यापुरते आणणे सोयीचे; असा विचार मराठी वाचनप्रेमी करतो. काही पुस्तके एकदा वाचून भागते. परंतु काही अभिजात वाङ्‌मयकृती ह्या वारंवार वाचण्याजोग्या असतात. कारण प्रत्येक वाचनात त्या नवनवा प्रत्यय देत असतात. म्हणून त्या संग्राह्य असतात. हे कलाप्रत्ययासाठी वाचणारे बहुतेक वाचक लक्षात घेत नाहीत. त्यामुळे अभिजात वाङ्‌मयकृतींचा वारंवार आस्वाद घेण्याची परंपरा मराठी वाचकांमध्ये आढळत नाही. अशी परंपरा जर कलाप्रेमी वाचकांमध्ये असती तर मराठीतील उत्तम वाङ्‌मयाचा संग्रह अनेक घरांतून दिसला असता. म्हणून कलाप्रेमी वाचकाला अभिजात वाङ्‌मय वारंवार वाचण्याचीही सवय लागणे आवश्यक आहे. संग्राह्य वाटणारे अभिजात वाङ्‌मय आणि आवडत्या लेखकाची पुस्तके विकत घेण्याची सवय जर वाचकांना लागली तर उत्तम पुस्तकांच्या खपाचा प्रश्न बराच सुटेल.

करमणुकीसाठी आणि अन्य हेतूसाठी विकत घेतलेली पुस्तके वाचून झाल्यावर त्यांचे काय करायचे आणि घेतलेली पुस्तके ठेवायची कोठे, असा प्रश्न या प्रकारांचे वाचन करणाऱ्या वाचकापुढे पडतो. यावर दोन उपाय सुचविता येतील. काही मित्रांनी मिळून ग्रंथमंडळ स्थापन करायचे. वर्षभरात या मंडळाच्या प्रत्येक सदस्याने किमान पाच पुस्तके विकत घ्यायची आणि ती वाचनासाठी उरलेल्या सदस्यांत फिरवायची. दहाजणांचे जर असे मंडळ असेल तर प्रत्येकाला वर्षभर पन्नास पुस्तके वाचता येतील आणि त्यांपैकी फक्त पाच पुस्तके त्याच्या मालकीची होतील. मग पुस्तकांचा फार मोठा संग्रह घरात बाळगावा लागणार नाही. खरे म्हणजे अशी पुस्तकमंडळे काही प्रमाणात पूर्वीपासून चालवली जात आहेत. फक्त पुस्तकमंडळाची चळवळ मोठ्या प्रमाणात वाढणे आवश्यक आहे. अशी पुस्तकमंडळे सर्व प्रकारच्या वाचकांसाठी चालवली गेली पाहिजेत. वाङ्‌मयाच्या नव्या पुस्तकांच्या दुकानांच्या जोडीला वाङ्‌मयाची जुन्या पुस्तकाची दुकाने चालवणे हाही एक मार्ग आहे. ज्यांना नवी पुस्तके घेऊन वाचणे परवडते त्यांनी ती विकत घेऊन वाचावीत आणि नंतर ती जुन्या ग्रंथविक्रेत्याला अल्प किंमतीत विकावी. जो वाचनावर थोडेफार पैसे खर्च करू शकतो त्याने अशा दुकानांतून जुनी पुस्तके विकत घेऊन वाचावीत. ही पद्धत जर रूढ करायची असेल तर त्यासाठी अल्प किंमतीची, कोणालाही परवडू शकणारी, दोनतीन वाचकांच्या वाचण्यापुरती टिकणारी, कागदी बांधणीची पुस्तके बाजारात आणायला हवी.

या सर्व उपायांतला महत्त्वाचा मुद्दा हा की मराठी माणसास पुस्तके ही मूल्यवान गोष्ट आहे आणि ती वाचणे ही आपली अनिवार्य आणि अपरिहार्य गरज आहे, असे मनोमन वाटायला हवे; तरच वाचनसंस्कृतीसंबंधीच्या सर्व समस्या सुटतील.

(औरंगाबाद येथे मराठवाडा साहित्य परिषदेने, 'वाचनसंस्कृती' या विषयावर राष्ट्रीय पातळीवरचे चार दिवसांचे एक चर्चासत्र दि. २३ ते २६ सप्टेंबर २००६ या काळात आयोजित केले होते. या चर्चासत्राच्या उद्‌घाटन समारंभात केलेल्या उद्‌घाटनपर भाषणात अधिकच्या मुद्द्यांचा समावेश करून तयार केलेला लेख.)

■■■

प्रकाशकांसाठी सूचना

१. मराठीत नव्याने प्रकाशित होणारी पुस्तके लेखक / प्रकाशकांनी 'युगवाणी'कडे जरूर पाठवावीत.
२. सर्वच पुस्तकांची परीक्षणे स्थलाभावी देणे शक्य नसले तरी महत्त्वाच्या पुस्तकांची दखल 'युगवाणी' घेईल.
३. ललित-समीक्षा-संशोधन-वैचारिक अनुवाद या प्रकारातील लेखनाची परीक्षणे 'युगवाणी'त येतील.

अनुक्रमणिका

॥ साक्षात ॥

कविता महाजन

आता आपला पत्ता हैराण गल्ली, परेशान रोड
यमदूतांनो
भडवेहो...
शोधा.

आपण आपलं उगाच नाटक करायचं सगळं की, आहोत जिवंत. आणि लोकांनीही फुक्कटच्या समजुती घालायच्या की, *सगळं ठीक होईल. एड्स झालेली माणसं अगदी बारा-चौदा वर्षंही जगतात... इत्यादी.* त्या यमाचा फास गळ्यात घेऊन फिरणाऱ्या माणसालाच माहीत असतं खरं काय ते.

डॉक्टरांशी कसला समजूतदार बोलला विठ्ठल. विनिताशी बोलतानाही सगळं साधुत्व ओसंडून वाहत होतं त्याच्या चेहऱ्यावरून. डॉ. अनुप तर म्हणालेही की, *फार नशीबवान आहात मॅडम तुम्ही. नाहीतर आम्ही बघतो ना की कशी वागतात माणसं. आता इथं होणाऱ्या गटचर्चांमध्ये सहभागी होत चला. म्हणजे कशा अनुभवांमधून जात असतात इतर बायका, हे कळेल तुम्हाला. तुम्हीही मोकळेपणाने बोलू शकाल. संवाद खूप महत्त्वाचा असतो. तुमच्या सुदैवाने तुमच्या मैत्रिणी आधुनिक दृष्टिकोण असलेल्या आहेत. मुलं हेल्पिंग नेचरची आहेत. आणि इतकी काळजी करणारा, समंजस नवरा आहे. त्यामुळे कदाचित आपल्या गोष्टी कुणाला सांगायच्या ? आपले विचार, भावना कुणाकडे व्यक्त करायच्या, कुणाशी बोलायचं असा प्रश्न पडत नसेल तुम्हाला. पण इतर बायकांकडे बघा...*

विठ्ठल आणि समंजस ? आणि काळजी करणारा ? हुडूत ! जबर नाटकं करतो शिंदळीचा. कापून काढला तर याचं रक्त काळंभोर असेल, मांससुद्धा काळं आणि हाडंसुद्धा काळी. राग राग येतो मला त्याच्या हलकटपणाचा. चोर साला.

नाना कितीही कसेही वागले तरी त्यांचं एक बरं होतं. आतबाहेर काही नसायचं. आपण धार्मिक आहोत तर आहोत, कर्मठ आहोत तर आहोत, जातीपाती मानणारे आहोत तर आहोत, रीतीरिवाज पाळणारे आहोत... तर आहोत. लपवाछपवी नाही.

बायकांनी बैठकीत येऊन बसलेलं नानांना चालायचं नाही. किंबहुना दिवसाच्यावेळी कुणी माणसं म्हणजे पुरूषमाणसं जर आलेली असतील बैठकीत, तर मागच्या दारानं यायचं-जायचं. बायकांसाठी पुढचं दार वर्ज्य. टीव्ही बैठकीत होता, तसाच मधल्या डायनिंगरूममध्येसुद्धा होता, बायकांच्या मनोरंजनासाठी म्हणून. बायकोला नवऱ्यानं मारणं, शिव्या घालणं इत्यादी सारं स्वाभाविकच वाटायचं त्यांना.

मुलींनी शिकायचं ते लग्न ठरेपर्यंत आणि शिकलेल्या मुलग्यांना शिकलेल्या मुली लागतात म्हणून. शिकलेल्या मुली का लागतात, तर चार लोकांत बायकोला सभ्य संकेतांनुसार वावरता यावं, पुढे होणाऱ्या पोरांचे गृहपाठ त्यांना घेता यावेत न् घरचे हिशेब सांभाळता यावेत न् तसा वेळप्रसंग आलाच तर काही नोकरीचाकरीदेखील करता यावी

म्हणून.

बदलत्या काळानुसार गरजा बदलतात आणि त्यानुसार बायकांना बदलवून घेतलं तरच त्या आपल्याला पुरेपूर उपयोगी पडतील, हे माहीत असणार पुरुषांना. म्हणून त्यांना शिक्षण देण्याचे प्रयोग. शिकवणार काय तर गृहसजावट, बालसंगोपन, नर्सिंग न् असलंच काय काय. आणि आव मात्र आपण किती उदात्त गोष्ट करतो आहोत असा उदारमतवाद्यांचा. म्हणजे बाईनं वृत्तीनं पारंपरिकच राहायचं, कामंही पारंपरिकच करायची, पतिव्रता-आदर्श माता इत्यादीच असायचं; पण नव्या तंत्रानं, शास्त्रशुद्ध रीतीनं, आधुनिक रूपानं.

आता सगळ्याच गोष्टींचं साइड इफेक्ट असतात, तसं काही बायका शिकून ज्ञानी इत्यादी व्हायला लागल्या आणि पुरुषांच्या कह्यात राहिनाशा झाल्या, ही गोष्ट निराळी. पण तशा तर किती बायका पूर्वीपासूनही होत्याच की पुरुषांच्या कह्यात न राहणाऱ्या.

विभानं एकदा सांगितलं होतं की, तेव्हा त्यांना अप्सरा न् विदुषी वगैरे म्हणत होते आणि मग हळूहळू त्या निव्वळ नाचणाऱ्या न् कलावंतिणी न् देवदासी अशा काहीतरी बनत गेल्या. त्यांचे अभ्यास, त्यांच्या कलासाधना, त्यांनी नाकारलेली लग्नं किंवा पुरुषांच्या सत्ता हे सारं हिणकस ठरवत त्यांचा दर्जा एकदम खालचा करून टाकला. आणि मोठी फूट पाडली बायका-बायकांमध्ये... ती दरी आजही भरली गेलेली नाहीचये. एकप्रकारच्या बाईला कुलीन म्हटलं की दुसऱ्या प्रकारची तिच्या विरोधात कुलटा ठरणारच आपोआप. मग ती घरा-कुटुंबासाठी बाहेर पडलेली, आर्थिकदृष्टया खालच्या वर्गातली, कष्टकरी बाई किंवा विधवा, परित्यक्ता जरी असली; तरी तिची कॅटगिरी वेगळी. आणि भेंचोद हे पुरुष पुन्हा असं म्हणायला मोकळे की, *बायकाच बायकांना कसं वागवतात हे पहा.* यामागचा इतिहास कोण तपासून पाहणार साल्यांनो ? तो तपासायचा ठरवला, तर फुटलेल्या घड्याच्या प्रत्येक तुकड्यावर तुमच्याच हातांचे ठसे सापडतील...!

आता आमच्या घरातलीच गोष्ट. आक्काचं लग्न मोडलं आणि घटस्फोट घ्यावाच लागला. ती तीन महिन्यांची गरोदर होती परत आली तेव्हा. पण नानांनी तिला ॲबॉर्शन करू दिलं नाही. जेमतेम एकोणीस-वीस वर्षांचं वय होतं तेव्हा तिचं, पण दुसरं लग्न करायचं नाही, असा ठाम निर्णय घेतला. *पाट लावायला आपण काय कुणबट आहोत काय ?* असं म्हणाले सरळ. नोकरीसाठी तिचं शिक्षण कामी आलं. जिल्हा सहकारी बँकेत चिकटवून टाकली नानांनी तिला.

राकेशनं काहीतरी लफडं केलेलं. एकेरात्री ती पोरगी घरातून निघून पळून आली सरळ त्याच्यासोबत. ती असली बामणाघरची, तरी कशी चालणार ? आपली जात तर मोडणारच ना. आणि बापाघरून पळून आलेली पोरगी आपल्या घरात काय नांदणार ? नानांनी तेवढ्या रात्री जीप काढली. रातोरात तिला बापाघरी पोचती केली कुठलाही गाजावाजा होऊ न देता. तिच्या बापाला समजावलं आणि राकेशलाही आपल्या ठराविक पद्धतीनं समज दिली कानाखाली वाजवून. म्हणाले, *शोधून शोधून बामणाघरची दूधभातवाली शोधली. खालच्या जातीतली असती, तर ठेव म्हणालो असतो अशीच. बामणाच्या पोरीचं काय करणार ?* कसला तडकला होता राकेश. *तुम्ही सुचवलेल्या, जातीतल्या पोरीला ठेवतो म्हटलं तर चालेल का ?* - असं म्हणाला होता. बरोबर तिसरे दिवशी कळालं की त्या पोरीनं रेल्वेखाली जीव दिला. आणि राकेशला अजूनही एका कानानं कमी ऐकायला येतं. वरवर सारं स्थिरस्थावर. पण राकेशनं नानाचं नाव टाकलं त्यानंतर. बदली करून घेतली न् माझ्यासोबत आला राहायला. लग्नाचा तर विषयच काढू देत नाही.

नानाचं असं पुष्कळ काही होतं खटकणारं, न पटणारं. त्यांच्या खास शाण्णव कुळी देशमुखी खाक्यातलं. पण ते काहीही असलं तरी त्याचं वागणं आणि बोलणं यात काडीचंही अंतर नव्हतं विठ्ठलसारखं.

ते परवडतं असल्या नाटकांपेक्षा.

पण पुष्कळ नवरे विठ्ठलहून कहर हलकट

आहेत, हेही खरं.

*सोबत*मध्ये दोन-चार मीटिंग्जना गेले आणि एकेक केसेस ऐकायला लागले, तेव्हा हे नीटच लक्षात आलं.

एड्सचा वापर एखाद्या हत्यारासारखा करता येतो, हे इथंच कळालं आणि मी हबकूनच गेले पार. किती विकृत विचार असू शकतात कुणाचे... कल्पनाही करवत नाही आपल्याला.


विभानं डॉ. वर्माची बातमी वाचून दाखवली परवाच.

या हरामी डॉक्टरनं आपल्या इंजिनिअर बायकोला न् तीन महिन्यांच्या लहानग्या मुलीला एच. आय. व्ही. संसर्ग दिला. इंजेक्शनमधून एड्सचे विषाणू तिच्या शरीरात सोडले. एड्सग्रस्त व्यक्तीचं रक्त देणं; भाजलेल्या, जखमा झालेल्या भागावर विषाणू मुद्दाम पेरणं... त्या तुलनेत इंजेक्शन देणं अधिक सोपं. एका डॉक्टरसाठी तर ही गोष्ट हातचा मळ असणार.

सगळे डिटेल्स होते बातमीत. डॉ. वर्माने बायको न् मुलीला एच. आय. व्ही.चं इंजेक्शन दिलं. तिला रक्ताची तपासणी करून घ्यायला भाग पाडलं. तिनं पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. प्रसूतीपूर्वी आपल्या विविध चाचण्या झाल्या होत्या आणि त्यात तिला कुठलाही दुर्धर आजार नसल्याचं निष्पन्न झालेलं होतं. पण त्यानं इंजेक्शन दिल्यानंतरच एड्सची लक्षणं निदर्शनास आली. डॉ. वर्मा स्वतः एड्सच्या रुग्णांवर उपचार करीत होता, त्यामुळे विषाणू उपलब्ध होणं त्यांच्यासाठी अवघड नव्हतं. आणि आता तो न् त्याचे इतर आरोपी नातलग फरार झाले आहेत. सतरा वेळा पोलीस पथकं जाऊन आली आजूबाजूच्या राज्यांतही, पण तपास लागला नाही.

कोर्टात तारखा पडताहेत. सुनावण्या चालल्याहेत.

विनिता म्हणाली, *समाजात होत असलेला*



मूल्यांचा ऱ्हास, ऐशोआरामात राहण्याची, कोणत्याही मार्गानं पैसे मिळवण्याची धडपड, भौतिक सुखाचा हव्यास याचे परिणाम आहेत हे सगळे. या गोष्टी म्हणजेच समाजविकासाचा मार्ग आहे, असं आपल्याला वाटतं. आणि आपण स्वीकारलेल्या या मार्गातील साईड इफेक्टस्‌चा परिणाम म्हणून एक माणूस आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायला तयार होतो.

विभा म्हणाली, बरोबर आहे तुझं. एरव्हीही तऱ्हातऱ्हांनी सूड उगवले जातातच बायकांवर. त्यांची कोंडी केली जाते, नाचक्की वा बदनामी केली जाते, चारचौघांत सरळसरळ अपमान केला जातो, त्या किती दुबळ्या-फालतू-टाकावू आहेत असं म्हणत कमी दाखवलं जातं. आर्थिक नुकसान करणं, शारीरिक इजा करणं आणि अखेर जीव घेणं हे अजून टोकाचे प्रकार. आणि हे करता येण्यासाठी प्रभावी हत्यारं शोधत असतातच माणसं. तशी आता या गृहस्थानं एड्‌सच्या विषाणूची निवड केली. भयानकच आहे हे.

माझं डोकं तडकलंच होतं सगळं ऐकून. म्हटलं, पण किती अघोरी आहे सालं हे. आणि हे करण्याचं कारण काय, तर बायको आवडत नाही. आवडली नव्हती तर केली कशाला ? नंतर आवडेनाशी झाली म्हणावं, तर मग टाकली का नाही ? झोपत होतासच ना शिंदळीच्या तिच्याबरोबर ? एक पोरगी जन्माला घातलीस ना ? घ्यायला घटस्फोट. संपलं ना. कुणाच्या जीवाशी का खेळता हरामखोरांनो ? आणि त्या लेकरानं काय बिघडवलं होतं डुकरा तुझं ! तडफडून मरेल ती पोर, तर तुला काय सुखानं मरण येईल ? मरण तर जाऊच दे... रोजची झोप तरी कशी लागेल सुखानं ? आता पळ काढून परांगदा व्हावंच लागलं ना ? याच्या - त्याच्या दाराशीच पडला असशील ना जाऊन कुत्र्यासारखा. लाचार होऊन. किती काळ तोंड लपवत फिरशील मादरचोद ? आणि आरशात तर दिसत असेलच स्वतःचं खुनी थोबाड, तेव्हा काय करशील ?...

काही फरक पडत नाही अशा लोकांना. भावनेच्या भरात चुकून काही घडणं हातून, हे निराळं असतं. तशा केसमध्ये एकवेळ पस्तावा वाटू शकतो कुणाला. पण हे सगळं तर त्यानं अगदी ठरवून योजना आखून केलेलं होतं हे स्पष्ट दिसतंय. त्याला कशाचा पश्चात्ताप होईल ? आणि तू असं तणतणून आणि शिव्या घालून काही होणार आहे का ? इतकी शिकलेली असून अशीकशी गावंढळ बायकांसारखी बोलतेस गं ? विभा म्हणाली.

तुझं का ऑब्जेक्शन असतं यार नेहमी शिव्यांना. आता आपण तणतणलोही नाही नृ शिव्याही घातल्या नाही, तर काही होणार आहे का ? समजू देत ना भोसडीच्यांना की, असे शिव्याशाप मिळतात असं वागल्यावर. मी वैतागून म्हटलं.

म्हणून लोक असं वागायचे थांबणार आहेत का ? अगदी फाशीची शिक्षा होईल हे माहीत असूनही हुंड्यापायी सुनांना जाळतातच ना ? बलात्कार करतातच ना ? बयो, लोक शिक्षेला घाबरत नाहीत, कायद्याला घाबरत नाहीत... ते काय तुझ्या शिव्याशापांना घाबरणार ? आणि दुसरं म्हणजे तू अशा खास बायकांवरून दिल्या जाणाऱ्या पुरुषी शिव्या देतेस ना... लिंगवाचक शिव्या... ते मला मुळीच आवडत नाही. आपण आपली बेइज्जती केल्यासारखं वाटतं मला ते. आई-बहिणीवरून कसल्या घाणेरड्या शिव्या द्यायच्या ? तसं तर कुठल्याच शिव्या देणं बरोबर नाही. अगदी बिचाऱ्या प्राण्यांवरूनसुद्धा. विभा म्हणाली.

मी तणतणत म्हणाले, पण आपण बोंबलल्याचं आपल्याला समाधान. नाही का ? आणि अशा बोंबलणाऱ्या बाया जमल्या एकत्र, तर काही ना काही दबाव तर तयार होतीलच की नाही ? दुसरं कुणी बोलेल, करेल म्हणून वाट पाहायची का सगळ्यांनीच ? कुणीतरी पुढे नको का यायला ? स्वतःपासून सुरुवात करावी की आपण. तुम्ही नुसती पुस्तकं वाचान्‌ न समजणाऱ्या मोठमोठ्या शब्दांच्या पोकळ चर्चा करा आणि वरती आम्हाला गावंढळ म्हणा तिच्यामायला... सॉरी. पुन्हा आईवरून शिवी दिली. बाप-भावावरून आहेत का ग कुठल्या शिव्या ?

कर... मस्करी कर कशाचीही.

मस्करी नाही जानू. मी सिरीयसली विचारतेय.

मी साळसूद चेहऱ्यानं विचारलं.

तू... अन् सिरीयस होणार ? एक शिव्यांचा कोश आहे मराठीत. तो देते आणून तुला. बस शोधत बाप-भावावरच्या शिव्या आहेत का नाही ते.

नाय बाप. एकवेळ शिव्या देणं सोडेन मी, पण पुस्तक हातात नाही धरणार.

खूप झालं. पुरे करा आता. हे बघ, प्रत्येकाची कामाची रीत निराळी असते रचिता. वाचणं-लिहिणं-चर्चा हा देखील कामाचाच एक भाग असतो. तुझ्यासारखी मी कशी असेल ? विभा माझ्यासारखी नसेल. तू विभासारखी नसशील. पण आपापल्या रीतीनं काही ना काही धडपड करतोच आहोत ना आपण. त्याचं महत्त्व असतंच त्या त्या जागी. मला असं वाटतंय की, तू लेनिनाला भेटावंस एकदा निवांत आणि बोलावंस तिच्याशी. विनितानं शांतपणानं सुचवलं.

आता तिला वेगळं कशासाठी भेटायचं ? मी म्हटलं.

ते भेटलीस - बोललीस की आपसूकच कळेल तुला. ती शांतपणानं म्हणाली.

विभा येणार म्हणाली खूप दिवसांनी. फुरसतीनं रात्रीचं निवांत गप्पा मारायला, मस्त काहीतरी जेवा-खायला म्हणजे प्यायला खरंतर - ये म्हटलं होतं तिला. आणि आता काय तिला नवऱ्याचा वांधा नाही. घटस्फोट झाला एकदाचा न् मोकळी झाली मस्त.

राकेशनं बकार्डीच्या बाटल्या आणून टाकल्या होत्या. विनितानं घरगुती बनवलेलं लेमन-जिंजर पैदा करून दिलं होतं.

*सोबत*नं एडस् झालेल्या बऱ्याच बायकांना असे काहीतरी घरगुती उद्योग करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग घेणं सुरू केलं होतं. पण अद्याप मार्केटिंगचं नीट जमत नव्हतं त्यांना. तोवर ही अशी काहीतरी मदत करायची विक्रीसाठी म्हणून विनिता तिच्या बँकेत, लोकल ट्रेनमध्ये असल्या गोष्टींच्या एवढाल्या पिशव्या घेऊन यायची. अर्थात ते जसं *मतिमंद मुलांनी किंवा अपंग माणसांनी बनवलंय म्हणून घ्या...* असं म्हणता येतं आणि लोकही सहानुभूतीनं घेतात, तसं काही इथं *एडस् झालेल्या बायकांनी बनवलंय म्हणून घ्या,* असं सांगायची सोय नव्हतीच. त्याचा उलट परिणाम झाला असता नेमका. पाच पैशांचंही काही विकलं गेलं नसतं. पण या असल्या उचापती विनिताच करू जाणे.

तर माझ्याही गळ्यात तिनं असं पुष्कळ सामान बांधलं आणि *जे तुला लागणारं नसेल ते तुझ्या बिल्डिंगमध्ये विकून टाक,* म्हणाली. काय करायचं या बाईचं ? हिला कोण काय समजवणार ?

बिल्डिंगमध्ये तर माझी सावलीही पडू देत नाही लोक. दारात कचरा आणून टाकतात. परवा मी *सोबत* मध्ये जाऊन घरी परत आले, तेव्हा चौथ्या मजल्यावरच्या वाटवेबाईंनी वॉचमनला हाका मारून फिनेल टाकून लिफ्ट पुसून घ्यायला लावली. असे अडाणचोट लोक आजूबाजूला असताना आता हे सामान घेऊन दारोदार कोण फिरणार ? पण घेतलं ठेवून मुकाट्यानं.

*सोबत*मध्ये जायला लागले तेव्हापासून या पॉझिटिव्ह बायकांची स्थिती दिसत होतीच की मलाही.

...तर संध्याकाळी आली विभा वेळेत.

म्हटलं.

चल बसूयात दोघी आपापले ग्लास भरून... रिकामं करू थोडं आपलं एकाकीपण... तरंगू ग्लासमध्ये बर्फाचा तपकिरी खडा होऊन... ऐन तारुण्यातल्या कोऱ्या करकरीत रात्रींची काळीभोर पानं मांडू एकमेकींसमोर... आणि हसू आपल्या गांडू भेदरटपणावर...

विभानं सूर मिसळला, *नाही उडवली एक भिवई... नाही झुकवली रंगवून पापणी... नाही मुडपला ओठ जरासा... नाही केला इशारा जाता जाता... आपली मैना गावाकडेच राहिली...*

मी कंटिन्यू केलं, या डांबरी रस्त्यावर जरी वाकडे पडते पाऊल आपुले... तरी काय फरक पडला असता ? चौदा वर्षांचा वनवास तनामनाने सोसला नसता !

ग्लासात बर्फाचे क्यूब टाकत विभा म्हणाली,

किती उकळला चहा,
किती रटरटला भात,
किती भाजल्या पोळ्या,
पुन्हा आपला बोळा
पायाशीच.

मी पलटी खाल्ली. म्हटलं, छे ! हा मूड नको. *नकोच भेंचोद... दारू प्यायची, पण मजा वाटेल इतकीच प्यायची. छान तरंगायला झालं पाहिजे. कुठलीही गोष्ट मग करकरीत राहात नाही. सगळ्या कडा, सगळी टोकं मऊ, बोथट, गोलाकार होऊन जातात. निव्वळ ढग आणि निव्वळ धुकं. हा ! दारू पिऊन रडू नाही आलं पाहिजे. रडायला आपल्याला भरपूर कारणं आहेत. त्यासाठी पैसे खर्चून दारू प्यायची काय गरज ? मजा कर बाई, मजा कर. बाकी काय... कमी अधिक फरकानं सारखंच असतं आपलं सगळं... म्हणजे असं बघ...*

टिकलीपुरता नवरा
सईबाई उगाच दाखवू नको तोरा
तुझाही बिछाना माझ्यावानी कोरा
चार लोकांत उगाच आपलं
पदरावती नाच रे मोरा.

विभा हसतच सुटली ऐकून. थांबेचना तिचं हसू. हसतेय, हसतेय नुसती. खळखळून. शेवटी राकेश डोकावून गेला काय झालं म्हणून.

मी म्हटलं, *नुसतं चिअर्स केलं तरी चढायला लागते की काय तुला भवाने ?*

तर म्हणाली, अगं तू हे कवितेसारखं बोललीस, म्हणून हसू आलं. तू लिहायला का नाही सुरूवात करत ? नुसती घरी बसून असतेस रिकामी, तर लिही तुझे अनुभव. आत्मचरित्र लिहायला पाहिजे खरंतर तू सगळं. मी करेन की मदत तुला.

लिहायचं ? आणि मी ? हॅ...! कसली भंकस करते. वाचायचासुद्धा कंटाळा येतो, तर लिहीत कोण बसणार ? फार तर तू लिही, मी सांगते. च्यायला... ॲरोबिक्सच्या तीन सलग बॅचेस सुद्धा घेईन मी अजूनही, कुणी चॅलेंज दिलं तर; पण तीन शब्द एका रांगेत नाहीत लिहिता येणार आपल्याला. तेवढं सोडून बोल. असलं काय सांगत बसलीस, तर दारू चढणार नाही आणि चढलेली असलीच तर खाडकन् उतरेल. आपल्या हातात पेन येणार ते फक्त सहीपुरतं. लिहायच्या कंटाळ्यानं पूर्वी तर चेकबुक आलं की सगळ्या चेक्सवर सह्या करून ठेवायची मी. पण मग विठ्ठलनं शेण खाल्ल्यापासून ते बंद करून टाकलं. जो खोट्या सह्या करून पैसे काढतो, त्याच्यावर काय भरोसा ठेवणार ?

पण मग काय केलंस तू त्यानंतर ?

विनिताच्या बँकेत अजून एक अकाउंट काढलं गुपचूप. आणि सगळं चेकबुक वगैरे तिच्याचजवळ ठेवलं. अस्मिताला सांगून ठेवलंय फक्त.

एक जॉइंट अकाऊंट काढ ना त्यापेक्षा आता दोघींच्या नावावर. तुला कधी त्रासबिस झाला, अचानक गरज लागली तर अस्मिता काढू शकेल पैसे.

हरकत नाही तसंही करायला. सोयीचं होईल ना ते अगदी.

तुझ्या नवऱ्याचा काही भरोसा देता येत नाही बाई. तो केव्हा कसा वागेल काहीच खात्री नाही. म्हणून आपली आपण तरतूद करून ठेवलेली बरी केव्हाही.

अगं आता काय सांगणार तुला ? हा मादरचोद विठ्ठल... औषधं घेऊन येतो माझी आणि सगळी बिलं माझ्या हातात ठेवतो. गेल्या दोन महिन्यांपासून तर आधीच पैसे मागून घेतो. आपलं आजारपण, तर खर्च आपला आपणच करायचा. माझ्याजवळ पैसे नाहीत अशातला भाग नाही; पण ही जी अशी हलकट वृत्ती आहे, तिच्यानं संताप होतो.

पण हे काय तुझं एकटीचं आहे का ? सगळीकडेच असं आहे. आता शलाकाच्या सासरचे तरी का बघतात तिच्याकडे? घर मुलाच्या नावावर आहे. सुनेला बाहेर काढता येणार नाही. काढलं तर ती हिस्सा मागेल. मग राहील त्यात यांचं भागणं मुश्किल. त्यापेक्षा ठेवा सुनेला घरात. नाहीतरी मरण दिसतंयच तिचंही डोळ्यांसमोर. बाहेर जाऊन बडबडली तर लोकं आपलं जगणंही अवघड करतील, म्हणून भीती वाटते सगळ्यांना. बाई ग, लोकांच्या

अशा वागणुकीमुळेच तर पॉझिटिव्ह असलेली माणसं नुसतं बोलायलाही घाबरतात, लिहिणंबिहिणं तर दूरच्या गोष्टी.

मग मला एकदम वाटलं... खरंच, काय हरकत आहे लिहायला ? नाहीतरी आता माहिती झालंच आहे लोकांना न् काय भलं-बुरं वागवायचं ते वागवताहेतच लोक. लिहूनच टाकू भेंचोद सगळं बिनधास्त. काय वाईट व्हायचं राहिलंय आता की घाबरावं ?

विभाला म्हटलं, *खरंच लिहूयात जान आपण. मी सांगते तुला सगळं. तू लिहायचं. तुझी वाक्यरचना मस्त असते एकदम कवितेची. झकास लिहिशील.*

तिला फटकन हसू आलं. कवितेची वाक्यरचना ? कवितेत वाक्यं असतात का ग बाई ?

आता या भानगडी आपल्याला काय कळत नाहीत. ऐकायला चांगलं वाटतं ना ? झालं. त्याला वाक्य म्हणायचं की काय, ते तू तुझं बघ.

विभाची आई भुणभुण करत होती, *माझी तब्येत ठीक नसते. माझ्यामागे तू एकटी पडशील. त्यापेक्षा दुसरं लग्न कर.*

हे तिनं सांगितल्यावर मीही तिला म्हटलं, *करून टाक. सोबत मिळेल तुलाही.*

तर म्हणाली, *नको. आता नाही हिंमत होत असा काही निर्णय घ्यायची. आपल्या वाईट अनुभवांची सजा दुसऱ्या कुणी का भोगायची अकारण ? माझ्यातच इतके दोष आहेत, इतके न्यूनगंड आहेत, त्यांचं काय करणार ? आणि शरीराच्या जखमा बऱ्या झालेल्या असल्या तरी व्रण अजून शिल्लक आहेतच. अशा छातीवर न् मांड्यांवर डागल्या-भाजल्याच्या खुणा घेऊन मी कुणासमोर कपडे काढण्याची हिंमतच नाही करू शकणार. म्हणजे त्यामुळे आलेल्या कुरूपपणाची लाज वाटते म्हणून नाही केवळ, तर हे सगळं घडू दिलं निमूटपणानं याचीही लाज वाटते म्हणून. उगाच कुणी दया दाखवावी अन् माझ्याविषयी कणव बाळगावी, हेही नाही आवडणार आता मला. सोबत हवी वाटते, हे खरंय; पण आता कुठल्याही अनुभवाला निखळपणे सामोरं नाही जाता येणार. आणि लग्न केल्यानं सोबत मिळते, याचा विश्वासही नाही वाटत आता. आणि स्पष्टच सांगायचं तर भीतीही वाटते. काय भरोसा देता येतो कुणाही पुरुषाचा ? वरवर चांगली दिसणारी माणसं आतून किती किडलेली असतात, हे कसं कळणार ?*

पण तुझ्या नवऱ्यानं केलंच ना दुसरं लग्न, तर तू का नाही करायचं ?

नवऱ्यानं केलं म्हणून मी करायचं हे तर्कट काही बरोबर नाही. त्याचा काय संबंध ? आता काही का करेना तो. मला काय वाटतंय, काय हवंय हे पाहिलं पाहिजे त्यापेक्षा. भलता निर्णय घेऊन उगाच आगीतून फुफाट्यात पडेल झालं. त्यापेक्षा चाललंय ते ठीक चाललंय. एकटी तर एकटी. जोपर्यंत लिहायला सुचतंय आणि सुचलेलं लिहिता येतंय, तोपर्यंत प्रश्न नाही. लिहूया आपण तुझी गोष्ट.

यावर आपण काय बोलणार ? प्रत्येकाचं डोकं वेगळं चालणारच. पुन्हा विभा तर खास डोकेबाज बाई. पण लिहिणं इतकं तगवणारं असतं ? माणसांच्या जागा भरून काढेल इतकं ? कोण जाणे ? कुणाला कशाचा आधार वाटेल, सांगता येत नाही.

आता जुळी मैत्रीण म्हटल्यावर विभाला माहीतच होत्या माझ्या कितीतरी गोष्टी. जवळपास सगळ्याच. वेगळं काही सांगावं लागण्याची गरज नव्हती. त्यामुळं ती म्हणाली, *मी सुरुवात तर करते लिहायची. वाटलं तर अडतंय किंवा लिहावं की नाही, तर विचारेन तुला मधूनमधून.*

मग लिहिणं सुरू झालं बाईसाहेबांचं. परत आठवडाभरानं आली. म्हणाली, *तुला नमुन्याचा एखादा प्रसंग वाचून दाखवते. कपाळावर इतक्या आठ्या नको पाडू. वाचायला नाही सांगतंय तुला, वाचून दाखवते म्हटलंय मी. आणि तेही एवढ्यासाठी की म्हणजे तुझं काही ऑब्जेक्शन आहे का किंवा काही कमीअधिक वाटतंय का ते आताच सांग. त्यानुसार लिहीन पुढचं.*

म्हटलं, ठीकाय जान. वाच.

तर मध्येच तो लहानपणचा प्रसंग आला...

अनुक्रमणिका

नानांच्या मित्राचा... थोडं कानकोंडं वाटलं ऐकायला लागल्यावर, संकोचल्यासारखंही...! वाटलं, हे सगळं नानांनी वाचलं तर ? पण झटकून टाकलं मग सगळं डोक्यातून आणि ऐकू लागले.

नेहमीसारखं वेदनांनी कळवळणारं अंग गोळा करताना त्या दिवशी मला लख्ख जाणवलं की, हा माणूस हे जे काही करत आलाय आपल्या शरीरासोबत ते आपल्याला भयानक वेदना देणारं तर आहेच... पण ते इतकंच नाही... तर ते अधिक काहीतरी आहे... चुकीचं, समाजालाच मान्य नसलेलं, घातक परिणामांचं, गैर...

आणि तिरस्काराची लाल-हिरवी काटेरी बोंडं निवडुंगावर तरारून फुलून आली... नष्ट न होणारी... कायमस्वरूपी.

जाणवलं, जर असं असेल तर सुरूवात या काकापासूनच केली पाहिजे. यापुढे आपण कुठलीही वेदना सोसायची नाही. काहीही झालं तरी बेहत्तर. विश्वास नाही ना नानांचा, लक्ष देत नाहीत ना ते, तर पळून जाऊ आपण इथून कुठंतरी किंवा मरून जाऊ सरळ. काहीही करू, पण आता गप्प बसायचं नाही.

तिला म्हटलं, *थांब जरा. श्वास घेऊ दे. हे असलं आपलंच ऐकायचं म्हणजेही तापच भेंचोद. पण नुसतं डोक्यात ठेवणंही बरोबर नाहीच. आजी म्हणायची बघ लहानपणी की, फुटका आरसा घरात ठेवू नये; आपला चेहराही तडकलेला दिसत राहतो त्यामुळे. तसंच की गं हे सगळं. बरोबर आहे तू लिहितेस ते. पण एक-दोन दुरुस्त्या कर.*

कुठल्या ?

त्या भडव्याला अहोजाहो कशाला लिहिलंस ? नुसतं वय मोठं म्हणून ? अजिबात तसं लिहायची गरज नाही. ज्यालात्याला ज्याचीत्याची पायरी दाखवली पाहिजे न् त्याच पायरीवर ठेवलं पाहिजे. आणि माणूस कसं काय म्हणू शकतेस तू अशा हलकटाला. बदलून टाक तो शब्द !

विभा खिन्न हसली. म्हणाली, *बदलते.*

आणि सालं ते निवडुंगाचं कसं सुचलं जान तुला ? म्हणजे आमच्या गावाकडं असायचे असे निवडुंगाचे फड कितीतरी पसरलेले. दुरून इतकी मस्त दिसायची ती बोंडं. खाऊन पहावी वाटायची. तर मग कुणीतरी सांगितलं की ती विषारी असतात म्हणून. असे शब्द लिहायचे हे कसं कळतं तुला ?

आता प्लीज असलं काहीतरी विचारत बसू नकोस. मी कॉलेजातल्या सारखं लेक्चर सुरू करेन आणि थेट पन्नास मिनिटांनीच थांबेन. पुन्हा ते सगळं तुझ्या डोक्यावरून जाईल, तर अजून वैताग देशील. विभानं हात जोडले हसतहसतच.

आता हसायला काय झालं ?

काही नाही गं... तू कवितेतली वाक्यं म्हणाली होतीस ते आठवलं च्यायला...

मी अवाक् होऊन बघतच राहिले. म्हटलं, *च्यायला ? आणि तेही तुझ्या तोंडात ? बरी आहेस ना ?*

मग तिला पुन्हा हसायला आलं. म्हणाली, बघ तुझ्या संगतीचा परिणाम. आणि तुझी गोष्ट शक्य तितकी तुझ्या भाषेत लिहायचा प्रयत्न करतेय ना... तर हे असं होणारच.

तू काय पुस्तक लिहितेयस् ? समजलं तेव्हा विठ्ठल भडकून म्हणाला.

हो.

कशासाठी ? उरलीसुरली इज्जत घालवायला ?

तडकलंच डोकं. सण्णकन् सणकच गेली आरपार मेंदूतून.

इज्जत ? तू जे काही धंदे करत आलास आजवर, तेव्हा नाही कधी अशी धास्ती वाटली रे तुला इज्जत जाण्याची. डान्सबारच्या पोरींवर माझ्या मेहनतीच्या कमाईचे पैसे उडवले, त्यानं इज्जत नाही गेली तुझी. माझी नकली सही करून बँकेतून पैसे काढलेस, आणि मला खोटं बोलायला लावलंस त्या मॅनेजरशी, पुन्हा वर मान करून भांड-भांड भांडलास माझ्याशी... हे इज्जत राखणारं होतं ? जितूच्या मेडिकलच्या ॲडमिशनची खात्री नव्हती, त्यावेळी पैसे चारून जातीचा खोटा दाखला मिळवला होतास तू... एस. टी. आहोत म्हणून. नशीब की जितूनं

झिडकारून लावली तुझी आयडिया. केवढं महागात पडलं असतं त्यालाच ते उघडकीला येतं तर. तेव्हा झालाच असता ना इज्जतीचा फालुदा ? आयुष्य बरबाद झालं असतं पोराचं. तू घरात बायका आणल्यास, लोकांचे पैसे बुडवलेस, ऑफिसात लाच खातोस... यानं नाही जात तुझी इज्जत? मी पुस्तक लिहिल्यानं इज्जत जातेय तुझी ? इज्जतीच्या गोष्टी बोलतोय माझ्याजवळ.

याचे परिणाम ठीक होणार नाहीत. सांगून ठेवतो... विठ्ठल म्हणाला.

जे लिहायचं ते लिहीन मी. नाय घाबरत तुला. काय करशील ? करच काय करायचंय ते. मी काय तुझ्या घरात रहात नाही की तुझ्या पैशावर जगत नाही. पर्वा नाही मला तुझ्या धमक्यांची. सालं, नीट शिकले नव्हते न् कमावत नव्हते धड, आणि नानांचा सपोर्ट नव्हता काडीचा; म्हणून तुझं वागणं सहन करत राहिले मुकाट्यानं. नंतर पोरांकडे बघून गप्प बसले. आता नाही गप्प बसणार. मी फाडकन् बोलले.

लोक तुझीच टिंगल करतील. काय गरज आहे घरातल्या गोष्टी बाहेर बोलायची तरी ? कशाला जायचं त्या सोबतच्या मिटिंग्जना ? गप्प नाही का बसता येत ? आणि आता हे सगळं लिहिणार म्हणजे जगजाहीर करणार आपलं खाजगी आयुष्य. लोकांना काय... मजेत चघळतील सगळ्या गोष्टी. स्वतःला अक्कल नको का काही की कितपत न् काय बोलावं - सांगावं-लिहावं याची ? आत्मचरित्र लिहायला काय तुम्ही महान कर्तृत्व केलंय की, युद्ध जिंकलंय कुठलं ? एडस् झाला ही केवढी लाजीरवाणी गोष्ट आहे... न् घरात तोंड लपवायचं सोडून या बाईसाहेब स्वतःहून चौकात नागडं व्हायच्या गोष्टी करताहेत.

असं पुष्कळ काहीबाही बडबडत तणतणत राहिला तो.

अखेर माझ्या बेडरूमचं दार धाडकन आपटून बंद करून बाहेर निघून गेला.

मी मनात म्हटलं, *खुश्शाल आदळआपट कर हवी तेवढी. पर्वा नाही. मला वाट्टेल ते मी करेन. साला... मेरी मर्जी !*

तरी एकप्रकारचा ताण आलाच मनावर. न राहवून विभाशी बोलले सगळं.

ती म्हणाली, *हे असं होणार हे माहीत होतंच मला. पण तू हिंमत दाखवलीस ते बरं केलंस. अशीच ठाम रहा. फारतर इतक्यात बोलूच नकोस कुठे आपलं लिहून पूर्ण होईपर्यंत. म्हणजे नीट मोकळेपणानं लिहिता येईल आपल्याला. कुठलाही कुणाचाही दबाव नसताना.*

पण तो म्हणत होता की, लोक तुझीच टिंगल करतील. मी म्हटलं. तो जे जे काही बोलला ते सगळं तिला सविस्तर सांगितलं.

विभा म्हणाली, *मोकळेपणानं काही बोलणं, सांगणं... हे आपल्याकडे तितकंसं सभ्यतेचं मानलं जात नाही. मोकळेपणानं हसणं, रडणंदेखील ! एकुणातच अत्यावश्यक असल्यासच आपल्या भावना, आपले विचार, आपली मतं आपण सौम्यतेनं, सभ्यतेच्या आवरणात विशिष्ट मर्यादेतच - या मर्यादांच्या रेषा पुन्हा प्रत्येक समूहानुसार वेगवेगळ्या असतात - प्रकट करावीत; प्रकट न केलेली अधिक बरी... असा संकेत आहे. मोकळं बोलणं, लिहिणं म्हणजे स्वतःला एक्स्पोज करणं का? ऐकणारे कंटाळतात किंवा माघारी टिंगल करतात. अडचणी वा प्रश्नांबाबत बोललं जात असेल तर सहानुभूती मिळवण्यासाठी हे चाललंय का, अशी शंका निर्माण होऊ शकते समोरच्यांच्या मनात. आणि लिहिणं हे बोलणं या गोष्टीचंच एक्स्टेंशन आहे, असं मला वाटतं. विठ्ठल भीती वाटणं स्वाभाविक आहे. अनेक माणसांना नाही आवडत असं एक्स्पोज होणं. पुन्हा तू काही कथा-कादंबरी लिहीत नाहीयेस की काल्पनिक म्हणता येईल. थेट नावा-गावानिशी स्पष्टपणे मांडल्या जाणार गोष्टी आत्मचरित्रात. तेही केवळ तुझ्या बाजूने, तुझ्या एकटीच्या दृष्टीकोनातून. त्यामुळे ते आवडणार नाहीच त्याला.*

पण म्हणजे आता काय आपण लिहायचंच नाही का काय ?


असं कुठं म्हणतेय मी ? आपण लिहितो

आहोतच. इथं त्याच्या परवानगीचा प्रश्नच उद्भवत नाही. छापायचं की नाही, हे मात्र ठरवता येऊ शकतं. जर तुला भीती वाटत असेल की, तो काही त्रास देईल वगैरे... तर न छापण्याचा निर्णय घेऊ शकतेस तू.

छ्या ! विठ्ठलला काय घाबरायचं ? मी तर त्याला सुनावलंय सरळ. कलटी मार, म्हटलं. कशाला डोकं पकवून घ्यायचं जान खालीपिली ? आपण जर लिहिलंय तर ते छापायलाच पाहिजे. फुकट एवढे कागद खरडणार का तू ? केवढी मेहनत लागते त्याला. मला तर सालं सही करायचं सुद्धा जीवावर येतं. हात दुखतात काही लिहायच्या नुसत्या कल्पनेनंही. एवढी मेहनत करून लिहिलेलं छापलं नाही, तर उपयोग काय ? ते काय भेंचोद प्रेमपत्र आहे की काय, चंदनाच्या पेटीत जपून न् लपवून ठेवून द्यायला ?

मग असं करूया... आपण पुढच्यावेळी सोबतमध्ये गेलो की जे. डीं.ना भेटूया. त्यांची अपॉइंटमेंट घेऊनच जाऊया आधीच. लेनिना सध्या पुष्कळ बायकांकडून त्यांच्या कहाण्या लिहून घेतेय थोडक्यात... त्यांच्या त्यांच्याच शब्दांत. मला विचारलंय तिनं त्या कहाण्यांचं संपादन करशील का म्हणून. तेव्हा, आपण तुझं आत्मचरित्र लिहितोय, हे सांगितलं होतं मी तिला. सोबततर्फे ही दोन्हीही पुस्तकं प्रकाशित करता येतील, असं जे. डी. म्हणालेत म्हणे. तशी त्यांची इतरही काही पुस्तकं पाहिलीत मी. कायदेविषयक आहेत. विशेषतः स्त्रियांशी न् आदिवासींशी संबंधित कायदे. आदिवासींविषयीही काही पुस्तक आहेत. खेरीज सध्या सोबतची वेबसाइट बनवण्याचं कामही चाललंय. ती इंग्लिशसोबत हिंदी न् मराठीतही असावी, असं म्हणताहेत. तर त्या ट्रान्सलेशनचंही काम असणार आहे त्यांच्याकडे. एड्स्‌विषयक काही पुस्तिका करायच्यात अजून... विशेषतः कुमारवयीन मुलामुलींसाठी. पुष्कळ गोष्टी आहेत तिथं मला करण्यासारख्या. ते सारं बोलायचं आहेच एकदा आम्हाला. तर त्यावेळी तूही चल. विभा म्हणाली.

गेलोत दोघीही एक दिवस ठरवून सोबतमध्ये. इथं जे.डीं. समोर तरी शिव्याबिव्या देत बोलू



नकोस कृपया. विभा माझा हात दाबत दबक्या आवाजात म्हणाली होती आल्याआल्याच. त्यामुळं सावरून नीट चांगले शब्द आठवून बोलायची कसरत करायला लागणार होती. फुकटचा ताप साला.

आता माझ्या खाजगी गोष्टी या त्याच्याही खाजगी गोष्टी आहेत, याला माझा काय इलाज ? पण आम्ही काही त्याची बदनामी करायला, कुणाला दुखवायला किंवा दुसरा काही स्वार्थ साधायला लिहीत नाही आहोत. असा काही हेतू कधीच नाही माझा लिहिताना... वागतानाही नसतो ! मी जे. डीं.ना म्हटलं. माझ्या जवळच्या मैत्रिणींच्या कहाण्या त्यात असणार आहेत आणि घरचे लोक आणि माझी प्रेमाची माणसंदेखील. केवळ विठ्ठलच नव्हे, तर विनिता, विभा, नील, नाना, रैनामॅडम, माझी पोरं - जितू न् अस्मिता... कितीतरी लोक येतील.

विभा म्हणाली, *आता कथा-कादंबऱ्या लिहिणारे लेखक जे लिहितात ते सुद्धा सगळं कुणाचं न् कुणाचं खाजगी असतंच... तरी या गोष्टी सार्वत्रिकही असतातच ना ? किती समांतर अनुभवातून जात असतात माणसं. मला वाटतं की, एकांगी, एकरंगी होऊ न देता माणसं त्यांच्या साऱ्या छटांनिशी लेखनात यावीत. तसा प्रयत्नही करतोहोत आम्ही. कितपत जमतंय माहीत नाही. पण जाणीवपूर्वक कुणाची बदनामी करण्याचा मात्र आमचा हेतू नाही.*

हो. असा हलकटपणा तर मी शत्रूच्या बाबतीतही नाही करणार कधी. माझं कुरापती काढणं, टीका करणं हे समोरच्याच्या नाराजीचा धोका पत्करूनही थेट खुल्लमखुल्ला आमोरासमोर केलं जातं. आणि दुसऱ्या कुणी माझ्या दोषांची यादी वाचून दाखवली तरी तीही मी मोकळेपणाने ऐकू घेते. चुकलं असेल तर कबूल करते. चूक दुरुस्त करण्यासारखी असेल तर करते. गुन्हा असेल तर शिक्षाही सोसते. मागे निंदानालस्ती काय बहुतेक लोक करतात, आणि बहुतेक लोक जे करतात, तेच आपण करण्यात काय मजा ? पण जर असे खुलासे करत बसावं लागणार असेल, तर त्यापेक्षा न लिहिलेलंच बरं असंही वाटायला लागतं मग. मी म्हटलं.

आपण सोबतच्या गटचर्चांमधून बोलतो. किंवा आता आपले अनुभव लिहितो आहोत. या सगळ्याची - बोलण्याची / सांगण्याची / लिहिण्याची / त्या अनुषंगानं दुसऱ्याचं म्हणणं ऐकण्याची - आपल्याला गरज का वाटते ? आपण एखादी गोष्ट मोठ्यानं - म्हणजे मनातल्या मनात किंवा स्वतःशी पुटपुटत नव्हे - बोलतो, तेव्हा आपले विचार नीट शब्दबद्ध होत जातात आणि अधिक सुस्पष्ट होतात. दुसरं म्हणजे शेअर करणं किंवा सहभाग मिळवणं आपल्याला स्वाभाविकरित्या गरजेचं वाटत असतं. आता - सहमती / पाठिंबा / सहानुभूती / सहकार्य / तिरस्कार / विरोध / नकार / तडजोड अशा प्रतिक्रिया त्यातून मिळतात. त्यातून आपली भूमिका अधिक स्पष्ट व स्वच्छ होत जाते. एकतर ती बदलते किंवा अधिक ठाम बनते. पण प्रत्येकवेळी बोलण्यासारखं विश्वासाचं, आपलं म्हणणं समजून घेईल अशा क्षमतेचं, आपलं ऐकण्याला वेळ देऊ शकणारं माणूस समोर असेलच याची खात्री नाही. त्यावेळी आपण लिहितो. खाजगी पत्रापासून ते प्रकाशित करण्यासाठीच्या पुस्तकापर्यंत अनेक तऱ्हांनी. या सगळ्यातून कधी थेट, तर कधी दुसऱ्या पात्रांच्या आडोशानं आपण स्वतःला आणि आपल्या चष्म्यातून दिसणाऱ्या इतर अनेक व्यक्ती, घटना, स्थळं, विचार, भावना यांनाही एक्स्पोजच करत असतो. सांगणं हे आत्मचरित्रात सरळ समोरून धडकच मारतं. इतर साहित्य प्रकारांतून कलात्मक होत, सार्वत्रिक वा वैश्विक होण्याचा प्रयत्न करत आडवळणानं ते जवळ येऊन थांबतं. मग काल्पनिक की वास्तव आणि खरं की खोटं आणि हे सांगणं योग्य की अयोग्य आणि ज्या रीतीनं जशा शब्दांत सांगितलं गेलंय ती रीत कशी आहे... अशा चर्चा सुरू होतात. तुम्ही सांगितलेले कंटाळा, टिंगल इत्यादी सर्व मुद्दे इथंही उपस्थित होतात. लेनिना म्हणाली.

लेनिनाशी बोललं की मस्त वाटतं, हे खरंच. ती डोकेबाज आहेच. खेरीज तिच्या आवाजात जो आत्मविश्वास, ठामपणा आणि काहीशी डॉमिनेटिंग जरबसुद्धा आहे; त्यामुळे जे काही ती सांगते त्याला जबरदस्त वजन प्राप्त होतं. आणि तिनं सांगितलेलं

अनुक्रमणिका

पटो वा न पटो, मान्य करावं असं वाटायला लागतं.

जे. डी. शांतपणे ऐकत होते. लेनिनाचं संपल्यावर ते म्हणाले, मला असं वाटतंय की, या सगळ्या बोलण्या-लिहिण्यामागचे हेतू काय, यावर आपली नैतिकता तोलली जाते... आणि खरा पेच मला वाटतं इथं आहे. तुम्ही असा विचार करा की, आत्मचरित्र लिहावं असं तुम्हाला का वाटलं ? तुमचे हेतू काय आहेत ?

हेतू ? खरं सांगू का... आपले अनुभव लोकांपर्यंत जावेत, एक अवेअरनेस त्यातून तयार व्हावा, असं वाटतं. अर्थात माझा हा भ्रम नाही की, दुनियाभरची लोकं माझं पुस्तक वाचतील आणि वाचल्याक्षणी जादूची कांडी फिरल्यासारखं चांगलं वागायला लागतील. पण निदान लोकांना हे माहीत होईल की एड्स झालेली एखादी व्यक्ती कशा मन:स्थितीतून जाते, तिला कशा शारीरिक वेदना भोगाव्या लागतात, या आजाराचं वास्तव काय आहे, समाजानं त्यांना इतकी वाईट वागणूक देणं टाळता येणार नाही का... अशा पुष्कळ गोष्टी. काहीतरी लिहून प्रसिद्धी न् पैसा न् अमूकढमूक मिळवावं, असाही काही माझा हेतू नाही. मी मला काय वाटतंय ते सभ्य शब्दांत, त्यातल्या त्यात व्यवस्थित सांगण्याचा प्रयत्न केला.

झालं तर मग. बाकी काही विचार न करता मोकळेपणानं लिहा. वाटलंच तर नंतर एडिटिंगच्या वेळी करू काही विचार. लिहिताना असं काही डोक्यात ठेवू नका आता. आणि हे ध्यानात ठेवा की, नुसत्या आपसातल्या चर्चेपेक्षा खुलेपणानं बोलणं आणि बोलल्याप्रमाणे वागण्याची दक्षता घेणं यांचं महत्त्व आज आणि उद्याही आहेच. जे.डी. निरोपाचं बोलत म्हणाले.

आम्ही उठून निघालो.

बिनधास्त लिही रचिता. आणि बोलतही जा न घाबरता. अनेकांना तर जागाच नसतात बोलायलासुद्धा. अगं... समुपदेशकाकडे अनेक माणसं निव्वळ मोकळं बोलता यावं, म्हणून जातात; हे माझं एक निरीक्षण आहे. आमच्यासोबत जे.डी.च्या केबिनमधून बाहेर येताना लेनिना हसत-हसत म्हणाली.

होय तर. घाबरायचं काय कारण ? दुनियेत मी काही एकटी नाहीये एड्स् झालेली. लाखो बायका आहेत. मला काही लाजबिज नाही वाटत त्याची. होतात कोणाकोणाला कसकसले आजार... तसा मला एड्स झालाय, इतकंच. लोकं साले स्वीकारत नाहीत हे सहजपणानं. म्हणून तर लिहावं असं वाटलं. आणि आता आपण रोज इतक्या बायकांचं इतकं सगळं ऐकतोय की सालं खाजगी वगैरे काही नसावंच दुनियेत असं वाटतंय मला. आपण बोलत नाही, लिहीत नाही, सांगत नाही... तोवर या लोकांचे भ्रमही असेच कायम राहतील. कुणाच्या दुनिया किती आबादीआबाद आहेत आणि कोण जात्यात न् कोण सुपात आहे, हेही कळलंच पाहिजे माणसाला कधी ना कधी. लपवतो आणि म्हणूनच सोसतो च्यायला आपण. आता मी जर बोंब ठोकली असती लहानपणी बलात्कार झाला तेव्हा, तर कदाचित पुढे लग्नाबिग्नात अडचणी आल्या असत्या; पण पुन्हा मला बोट लावायची हिंमत नसती झाली त्या हलकटाची. आणि पुढे कधीतरी आक्काशी बोलताना समजलं की तिलाही ट्राय केलं होतंच त्यानं एक-दोन वेळा. मग असा अजून किती मुलींचा वापर केला असेल त्यानं देव जाणे. हे सारं टळलं नसतं का मी वेळीच बोंबाबोंब केली असती तर ? सांगितलं पाहिजेच ! मी ठामपणानं म्हटलं.

मला तर लिहिणं ही अगदी प्राथमिक गरज वाटते आजकाल. अर्थात माझ्या मर्यादा मला नीटच माहीत आहेत. इतकीच माझी कुवत आणि इतकंच मला जमणार ! याहून चांगलं लिहिता आलं पाहिजे, पण येत नाही. अर्थात कधीकधी वाटतं की, इतकं जमतं तेही नशीब. ज्यांना लिहिता येत नसेल ती माणसं कशी जगत असतील ? कशी सोसत असतील ? सारं असह्य झाल्यावर ती काय करत असतील ? मला जर कधी लिहिता येईनासं झालं तर काय होईल ? मरता येईनासं झाल्यावर देखील जगत राहावं, तसं नुसतंच जगत राहता येईल का ? कठीण आहे. विभा म्हणाली.

बरोबर आहे रचिता, तू म्हणतेस ते. प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना बाळगण्यात काय अर्थ आहे ?

लेनिना म्हणाली. *माझी एक मैत्रिण आहे. लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरलेल्या काही लहान मुलींना सांभाळते ती. आणि तिच्याकडे असलेल्या मुलींची कॅटॅगिरी माहिताये ? वडिलांकडून बलात्कार झालेल्या मुली आहेत त्या सगळ्या. तुझ्या वडिलांनी दुर्लक्ष केल्याचं एवढं दुःखं वाटतंय तुला... या मुलींना भेटशील तर काय म्हणशील मग ? म्हणजे तुला झालेला किंवा अद्यापही होणारा त्रास मी कमी लेखत नाहीये; प्रत्येक केस वेगळी असते आणि तिचं महत्त्वही तिच्या जागी असतंच... पण बघ ना तुझी तूच तुलना करून.*

बरोबर आहे तुझं. मी कसनुसं म्हटलं.

नुसतं ऐकूनच मन कडवट होऊन गेलं होतं. आणि त्याचवेळी अशा मुलींना सांभाळण्याची, वाढवण्याची धमक दाखवणारी एक बाई आपल्याइथं आहे, याचा खूप अभिमानही वाटला.

पॉझिटिव्ह बायका-मुलींना बेसिक व्यायामपद्धती शिकवायला जायचं ठरलं, तेव्हा मी आणि विनितानं लेनिनासोबत बसून आखणी केली होती. मुंबई, ठाणे जिल्हा, नवी मुंबई, रायगड जिल्हा न् पुणे अशा विभागात असलेली शेल्टर्स पहिल्यांदा निवडली. लेनिनाचं त्या सगळ्या शेल्टर्सच्या प्रमुखांशी बोलून झालं. *सोबत* तर्फेच हा उपक्रम राबवण्यात येणार होता.

त्यावेळी जी पहिली पाणी आम्ही केली, त्यात नवी मुंबईतल्या एका शेल्टरमध्ये अशा लहान मुली होत्या... लैंगिक अत्याचारांना बळी पडलेल्या. कसले भेसूर होते त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव. एक बारा-तेरा वर्षांची मुलगी तर इतकी देखणी होती. अगदी ऐश्वर्या रायची डुप्लिकेट म्हणून खपली असती. तिचे डोळे निळसर झाकेचे होते; पण उजाड, ओसाड; मे महिन्याच्या भर दुपारच्या पांढुरक्या - निळ्या, गरम झळांनी व्यापलेल्या हवेतल्या आकाशासारखे. मी फालतू जोक मारून त्या सगळ्यांना हसवण्याचा प्रयत्न करत होते, तेव्हा ती अगदीच नाइलाज झाल्यासारखं कसनुसं हसली. व्यायामालाही कुणीतरी जबरदस्तीनं ढकलल्यासारखी पुढे आली.

त्या रात्री मला पापण्या मिटताच येईनात.

डोळ्यांत खूप काही अडकलं होतं. अश्रूंमधून ते वाहून जाईल म्हटलं, तर डोळे कोरडेठक्क पडले होते. काय कसं बाहेर काढावं डोळ्यांतून ते कळत नव्हतं... त्या मुलींच्या फाटलेल्या रक्तबंबाळ योन्या, त्वचेवरचे असंख्य खोल ओरखडे, टाळूवरचे उपटले गेलेले केसांचे पुंजके, तोंडात बोळे खुपसल्यानं चिरलेली जिवणी, लडखडणारे पाय, विक्षिप्त हलणारे हात, पकड न राहिलेली बोटं...

शरीरानं हळूहळू त्यातल्या काहीजणी नॉर्मलवर येऊ लागल्या होत्या कदाचित, पण एकूण त्यांचं बोलणं वागणं दिसणं असणं अतोनात बदलून गेलेलं होतं. एक प्रकारचा भकासपणा त्यांना व्यापून त्यांच्यातून उतू जात होता. आमच्यासारख्या बघणाऱ्यांच्या अंगाला वाहत येऊन चिकटत होता. रंध्रारंध्रातून त्वचेत घुसत होता. रक्तात मिसळत होता.

आपण या रेषेच्या अल्याड राहिलो... पण कुठल्याही क्षणानं आपल्याला पल्याड नेलं असतं, ही विचित्र भयाची जाणीव मला छळत कुरतडत होती. आमच्यात धुमसत राहिलेला हा छळ... हा छलात्कार कधीही न संपणारा होता...

कितीजणींच्या किती गोष्टी डोळ्यांत रुतून टोचत राहिल्या कितीतरी रात्री...

आणि माझे डोळे सताड उघडे... पापण्या जणू कधीच मिटवता येणार नाहीत...

मला धमकावता धमकावता अखेर स्वतःच मरून गेला विठ्ठल.

एड्सला घाबरून त्यानं पळ काढला दुनियेतनंच.

मला वाटायचं की, तो पुरेपूर निर्ढावलेला आहे. आणि टोकाचा निर्लज्ज. पण तो तसा नव्हता. असता, तर त्यानं आत्महत्या केली नसती.

कुठल्या जागा हळव्या राहिल्या होत्या त्याच्या ? ज्या मलाही माहीत नव्हत्या ? तसं तर खरंच काय माहीत होतं मला त्याचं ? अगदी, त्यानं माझ्याशी का उभा दावा धरला कायम... काहीएक

कारण नसताना... हे कधीच कळलं नाही मला.

माझं काही चुकलं होतं का त्याच्याबाबतीत ? काय ?

कळत नाही काहीच.

हे लिहायचं का आत्मचरित्रात ? म्हणजे काही गोष्टी आपल्याला कधीच कळत नसतात, हे ?

लिहायला हवं.

विभाला फोन केला ये म्हणून. तिच्या कॉलेजात कायतरी कार्यक्रम होते. ते उरकून आली. कशी झाली भाषणं विचारलं तर म्हणाली, *वाईट्ट ! काय भाषणं तरी एकेक. म्हणे, 'प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते.' वैतागलेच. वर्षानुवर्षं तेच डायलॉग मारून कंटाळत कसे नाहीत लोक. मग मी म्हटलं, 'प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे एक अयशस्वी पुरूष असतो. तो नालायक निघाल्यामुळे तर बाईला आपली लायकी दाखवण्याची संधी मिळते ना !' मग वैतागण्याची पाळी इतरांची होती अर्थातच. असे नमुने आहेत आमच्या कॉलेजात एकेक...*

विभाला म्हटलं, *कधीकधी मला असा प्रश्न पडतो बघ की, आपण असे का वागतो ? म्हणजे आपण सगळेच. विठ्ठल असा का वागला, असा प्रश्न असेल; तर मी अशी का वागले, असाही प्रश्न पडला पाहिजेच ना च्यायला.*

असा म्हणजे कसा ?

म्हणजे हेच ग... अनेक बायकांशी संबंध ठेवण्याची गरज त्याला का वाटली असेल ? आणि घरात मला अजिबात स्पर्शही करायचा नाही, असं त्याच्या मनानं का घेतलं असेल ? जर मी आवडले नव्हते तर त्यानं माझ्याशी लग्न का केलं ? केलं तर निभावलं का नाही ? मी जर इतकी वर्षं केवळ मुलांपायी नृ आर्थिक अस्थिरतेच्या भीतीपायी त्याच्यासोबत नांदत राहिले होते, तर स्वतःच्या पायावर उभं राहिल्यावर नृ मुलं मोठी झाल्यावर वेगळं होण्याचा निर्णय का घेतला नाही ? इतकी वर्षं मन मारून राहिल्यानंतर एकाएकी नीलचा मोह का पडला ? मुलं इतकी मोठी झालेली असताना, मुलांवर आपल्या वागण्याचा काय नृ कसा परिणाम होईल याचा काहीच विचार न करता मी त्याच्यासोबत अशी वाहवत कशी गेले ? एक रात्र का होईना पण मी राहिले त्याच्यासोबत. घरात खोटं बोलून. मुलांपासून लपवून.

तू का त्या एका गोष्टीचा एवढा बाऊ करून घेतेहेस ? माणसंच आहोत आपणही. मोह होतात बाई. आणि घर आहे, संसार आहे, मुलं आहेत, नोकरी आहे, पैसा आहे... म्हणजे तुम्हाला मन किंवा शरीर असताच कामा नये असं काही असतं का ? ते असणारच. वय काय आहे तुझं, ते बघ ना. त्या त्या वयात, परिस्थितीत त्या त्या गोष्टींची मागणी करणारच शरीर. साधं सायन्स आहे हे. हे जर तुला वाटलं नसतं तर उलट तू ॲबनॉर्मल आहेस असं म्हणावं लागलं असतं. आणि केवळ विठ्ठलने तसं केलं म्हणून मीही असं करणार, असले काही खुन्नस होते का तुझे ? तर, नाही ! तिथं कुठं विठ्ठलचा विचारच नव्हता. तुला जाणवलं, ते तू केलंस... इतकी लहानशी गोष्ट.

ही काय लहानशी गोष्ट आहे ?

म्हटलं तर आहे... म्हटलं तर नाही. आपण कशाला किती महत्त्व देतो यावर ते अवलंबून आहे. तुझ्या कृतीनं कुणालाही कसलाही त्रास झाला नसेल, नुकसान पोहोचलं नसेल, दुःख वेदना झाल्या नसतील... तर मग प्रश्नच मिटतो. एक आनंद मिळवला, त्याचं तू इतका काळ दुःख करून घेऊन हिण मिसळतेहेस त्या आनंदात.

मला काही कळतच नाहीये. मी हे जितूला नृ अस्मिताला सांगू का ?

कशाला ? नको ते किडे त्यांच्या डोक्यात सोडू नकोस. त्यांना त्यांचा अभ्यास आहे, स्वतःचे व्याप आहेत. आधीच तुझ्या तब्येतीचं टेन्शन आहे. काही गरज नाही सगळ्यांजवळ सगळ्या गोष्टी खरेपणानं बोलायची. तुला खरं सांगितलं याचं समाधान मिळेल, पण त्यांचं काय ? त्यांचं तुझ्या या सत्यकथनानं काही भलं होणार आहे का ? नाही ना ? मग काही गरज नाही आत्तातरी सांगायची. तुला वाटत असेल, तर ते सारं लिहून काढू आपण.

तेव्हा ते नीट नेमक्या शब्दांत येईल. मुलंही वाचतीलच की पुस्तक. त्यातून व्यवस्थित रीतीनं पोचेल ते त्यांच्यापर्यंत. पण आत्ता काही सांगत बसू नकोस. अस्मिताची परीक्षा नीट पार पडू दे. काय ?

मी होकारार्थी मान डोलावली.

तरी सारं लिहावं तरी का, हा एक भुंगा राहिलाच डोक्यात. मग वाटलं, याला काय अर्थ आहे ? म्हणजे आपल्या सोयीचं तेवढं आपण लिहायचं. किंवा ज्यामुळे आपल्याला त्रास होणार नाही, इतकंच. खरं म्हणजे लिहायचं तर सगळंच लिहिलं पाहिजे. आपल्या तमाम कन्फ्युजन्ससगट, त्रुटींसगट, दोषांसगट, उणिवांसगट...

विभाला सांगितला हा पॉइंट.

तर ती म्हणाली, *कपडे घालतोच ना आपण. घरातही, दुसरं कुणी नसतानाही, पूर्ण एकटं असतानाही कपडे घालतो. नागडं नाही फिरत. का ? काहीतरी सभ्यता नावाची गोष्ट असते की नाही ? मग लिहितानाही ते सांभाळलं पाहिजेच.*

कशासाठी ? मी विचारलं. *कपड्यांचं म्हणशील तर बंद बाथरुममध्ये एकटीनं आंघोळ करतानाही सगळे कपडे न काढणाऱ्या बायका आहेत कितीतरी. अगदी बिछानातल्या एकांतात नवऱ्यासमोरसुद्धा सगळे कपडे काढत नाहीत अनेकजणी. बघ विचारून पाच-सातजणींना. काही अर्थ नाही तुझ्या म्हणण्याला. तुम्ही अंगावर कपडे घालणार. शब्दांना कपडे घालणार. विचारांना, भावनांना कपडे घालणार. कधीतरी तर मोकळ्या व्हा ना जान कुठेतरी.*

मग ती नेहमीप्रमाणे गंभीर. विचारमग्न.

मग म्हणाली, *संस्कृतात काय सांगितलंय ते ऐक. सर्वः सर्वं न जानाति सर्वज्ञो नास्ति कश्चन !... म्हणजे, सर्वांना सर्वच गोष्टी माहीत नसतात. सर्व गोष्टी जाणणारा कोणीच सर्वज्ञ नसतो. आपल्याला आपण सगळं सांगतोय असं वाटलं तरी ते सगळं असत नाही. त्याखेरीज खूप काही शिल्लक असतं.*

म्हटलं, *'आपल्यापरीनं सगळं' असं म्हणू या मग हवंतर. कारण हे न संपणारं आहे. तुम्ही इतिहासात किती शिरणार आणि पुढचं किती पाहणार याची मर्यादा असतेच. आणि पुन्हा आपल्या आयुष्यात इतर असंख्य माणसं मिसळलेली असतात. त्यांचं कितीकाही शिल्लक राहात जाणारच. आपण त्यांच्या मनात, विचारात आणि अगदी प्रत्यक्ष जगण्यातही किती काय चाललंय हे थोडीच सांगू शकतो ? फारतर फक्त अंदाज बांधता येतील त्याचे, इतकंच. जसं मी विठ्ठलचं म्हणाले. त्याच्या कितीतरी गोष्टी अशा असणार, ज्या मला अजिबातच माहीत नाहीत.*

बरोबर आहे. विभा म्हणाली.

विभाला म्हटलं, *आजार सोसणं जितकं अवघड असतं ना तितकंच एखाद्या आजारी व्यक्तीला सोसणंदेखील अवघड असतं, असं जाणवतंय बघ मला. किती त्रास दिला मी मध्यंतरी तुम्हा सगळ्यांना... कदाचित अजूनही देतेय... पण असंकसं भान जातं मध्येच काही कळतच नाही बघ. हे सगळंदेखील लिही आपल्या पुस्तकात. मला एक भेटलात ग तुम्ही, पण सगळ्यांना अशी माणसं भेटतीलच असं नाही. किंबहुना भेटतच नाहीत. त्यामुळे हे लिहिलं जाणं इतकं गरजेचं आहे...*

दिलाच आहेस त्रास. आणि देतेसही. काही खात्रीच देता येत नाही त्यामुळे तुझी. सतत टेन्शन असतं. आज धड वागतेहेस, पण उद्या भलतंच काही करशील असं वाटतं. इतका राग आला होता त्यादिवशी मला तुझा. वाटलं, निघून जावं ताबडतोब तुझ्या घरातून. पण मग अस्मिताचा चेहरा, तिचं कळवळून सगळं सांगणं आठवलं. म्हटलं, तिच्यासाठी तरी तुझी तब्येत नीट राखणं गरजेचं आहे. ती एकटी काय काय बघणार ? तो राकेश एक बिनडोक आहे. काहीही मागितलं की आणून देतो तुला अजिबात विचार न करता. दारू आण म्हटलं तर उत्साहाने कोणकोणती आणू म्हणून विचारणार. सिगारेटस्‌ची पाकिटं आणून टाकणार ढीगभर. अरे भाऊ आहे की कोण ? जे काही आयुष्य उरलंय त्यात ऐश कर, म्हणे. नंतरची दुखणी कोण निस्तारणार ? मी फाडफाड बोलले त्याला, तर मग गप्प बसला. खरंच रचिता, वैताग आहेस तू म्हणजे.

सॉरी जान. खरंच सॉरी. रागावू नकोस ना. आता ऐकतेय ना मी तुमचं सगळं.

ठीकय... चल, लिहून टाकूयात तो मुद्दा काय सांगितलास तो. नंतर विसरायला होईल. तिनं कागद-पेन काढलं.

एखाद्या व्यक्तीला एच. आय. व्ही.चा संसर्ग झाला आहे, हे कळल्यानंतर तिच्या घरातल्या लोकांनी, नातलगांनी दूर न जाता तिला नियमित डॉक्टरांकडे घेऊन गेलं पाहिजे. त्या व्यक्तीच्या जोडीदाराशी, पती/पत्नीशी, मुलांशी, पालकांशी सतत संवाद ठेवला पाहिजे. या व्यक्तीचं जगणं संसर्गासहित सुसह्य कसं होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. स्वस्तामध्ये कोठे औषधोपचार मिळतो काय, याचा शोध घेतला पाहिजे. डॉक्टरांशी बोलत राहून आपल्या व संसर्गित व्यक्तीच्या मनातील शंका-कुशंकांचं वेळीच निवारण करून घेतलं पाहिजे. ज्या स्वयंसेवी संस्था या विषयावर काम करताहेत, तेथील समाजसेवकांशी सल्लामसलत केली पाहिजे. त्यांची मदत ही रुग्णासाठी, रुग्णाच्या नातलगांसाठी उपकारक ठरणारी असते.

नातलग नेहमी आपल्यासोबत असतातच असं नाही. अनेकदा भौगोलिक अंतरंदेखील खूप असल्यानं आपण नातलगांच्या संपर्कात राहू शकत नाही वा ते आपल्याला थेट मदत करू शकत नाहीत. अशावेळी आपले मित्रमैत्रिणी आपल्याला सोबत देऊ शकतात.

मित्र या संकल्पनेचा उपयोग सकारात्मक व्हायला हवा. मित्रांचा दबाव हे एक उर्जा निर्माण करणारं स्थान आहे आणि त्याचा वापर कसा करायचा, हे आपल्याच हातात आहे.

मुद्दा नेमका लिहिला आहेस तू. पण हे सगळं असं लेख लिहिल्यासारखं आणि इतक्या अवघड भाषेतच सांगितलं पाहिजेस का ? मी विभाला विचारलं.

म्हणजे काय ? अजून कसं सांगायचं ?

त्यापेक्षा आधी सरळ तो प्रसंगच लिही ना की, मी तुझ्यावर किती न् कशी वैतागले होते आणि त्यानंतर तू कशी वागलीस. अर्थात मग त्यासोबत तुझे हे अवघड डायलॉग आले तरी हरकत नाही द्यायला. नुसतं असंच गंभीर गंभीर वाचायचं म्हटलं, तर तुझे ते वातड शब्द चावून चावून भेजा कडक होईल.

शी ! कसली भाषा ग तुझी ? विभा वैतागली.

हेच मी पण म्हणू शकते गधडे. एक एक किलो वजनाचा एक एक शब्द लिहिते. इतकं वजन उचललं डोक्यावर, तर मान मोडणार नाही का ? मी म्हटलं.

विभानं डोक्यावर हात मारून घेतला.

विभाचं लिहून पूर्ण होत आलेलं. म्हणाली, *शेवटी काय लिहायचं गं ? सुचत नाहीये बघ. अवघड आहे सगळं.*

म्हटलं, त्यात काय अवघड ? नवलाई असल्यागत बोलतेस. कुठूनतरी सुरुवात केली, तसं कुठंतरी थांबता आलंच पाहिजे ना ?

ते निराळं, हे निराळं. कथा-कादंबरीसारखं काल्पनिक लेखन असतं तेव्हा काहीतरी घडवता येतं हवं ते, हवं तसं. पण हे तर तुझं आत्मचरित्र आहे. इथं फॅण्टसीला जागा नाही. तिच्यासमोरचे पेच वेगळेच होते.

खूप पुस्तकं वाचत राहतात ही माणसं आणि पुस्तक म्हणजे अमूक पद्धतीचंच असावं अशा काहीतरी चौकटी मनाशी ठरवून ठेवतात. त्या चौकटीत बसलं तरच ते कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र... असं त्यांना वाटतं. तयारीच नसते चौकटीबाहेरचं काही लिहिण्या-वाचण्याची. विचारसुद्धा वेगळा करवत नाही त्यांना. त्याच रेषेवर चालत राहणार, झालं.

म्हटलं, *का नाही ? आत्मचरित्र कशाला म्हणायचं ? फक्त वास्तवात घडलेल्या घटनांनाच का ? तूच म्हणाली होतीस ना की आपला हा स्व कितीही विस्तारता येऊ शकतो, म्हणून. मग तर अगदी बागेतल्या झाडासंदर्भात किंवा फुलपाखरा-सरड्यासंदर्भात घडलेली घटनादेखील माझ्या आत्मचरित्राचा अगदी महत्वाचा भाग बनू शकते. विचार, भावना, स्वप्नं आणि अगदी तू म्हणतेस त्या फॅण्टसीज् सुद्धा माझ्या मते आत्मचरित्रात येतातच.*

समज जर प्रतीक्षासारखं एखादं दिवास्वप्न बघण्यात माझ्या आयुष्याची अनेक वर्ष व्यतीत होणार असतील आणि त्या कल्पनांचा भलाबुरा परिणाम माझ्या वास्तव जगण्यावर होणार असेल, तर अपरिहार्यपणे ते माझ्या आत्मचरित्राचा भाग असणारच की. जगणंच काय, मरणसुद्धा निश्चित होतं अनेकदा अशा गोष्टींनी.

पण मग काय आपण मृत्यूनं शेवट करायचा ?

मृत्यू हा शेवट नसतोच बाई. त्या व्यक्तीचाही नाही आणि इतरांचा तर नाहीच नाही. मृत्यूनंतर तर ते माणूस बहुतेकांना खरंखुरं उलगडायला लागतं. माणूस अस्तित्वात नाही म्हटलं की तो लख्ख कळतो एकाएकी वीज चमकल्यासारखा. आणि मग हळहळ वाटायला लागते, की हे आधी कसं दिसलं नाही ? इतकं कसं काळोखं असतं आपलं जगणं की जवळचं माणूसदेखील नीट दिसू नये... आणि मृत्यूच्या प्रकाशातच ओळखू यावा त्याचा चेहरा. मी म्हटलं.

किती खरं आणि निराळंच बोलतेहेस रचिता... कुठून सुचतं तुला हे सारं... कधी काही वाचत नाहीस, लिहीत नाहीस... तरी ? विभाच्या डोळ्यांत पाणी तरळलं.

सुचत असतंच ग ज्याचं त्याला आपापल्या जगण्यातून. सगळ्यांना तुझ्यासारखं नेमक्या न् चांगल्या शब्दांत लिहिता येत नसलं म्हणून काय झालं ?

मग आता तूच सांग, पुस्तकाचा शेवट कसा करायचा ? तुझ्याच शब्दांत, तुझ्याच भाषेत लिहूया ते थेट. मृत्यूची सावली असली, तरी तो शेवट नकोच, तू म्हणतेस तसं. आपलं पुस्तक वाचून आत्महत्या करावी असं नाही वाटलं पाहिजे कुणाला. जगावं वाटलं पाहिजे आणि नुसतं जगावं असं नाही, तर 'चांगलं जगावं' असं वाटलं पाहिजे.

दॅट्स द स्पिरीट. कारण हे केवळ माझं पुस्तक नाही बये... आपलं पुस्तक आहे... हो ना... ? मला हसू आलं. पण तेवढ्यानंही दम लागला आणि पाठोपाठ खोकल्याची उबळ आली. किती वेळ खोकला थांबला नाही. गरगरायला लागलं डोकं.

सगळं आसपास अनेक रेषांमध्ये विभागलं गेलं आणि मग त्या रेषाही मोकळ्या होत होत अनेक बिंदू तयार झाले. अनेक रंगांचे थेंब... मग तेही फिकट फिकट होऊ लागले. वाटलं, थोड्याच वेळात सगळं नुसतं शुभ्र शुभ्र होऊन जाईल.

मध्येच पुन्हा एक अक्षर काळंभोर उमलून आलं कोंबासारखं. बघता बघता त्याला दोन इवली पानं फुटली. लख्ख उन्ह पडल्यागत झालं. त्या उन्हात ही वेल रसरसून वाढेल... खूप साऱ्या शब्दांनी, अर्थांनी... जिवंत. आपल्यानंतर, आपलं अस्तित्व सांगत ती अजून काही काळ जगेल. जन्मलेल्या प्रत्येक गोष्टीला मृत्यू असतोच. तसं हे पुस्तकदेखील या जगातून केव्हातरी नाहीसं होईल. आणि तरीही आपल्याला ते आपल्यापरीनं नीट लिहून पूर्ण करायचं आहे...

हाच विचार असू शकतो की शेवटाचा...!

पुस्तक काय आणि जगणं काय... आपल्यापरीनं आपण ते नीट पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करायचा... इतकंच !

ओठांवर मंद हसू उमलून आलं. वाटलं, खूप काही उलगडलंय, कळालंय...

विभाला म्हटलं, *लिही. मी सांगते तुला शेवटाचं काय असतं ते.*

तिनं कागद-पेन सरसावलं...

आणि मी सांगायला सुरूवात केली

जगणं नकोसं वाटणं ही गोष्ट निराळी; कारण, त्यावेळी मृत्यूची ओढ लागते. पण सगळंच नको वाटणं, म्हणजे जगणं वा मरणं, हे ग्रेट. म्हणजे स्वतःविषयीची आसक्तीही संपून जाते आणि स्वतःचा तिरस्कारही वाटेनासा होतो. हे अजून ग्रेट.

ग्रेट का ? तर... सगळ्यातली निरर्थकता कळते आणि म्हणूनच छोट्या छोट्या गोष्टींनाही आपण आपल्या परीने अर्थ देण्याचा प्रयत्न करावा, असं वाटू लागतं.

तळहातावरचा क्षण कसाही असो... रसरशीत फळासारखा, वाळून तडकलेल्या शेंगेतल्या बी सारखा किंवा नुसतंच उमलून कोमेजून जाणाऱ्या इवल्या रानफुलासारखा... तो मोकळेपणाने अनुभवासा वाटतो.

आणि खरं आयुष्य तेव्हा सुरू होतं...

हॉस्पिटलच्या फटफटीत पांढऱ्या भिंतींमध्ये माझा आवाज थबकत अडखळत थांबत पसरत विखरत राहिला. घशातल्या घशात एक गिरमीट वेगानं फिरतंय माझी वाक्यं छिलत, असं वाटत होतं. बोलताना घशात टोचतंय काहीतरी सारखं, अशी विचित्र भावना. एकाचवेळी सगळं काही अंतिम बोलावं आणि आता पुष्कळ झालं, आता काहीएक बोलू नये... असं दोन्हीही सारख्याच तीव्रतेनं वाटत होतं.

विभाचा एक हात माझ्या हातात होता. दुसऱ्या हातानं ती लिहून घेत होती. उबदार वाटत होतं. एकाएकी कुणाचाही स्पर्श नको असं अटीतटीनं वाटलं... आणि मग पुन्हा वाटलं की विभानं अजून गच्च धरून ठेवावा हात... सोडू नये. अंग मोडून टाकणारा अथांग थकवा आणि कुठून कुठून गोळा करून आणलेला थेंबभर उत्साह. नेमकं कशासाठी रोखून धरतेय मी स्वतःला या जगात ? जीव कासावीस होत होता.

वाटलं, हे शब्द म्हणजे रक्ताच्या बाटलीतले हे काही शेवटचे थेंब आहेत उरलेले... त्यामुळे आपण थोडं अधिक जगू शकतो आहोत... पण आता हे उसणं अवसान आता कुठल्याही क्षणी ओसरायला सुरूवात होईल... उंबरठा ओलांडण्याच्या तयारीत राहिलं पाहिजे... आता 'वलांडणा'ची वेळ जवळ आली आहे.

■ ■ ■

[राजहंस प्रकाशनातर्फे लवकरच प्रसिद्ध होणार असलेल्या, शीर्षक निश्चित न झालेल्या, कविता महाजन यांच्या कादंबरीतील भाग.]

लेखकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.

२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.

३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.

४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतःजवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.

५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.

६. लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.

७. निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.

अनुक्रमणिका

॥ दोन कविता ॥ • देवानंद गोरडे

१. सतीडोह

पहाडाच्या कड्यावर पसरलेले
हत्तीच्या महाकाय धडासारखे खडकाचे पठार
दुभंगवून गेलेला दरीसदृश्य खोल नदीचा प्रवाह
झुळझुळत आलाय कडेकडेने आसमंताला बिलगत
झुलवत
आणि इथे मात्र कसा गहन गंभीर
सगळे आसमंत स्वतःत रिचवित, सामावून घेत
वाहण्याचे भान हरवल्यागत, दिङ्मूढ थिजलेला

तिचे आत्ममग्न रुणझुणत वाहणे नेमून दिलेल्या
कडेकडेने तीराचे अवधान पाळीत आपल्यात मश्गुल
वरचे आभाळ आणि अवतीभवतीचा नटवा किनारा
क्षणभर विसावून न्याहाळायला ती होतीच कुठे एवढी
भानावर ?
प्रवाहात आलेली फुलं अलगद एकत्रित करून
हळुवार थडीला पोहचविण्याचा तिला जडलेला अवीट
छंद
...कशी अवचित फिरलीत कुणाची राकट बोटं
तिनं गोळा केलेल्या सगळ्या फुलांवरून
नि पाकळ्या पाकळ्या विलग होत गळून पडल्यात
देठातून
- कोवळा जीव चुरगाळण्यासाठी
महाकाय अजस्त्र पाय तिच्याकडे सरसावताना
क्षणमात्र चरफडून
तिच्या आकांताने चिरत गेलेले आसमंत
तशी या गप्पगार जळात तिने घेतलेली
एकदाची नि अखेरची उडी...

आज इथे येणारा हरेकजण पहाडाच्या पठारावरून
वरतून तुला फुलं वाहतो
तू अवतीभवतीच्या खडकाच्या अजस्त्र हत्तीपासून
अंग चोरून अधिकच दिङ्मूढ थिजल्यासारखी
आलेच भान तर तू धास्तावून निरखित असलेली
पात्रातल्या फुलांच्या पाकळ्यांवरील बोटांचे ठसे...

२. झडी

पाऊस
पहाडात सततधार पाऊस....
पाऊस उघडायचा संभव नाहीय
हाकेहाकेच्या अंतराने असणाऱ्या चार-दोन हेट्या
सागवानी बल्ल्या गाडून उभ्या केलेल्या खोडांगाच्या
आवारात
गाईगुरांचे तांडे ठार उभे जागच्या जागी
एखाद्या गुराने सुरुवात केल्यावर सगळ्याच गुरांचा
पोहा फुटल्यासारखा हंबरण्याचा आवाज
टेकडीवरच्या मयात मचांगावर बसल्या बसल्याच
गुराचा हेल काढून त्याचा चुचकारण्याचा आवाज...
पावसाच्या झपकाऱ्यात खालच्या धुनीला धुपटत
ठेवण्याचा नाद
त्यानं आता केव्हाच सोडून दिलाय....
पाऊस
संततधार पाऊस...
कुटकीचा तुकडा घश्यात ढकलता ढकलता
तो पाहतो खोडांगात उभ्या असलेल्या
गुरांच्या डोळ्यातील लवलवणाऱ्या जिभा...
...तो शरमिंदा होतो
सर कोसळल्यावर आसमंत उजळण्याआधीच
रसद तोडणाऱ्या वेढ्यासारखी आवळत चाललेली
असते
पुन्हा काळीभोर पावसाची भिंत
खोडांगात सगळ्या गुरांच्या डोळ्यातून पोटातल्या
आतड्यांत
पायरीखाली पायरी करीत आभाळ उतरत असते
सावकाश
तो डोकावतो गुरांच्या डोळ्यातून
पायरी उतरून आतड्यांत नि
परत मचांगावर चढून
घेतो आसमंत उजळण्याचा अंदाज
तो आतड्यांत - आसमंतात नुस्ता आतबाहेर करीत
भोवळत जातो.

अनुक्रमणिका

॥ चार कविता ॥ रजनी परूळेकर

१. त्या प्रसंगानंतर

त्या प्रसंगानंतर संपून गेले
दोघांचे पहिले नाते
जिवंत झरा आटून जावा तसे.
मग तलावातले नळाने येणारे पाणी
तसा शब्दांचा एक प्रवाह
वाहत राहिला
दोघांच्या बोलण्यातून, मधूनमधून

कधी पाण्यात क्लोरीन जास्त टाकलेले.
पावसाळ्यात पाण्यात तुरटी फिरवली की
तळाशी बसणारी माती,
गटाराचे पाणी मिसळल्याने
क्वचित पाणी दूषित झालेले
तरी पाणी पुरायचे आंघोळीला
कपडे-भांड्यांना, लादी धुण्यासाठी,
पदार्थ खाताखाता उचकी लागली तर
ती थांबायची दोन घोटात.
उन्हातून थकून आल्यावर
तहान शमायची पेलाभर पाण्यात.

जिवंत झऱ्याच्या पाण्यासाठी
तळमळणारं मन,
कुठे अदृश्य झाली ती तहान ?

२. एखाद्या कोपऱ्यात

आत्मपीडेला ठोकरून देणारे
काही लोक
तर काही अगदी सहज प्रवृत्तीने
तिला दूर ठेवणारे.
पण मला कधीच जमले नाहीत
हे दोन्ही प्रकार.
मग मी निश्चय करते
यापुढे करायचाच नाही
हेतूची शुद्धता पटवण्याचा आटापिटा.
पण तोही निश्चय टिकत नाही
फार काळ. मग मनात येते -
मेलेल्या प्राण्याचे कातडे
सोलून काढावे तसे आपण
आपल्याच नखांनी ओरबाडून काढावे
आपले दुबळे हळवेपण.

सर्वत्रच वैराण वाळवंटही नाही.
काही माणसे भेटतात
कनवाळूपणाचे वरदान लाभलेली
त्यातली काही जात सोडाच
दुरावा ओलांडतात धर्माचाही.
मग वाटते -
हातापायांवर मेंदी रंगवतात
तशा कविता लिहाव्यात सर्वांगावर
आणि मन आत्मपीडेने बेजार होते
तेव्हा मनात येते -
एखाद्या वादग्रस्त पुस्तकातले
एक पान व्हावे आणि
पडून राहावे कायमचे
एखाद्या कोपऱ्यात,
एखाद्या धूळभरल्या कपाटात !

3. अशा सहवासातही

अनेक परिमाणांनी
तिच्या-माझ्या नात्याला आलेला
बांधेसूदपणा.
धावदोरा आता
साखळीचा टाका बनलेला
अशा सहवासातही
माझ्या कुरूप रूपांची भुतं
पछाडतात माझ्या मनाला.
तिच्या सुसज्ज घराऐवजी
खिडकीतून दिसणारे कबरस्तान
सुखावते माझ्या डोळ्यांना !

४. खूप दिवसांनी


खूप दिवसांनी तिचा आवाज
फोनवर ऐकला, हरखून गेलं मन
आणि तुझा स्वतःवरचा पहारा चुकला
दरोडा पडला मनःशांतीवर
तुझे सर्वसामान्यांच्या संदर्भातले वाक्य
तिने खेचून घेतले विवक्षित संदर्भात
लोहचुंबकाने लोखंडाचा तुकडा
खेचून घ्यावा तसे.

त्या विवक्षित संदर्भाचा
पडदा घेऊनच आली होती ती
आता मौलिक विचारांची मेजवानी
मिळणार म्हणून हरखून गेलीस तू.
त्या पडद्यावर
विवक्षित संदर्भाची मुद्रा उमटली
आणि समूहमनातल्या तुझ्या प्रतिमेत
भरं पडली असंख्य कोपिष्ट डोळ्यांची.

तो पडदा घेऊन
ती आली होती फोनवर
यापूर्वीही अनेकदा
पण तुझ्या लेखी तो संदर्भ आता
भूतकाळाच्या दरीत गडप झालेला
त्यामुळे गाफील राहिले मन
भरभरून बोलली ती तीच
पण तो पडदा हेरता आला असता
तर जे चार शब्द तू बोललीस
तेही सावधपणे बोलता आले असते
आणि तुला अभिप्रेत नसलेल्या अर्थावर
दरोडा पडला नसता.

फोनवर बोलताना चेहरा नसतो
समोर, त्यामुळे वेळ लागतो
बोलण्यातला सूक्ष्म हेतू लक्षात यायला.
विशेषतः अतीव थकलेल्या मेंदूला
तो विवक्षित संदर्भ
पडद्याच्या गाठीला बांधून
निघून गेली ती आणि
तीच गाठ एक पू भरलेले
गळू होऊन ठणकत राहिली
दोन दिवस तुझ्या मनात.

खूप दिवसांनी तिचा आवाज
फोनवर ऐकला आणि....



अनुक्रमणिका

॥ चार कविता ॥ ◗ प्रकाश किनगावकर

१. डंकीण

कावळ्याला खूप तहान लागली होती.

तो उडत-उडत मळ्यात आला
दांडात कुठेही डबकं नव्हतं
तो विहीरीजवळ आला
कुंड रिकामं
कठड्यावर बसून त्यानं विहीरीत डोकावलं
तर नुसता गच्च काळोख.

तो गावाकडे उडत निघाला
रस्त्यात गावालगतचा नाला कोरडाठार
कधीतरी वाहून गेलेल्या पाण्याचे
पांढुरके ओघळ गोट्यांवर
पात्रात कुणीही रेती उकरुन झिरा शोधताना दिसला
नाही.

तो तसाच गावात आला
त्याला आठवलं
"आपल्या पूर्वजांनी रांजणाच्या तळाशी असलेलं
थोडं पाणी
गोटे टाकून वर आणलं होतं
अन् तहान भागवली होती."

तो इकडेतिकडे शोध घेऊ लागला
पण त्याला कुठेही रांजण हंडा अथवा
बादली दिसली नाही.

तो तसाच बसून राहिला
एकटक पहात;
दूर ओट्यावर पोरं
बादलीत पपईचे टोंगे बुडवून
डंकीण सुरु करण्याचा प्रयत्न
करीत होती.

२. कोय

पोरांनो,
माघात फुटलेल्या आंब्याचा
पिवळाजर्द मोहराचा रंग
तुम्ही डोळ्यांनी कधी टिपून घेतला का ?

कैऱ्या धरल्यावर
गळलेल्या मोहरावरून नागड्या पावलांनी चालताना
कधी पायाला गुदगुल्या करून घेतल्या अन् ऐकला
पायाखाली दबणाऱ्या मोहराचा चुरचुर आवाज ?

कधी बाजरीएवढा कैरीचा दाणा
मोठा होताना नजरेने मोजला ?

झाडावर झोके घेणाऱ्या कैऱ्यांना
नेम धरून दगडाने कधी पाडलं
अन् खाताना तिचा चिकाने गोंदून घेतला चेहरा
अथवा कधी शोधली झाडाखाली
मिठू कैरी कतरताना
त्याच्या चोचीतून गळलेली कतरणाची रांगोळी ?

तुम्ही झाडावर चढून
कधीही आंब्याची साग धुंडली नसेल !

आता आपल्या घराजवळ
उकिरड्यावर कोय उगवून आलेली आहे
मृगाच्या वाऱ्याने त्याची लालदर्ज पाने डुलताहेत
ती हिरवी होण्याआधी
कोय उपटा
साल काढून कुठल्याही भिंतीवर
तिला जीभ पडेपर्यंत घासा
अन् मग पिपाणी सारखं फुंका.
त्या आवाजाची वाट पहात आहे
हे घर.

अनुक्रमणिका

3. भोवरा

केवटचा माल निसून धुतल्यावर,
टोपल्यात रचून,
त्यावर ओलं तरट झाकून,
ओझं डोक्यावर घेवून
ती विकायला निघायची.

त्यातून टपकणारे पाण्याचे थेंब
कपाळावरून ओघळत चेहऱ्यावर येताच
पदराने ती पुसायची
अन् गल्लीबोळातून जातांना
चौकात थांबून हाक द्यायची.

चुलीपर्यंत आवाज पोहचताच
बाया बाहेर येवून माल घ्यायच्या
अन् घेतलेला खुर्दा कमरेला खोचलेल्या पिशवीत ठेवून
क्वचित आलेली नोट ती पदराला बांधायची.

दुपारच्या प्रहरी ओळखीच्या दारी थांबून
तांब्याभर पाणी मागून ती मालावर शिंपडायची
अन् उरलेलं घशात ओतून
ओळखीचं हसून पुन्हा चालू लागायची.

झापळ पडेपर्यंत तिची भटकंती सुरुच असे.

कित्येक वर्षापासून ती चालतेच आहे
हजारो मैलांचे अंतर तिने कापले आहे
पण अजून मुक्काम आला नाही.
कधी संपेल ती बिकट वाट
अन् थांबेल तिच्या पायांचा भोवरा ?

४. लोढणं

ओढाळ ढोराला चरायला पाठविताना
ते वेळेवर परतणार नाही
याची खात्री असल्यानं
गोहारं गावात शिरण्यापूर्वी
बाप मला पाठवायचा
पण मी पोहचण्याआधीच ते पसार
झालेलं असायचं.

मग खळे मळे शोधताना
दमछाक होऊन मी निराश परतायचो.

सकाळी ढोरानं केलेल्या नुकसानीच्या तक्रारी
ऐकून घेत दिलगिरी व्यक्त करत
गरीब जनावराबरोबर गाठलताना
बाप दाव्याच्या गाठीवर गाठी मारायचा.

काही दिवस ती दोघं जातयेत राहिली सोबत
हळुहळू त्याचं वेळेवर येणं थांबलं
अन् दोघांचा कोंडवाड्याचा दंड भरणं
बापाला जड होऊन बसलं.

नंतर ढोराला पायखुंटा देणं, गळ्यात
लोढणं अडकविणं वगैरे उपाय
आलटून पालटून सुरु राहिले.

आता त्यावर कुठला उपाय योजावा हा प्रश्न
घराच्या दैनंदिन वाटचालीत अडथळा
आणतो आहे लोढणं बनून.

॥ सात कविता ॥ ▸ लोकनाथ यशवंत

१. आत्मचरित्र

सृष्टीत स्वत:चे जीवन घेऊन आलो होतो.
माझ्या पद्धतीने बिनधास्त जगलो.
कुणाचा द्वेष केला नाही.
अन् गुलामीही.

ऐऱ्यागैऱ्यांची मानसिक बंधनं
अलंकार म्हणून वापरली नाही
स्वतंत्र मार्गाने जीवनक्रमित राहिलो.

मी मेलो.
धर्माचे तथाकथित ठेकेदार गिधाडांसारखे जमले.
(मंत्रोच्चारात त्यांनी शरिराचे अन्त्यसंस्कार केलेत)

खायापिया कुछ नही, गिलास फोडा चार रूपया !

२. आपण सगळेच !

बुद्ध, पैगंबर, अल्ला, येशू
ही देवादिकांची अगणित रांग.
धर्माचा चिकट मायाजाळ.

ताओ, माओ, मार्क्स, आर्किमिडीज
आईनस्टाईन, डेव्हिस, राईटबंधू, ग्राहमबेल, मार्कोनी,
गॅलिलिओ, अपोलो, नील आर्मस्ट्रांग, ब्लॅक होल्स,
हिरोशिमा, साक्रेटिस, व्हालटिअर, बिलगिट्स,
चॅपलिन,
मॅन्रो, दाली, लिओनार्दो, अमेरिकन दहशतवाद
पृथ्वीचे तापमान, ओझोन थर
कायकाय घेऊन बसलात ?

या गर्दीत,
एकदाच मिळणारे
स्वत:चे जीवन गायबच झाले.

आता तरी,
या शेवटच्या वळणावर
स्वत:ला शोधू या.

3. कोंडमारा

प्रगतीच्या भाकरी मागे
खेड्यातून शहरात आलोत
अस्पृश्यता नाहिशी होण्याच्या मोबदल्यात
आम्ही झोपडपट्ट्या पदरात घेतल्या.

ही जागतिकीकरणाची कुठली गलिच्छ पद्धत ?
माणसं उंदरासारखी एकमेकांवरून धावताहेत ?

या संगणकाच्या तथाकथित प्रगतीत
मी होल्याचा नव्हता झालो,
अन् आडवे अंतर उभे ठाकले.

४. उघड गुपित

जग बेईमानीच्या मार्गाने विनाशाकडे
धावत जाताय भराभर.
आपण तुक्याचे हळवे हृदय घेऊन,
अभंग गातोय तल्लीन होऊन.

युद्धासाठी बुद्ध हसवितात मतलबी बेशर्मीपणे.
आपण जुनाट नाराच देताहोत "युद्ध नको, बुद्ध हवा !"

नरसंहारासाठी जग झाले आहे सज्ज.
मिसाईल्स, अणूबॉम्ब, विषाणूअस्त्र आणखी काय-काय ते.

बुद्धाचे स्मित पूर्वीपास्नच उपरोधिक.

५. शेवटी दाळपोळीचा सवाल

माहिती तंत्रज्ञानाने जग जवळ आले.
आणि कुटुंबच झाले ! आनंद झाला.
(लढाया मात्र सुरूच)

छातीला छाती भिडली,
पण मनं जुळली नाहीत.

इंटरनेट पुरुषासाठी
जगातील कोणत्याही देशाची बाई भोंगडी बघता येते.
इंटरनेट स्त्रियांसाठी
जगातील कोणत्याही देशाचा माणूस नगघडंग चाखता येतो.

माहितीच्या जाळ्याने
नीतीभ्रष्ट नफेखोर वर्ल्ड सेन्टरच्या पेकाटात
बिनधास्त ज्वालाग्राही विमानं घुसविता येतात अचूक
आधुनिकतेचा दलाल युद्धखोर अमेरिका असतो साखरझोपेत मग्न
अन् लादेनभाई दाखवून जातो आपले अस्सल कॅलिबर
आमचं सोडा, आमचं काय ?
सायंकाळच्या दाळपोळीची विवंचना ?

६. पेट्रोलसाठी 'खून की नदीयाँ'

युद्धोखोर अमेरिका हलाल करतो शांतीप्रिय कबुतरं
अन् शिजवितो रस्सेदार मटन भर चौकात
ब्रिटन करून देतो मसाला गरम.
जग भिजल्या कोंबड्यासारखे बघत असते
आळोसा घेऊन.
भेदरला इराक मान टाकतो वाळवंटात शहामृग होऊन.
राष्ट्रसंघ निरर्थक कोल्हेकुही करत,
दाबतो शेपूट कमजोर कुत्र्यासारखा.
असे बिनधास्त झालेत दुसऱ्याच्या घरात घुसून वार.
आपले सोडा.
आले काय नेहमीचेच !
कसायाच्या उपकारात दबलेलो.

७. नवा माणूस आविष्कारतोय् !

तुझ्या गर्भाशयातील निवांत ऊन पोकळीत
स्त्री बिजासोबत संभोगरताहेत माझे शुक्राणू
आता तरी,
जातीधर्माचा फडतूस विचार सोडून दे.

परिवर्तनशील जग नव्या झपाट्याने बदलताहे
तो वेग समजावून घे
धर्म ही संकल्पना केव्हाचीच बाद झाली
धर्मान्धतेवर माणसं कापल्या जाऊ लागलीत
तेव्हाच धर्माचा ऱ्हास सुरू झाला
मी यावर अनेकदा बोललोही
पण; तू आहेस की,
भटकून येतोस धर्माच्या अंधार बोगद्यातून.

दलालांनी पेरून ठेवलेली तकलादू धार्मिकता
चिटकून बसली आहे गोचिडासारखी तुला
तुला हा गोचिड महत्प्रयासाने मेंदूतून काढावाच लागेल
जग खूप झपाट्याने प्रगतीकडे धावताहे
हा वेग तुला बघावाच लागेल.

जगासोबत जे धावत नाहीत, त्यांना दुनिया विसरून जाते
धर्म कचरा होऊन निष्प्राण बेवारस पडला आहे
उगाच टाकावूकडे बघू नकोस !

तुला पुन्हा शेवटचे सांगतो.
धर्माचे दिवस संपलेत.
आता तरी गर्भाशयातला जप,
तिथे अंकुरतोय नवा माणूस.
धर्माच्या पलिकडला संपूर्णसा.

॥ तीन चिंतनबंध ॥

डॉ. द. भि. कुलकर्णी

१
मेरसोलचा सूर्य

'आऊट सायडर' ही कादंबरी माहीत आहे ना ? अल्बेर कामूची ? तिचा नायक मेरसोल. कामूने त्याच्याबद्दल म्हटले आहे, "आजच्या युगाला हवा असलेला तो येशू ख्रिस्त आहे." मेरसोल तर एक सामान्य कर्मचारी होता. सामान्याचं आयुष्य जगणारा. बहुधा परवडत नाही म्हणून लग्न न केलेला. त्याच कारणासाठी बहुधा आईला वृद्धाश्रमात ठेवणारा. सिनेमे पाहणे, पोहायला जाणे आणि मैत्रिणीबरोबर भटकणे असे चार-चौघांसारखे आयुष्य जगणारा. तो आजच्या युगाचा येशू कसा ?

त्याच्यावर खुनाचा आरोप असतो; तो खराच असतो - मेरसोलही ते नाकारत नाही. त्याला फाशीची शिक्षा होते - मेरसोलची त्याबद्दलही तक्रार नसते; उलट तो म्हणतो, मला फाशी द्याल तेव्हा माझ्या निषेधाच्या घोषणा देणारा जमाव माझ्याभोवती राहील एवढी व्यवस्था करा. तुरुंगात त्याच्या डोक्यात विचित्र कल्पना येतात आणि वासना त्याला अस्वस्थ करतात - हे तो स्वतःच सांगत असतो - सगळी कादंबरी हे त्याचेच स्वगत आहे. तिथे तो धर्मोपदेशकावर पिसाळल्यासारखा खवळतो. हा माणूस येशू कसा ?

त्याच्या जगण्याची एकच अट असते "मी खोटे बोलणार नाही; मला जे खोटे वाटते त्याला मी खरे म्हणणार नाही." या त्याच्या आग्रहापायी त्याचे कोर्टात हसे होते; या त्याच्या आग्रहापायी धर्मोपदेशक हतबुद्ध होतो.

मेरसोलला दिसतं की वेगवेगळ्या कारणांनी आणि वेगवेगळ्या पद्धतींनी आपल्या भोवतीची माणसं खोटं बोलताहेत - हाच जीवनाचा न्याय आहे; न्यायाधीश आणि वकील, मित्र आणि मैत्रिणी, वृद्धाश्रमातील कर्मचारी आणि धर्मोपदेशक... सर्व खोटं बोलताहेत - ठरवून नव्हे; गरज म्हणून, स्वभाव म्हणून, सराव म्हणून. हाच आणि असाच सर्व जीवनव्यवहार आहे. या जीवनाचा पायाच मुळी खोटेपणावर आधारलेला आहे - इथल्या सगळ्या संस्था. त्यामुळे इथला अत्यंत तर्कशुद्ध विचारसुद्धा खोटेपणाकडून खोटेपणाकडेच घेऊन जातो आपणांस - दुसरा मार्गच नाही.

"मी खोटे बोलणार नाही; मला जे खोटे वाटते त्याला मी खरे म्हणणार नाही" हा मेरसोलचा बाणा आहे. इथे तो सर्वार्थाने एकाकी आहे व म्हणूनच आऊटसायडर आहे आऊटसायडर म्हणजे 'जगावेगळा' नाही, 'अजनबी' नाही, 'परका' नाही, 'उपरा'ही नाही; 'निःसंग' होय, निःसंग.

मेरसोल निःसंग आहे. भगवी किंवा पिवळी किंवा काळी किंवा पांढरी कफनी न घालताच तो निःसंग आहे - कदाचित म्हणूनही ! एक अगदी सामान्याचे जीवन जगत असतानाही तो निःसंग

असतो आणि एक असामान्य मृत्यू पत्करतानाही तो तितकाच निःसंग राहतो.

त्याचा हा निर्धार आपल्या अंगावर शहारे आणतो.

कुठल्याही तत्त्वप्रणालीशिवाय, कुठल्याही बाह्य भव्य-दिव्य कॉजशिवाय मेरसोल निःसंग असतो आणि राहतो - हा त्याचा निर्धार आपल्याला स्तिमित करतो; हा खराखुरा सामान्यांचा येशू आहे हे पटते.

कुठल्याच बाह्य उद्देशाने नव्हे, कुठल्याच निमित्ताने नव्हे, कशासाठीच नव्हे निखळ, निरुपाधिकपणे मेरसोल मनोमन म्हणतो आणि वागतो, "मी खोटे बोलणार नाही; मला जे खोटे वाटते त्याला मी खरे म्हणणार नाही. भलेही मग ते हास्यास्पद असो, तो अपराध असो, ती नास्तिकता असो, ती अनैतिकता असो - काही असो."

आश्चर्य म्हणजे 'सत्याच्या जातीला दुःख असे मिळणारच,... सत्याचे भव्य भाल रक्ताने भिजणारच' असा घोष तो कुठेही करीत नाही - कधीच करीत नाही - तो फक्त तसे जगतो ! 'एका साध्या सत्यासाठी देता यावे पंचप्राण' हे ब्रीद तो अगदी वाच्यार्थाने अंमलात आणतो - त्याचे कुठलेही तत्त्वज्ञान न करता, त्याचे कुठलेही अवडंबर न माजवता तो असा अनाम वीर आहे; तो असा, ज्याच्या दफनभूमीवर चिरा-पणती नाही - पुष्पचक्र नाही असा, हुतात्मा आहे !

आपल्या अंगावर काटा येतो आणि शंभराहून कमी पानांच्या या कादंबरीस नोबेल पारितोषिक का मिळाले ते आपणांस आपसूक कळते.

आपल्याच सामान्य पद्धतीने जगत असताना मेरसोलला याचा बोध होत नाही; त्याला आपल्या आणि जीवनव्यवहाराचा बोध होतो तो आईच्या मृत्यूने. त्या संदर्भात तो बॉसशी खोटे बोलत नाही, मैत्रिणीशी खोटे बोलत नाही, न्यायालयाशीही खोटे बोलत नाही - हे सारे तशी स्वाभाविक अपेक्षा करीत असताना, हे सारे तसे वागत असतानाही जीवनव्यवहार असाच असतो; तो न पाळल्याने त्याचे हसे होते, त्याच्यावर क्रौर्याचे आणि विकृतीचे आरोप होतात, तो सुखास आचवतो, त्याला गंभीर शिक्षा होते तरी; - हा येशू.

सर्व जीवनव्यवहार, सर्व धारणा, सर्व तर्क आणि सर्व संस्थाच जर अशा आहेत तर आत्मसमर्थन तरी काय करणार आणि कोणाजवळ आणि का ? मेरसोल गप्प राहतो. वकिलाला आणि न्यायाधीशाला आणि धर्मोपदेशकाला त्याच्या मौनाचा अर्थ कळत नाही - (कोर्टातील एका आणि एकाच पत्रकाराला त्याचा अर्थ कळतो.)

मेरसोलच्या जीवनप्रवासात सारखा 'सूर्य' डोकावत असतो आईच्या स्मशानयात्रेच्या वेळी आकाशात सूर्य तळपत असतो; अरबाच्या खुनाच्या प्रसंगी सुरीवर सूर्य तळपत असतो. फाशीपूर्वी त्याला कळतं की प्रत्येकाचा सूर्य एक दिवस ढळणार आहे; त्याला प्रभू येशू कुठे दिसत नाही पण सूर्य दिसतो ! - माध्यान्हीचा, दुपारचा आणि संध्याकाळचा.

आईचा मृत्यू आणि अरबाचा मृत्यू आणि स्वतःचा मृत्यू अशा मृत्यूंच्या संदर्भातच सूर्यसंदर्भ आल्यामुळे असे वाटते की हा सूर्य मृत्युसूचक आहे; विकृती-विनाशसूचक आहे; पण सूर्य मृत्यूचा, विनाशाचा आणि विकृतीचा सूचक होईलच कसा ? - इथे तर नक्कीच नाही. हा सूर्य जीवनसूचकही नाही - कसा असेल ? जे जीवन खोटेपणावरच आधारलेले आहे त्याचे सूर्य हे प्रतीक होईलच कसे ?

इथे सूर्य प्रतीक आहे सत्याचे; सत्यज्ञानाचे या अर्थाने जीवनज्ञानाचे; या अर्थाने आत्मज्ञानाचे. सूर्य मेरसोलच्या आत्मबोधाचे प्रतीक आहे. त्याला स्वतःचे आणि जगाचे जे ज्ञान सहजभावाने झाले आहे त्याचे ते प्रतीक आहे. हे ज्ञान ग्रंथ, गुरू, धर्म, चिंतन, तपाचरण यांतून झालेले नाही; जितक्या सहज सूर्य उगवतो, जितक्या सहज सूर्य मावळतो तितक्या सहज मेरसोलला हे ज्ञान झाले आहे - इतके हे प्रतीक स्वाभाविक आहे ! त्यात कुठेही अर्थाचा अट्टाहास नाही, कारागिरी नाही. (उगवणारा प्रत्येक सूर्य अखेर मावळतो तसा आपला आत्मबोधही आपल्या मृत्यूने मावळणारा आहे प्रत्येकाचा आत्मबोध असाच मावळणार आहे - तो काही चिरंतन नाही असा अर्थही त्यात नसेलच असे नाही.)

'आऊटसायडर'ची भाषा एका सामान्य

कर्मचाऱ्याची भाषा आहे; ते त्याचे मृत्युपूर्व स्वगत आहे; ती त्याची मृत्युपूर्व जबानी आहे; ते त्याचे मृत्युपत्रही आहे. त्यात अलंकार, प्रतिमा, प्रतीके, नाट्यात्मकता, काव्यात्मता यांना अवसर आहेच कुठे ? जे आले आहे ते सगळे सहज सहज आले आहे - मग तो आईच्या स्मशानयात्रेचा प्रसंग असो, अरबाच्या खुनाचा प्रसंग असो; फाशी- पूर्वीचे स्मृतिरंजन असो; कोर्टातली कार्यवाही असो - काहीही असो. जे आले आहे ते सहज सहज आहे.

<u>सारा अंधारच प्यावा</u>
<u>अशी लागावी तहान;</u>
<u>एका साध्या सत्यासाठी</u>
<u>देता यावे पंचप्राण</u>

- असे ज्याचे ब्रीद आहे त्याच्या निवेदनात नाट्य आणि काव्य कुठले ? प्रेषिताच्या उद्‌गारांत कुठे नाट्य आणि काव्य असते ? प्रेषिताच्या उद्‌गारात नितळ जीवनसत्य साक्षात् झालेले असते - जसे, येशूच्या उद्‌गारांत.

या अर्थानेही मेरसोल आजच्या युगाचा येशू आहे.

मेरसोलची शोकांतिका ही मेरसोलची शोकांतिका नाही; ती आजच्या न्यायसंस्थेची, आजच्या समग्र जीवनव्यवहाराची शोकांतिका आहे - मेरसोल त्यांत सूर्याप्रमाणे उगवतो आणि मावळतो.

मेरसोल मावळला हे खरे; पण 'निःसंग' काही मावळली नाही. १९४२ ची ही कादंबरी. म्हणजे अर्धशतकाहून अधिक काळ उलटून गेला - ती तशीच आहे; नव्या शतकातही ती तशीच राहणार आहे; तिचा अभिप्राय अधिक तीव्र होणार आहे !

२

अवास्तव आणि अद्‌भुत

अवास्तव आणि अद्‌भुत या दोन अगदी भिन्न संकल्पना आहेत.

लोकप्रिय हिंदी चित्रपटांमध्ये अवास्तवता आहे असे आपण म्हणतो एकटा नायक अनेक गुंडांशी लढून यशस्वी होतो - ही अवास्तवता; अद्‌भुतता नव्हे. अवास्तवता वास्तवाचा बुरखा चढवून 'मला वास्तवता म्हणा' असे म्हणत असते. अभिनय, पार्श्वसंगीत, छायाचित्रण इत्यादी घटक तिथे इतके प्रभावी असतात, त्या प्रसंगामधील भावना व त्या प्रसंगामागील सामाजिक समस्या इतक्या प्रभावी असतात की त्यामुळे आपण आपल्या नकळत त्या अवास्तव घटकाला वास्तव घटक म्हणून स्वीकारतो; दिग्दर्शकाचा तोच हेतू असतो; त्याला 'अवास्तवता' चित्रित करायची नसते; अवास्तवता त्याला 'वास्तव' म्हणून दाखवायची असते !

असे तरी तो का करतो ?

- चित्रकथेला त्याला स्वहेतुसापेक्ष वळण द्यायचे असते; जसे, वास्तवाला धरून खलनायकाचा विजय होणार असेल, चित्रपट शोकांत होणार असेल तर ते त्याला नको असते; त्याला नायकाचा विजय व नायक-नायिक यांचे मीलन हवे असते - म्हणून तो, वास्तवाचा आभास निर्माण करणारी अवास्तवता आपल्या चित्रपटात आणतो; त्याला अवास्तवता प्रिय असते म्हणून नव्हे.

नायक काही त्याचा सुपुत्र नसतो की चला, पोराचे दोनाचे चार हात झाले, आपण आपले कर्तव्य पूर्ण केले - असे तो म्हणेल; मग त्याला नायकाच्या विजयाचे एवढे अगत्य का असावे ? नायक सत्पक्षाचा आहे, सत्पक्षाचा विजय दाखविल्याने समाजावर त्याचा चांगला परिणाम होईल असे तो लोकप्रिय दिग्दर्शक समजत असतो का ? नैतिक संस्काराशी त्याचे काही देणे-घेणे नसते. तरी ते असते तर किमान कपडे घालून नाचणाऱ्या बारबाला त्याने दाखविल्या असत्या ? नायिकेच्या गेटपाशी जाऊन, गीतातील भाव, मुद्राभिनय आणि शारीरिक हालचाली यांचा परस्परांशी काहीच संबंध नसलेली, नृत्याचा आभास निर्माण करणारी कसरत त्याने दाखविली असती? नैतिक संस्कारांशी त्याचे काहीच देणे-घेणे नसते; त्याला हवा असतो पैसा. अशा चित्रपटावर करोडो रुपये खर्च झालेले असतात. निर्माता-दिग्दर्शक-नट साऱ्यांनाच ते दामदुपटीने परत हवे असतात; म्हणून जनतेला आवडतं ते, ते जनतेला

देतात आणि जनतेचा खिसा रिकामा आणि आपला खिसा गरम करतात.

आता कोणीही म्हणेल की, आम्हाला काय अवास्तवता आवडते ? आम्ही काय म्हणतो, "मार रे बाबा उडी दहाव्या मजल्यावरून; चुकव दहाजणांच्या गोळ्या, खतम कर एकट्याने दहाजणांना ?" नाही. असे आपण म्हणत नाही कोणीच; पण आपल्याला आपल्या इच्छांची पूर्ती जरूर हवी असते.

वास्तवात सज्जन भीरू आणि व्यथित असतो; दुर्जन हसत हसत इमले उठवीत असतो - हे आपल्याला नको असते. चित्रपटात जेव्हा सज्जन शूर आणि सुखी होतो, हेलिकॉप्टरला लोंबकळून परदेशात पळू पाहणारा दुर्जन पराभूत होतो तेव्हा आपली इच्छापूर्ती होते - प्रत्यक्षात नाही तर नाही इथे तरी आपल्या मनासारखे घडतेय, याचे आपल्याला समाधान असते !

म्हणजे काय की आपल्या इच्छापूर्तीसाठी सिनेमावाले सिनेमात अवास्तवता आणतात आणि आपण ती वास्तवता म्हणून स्वीकारून खुशालतो.

यात दोष कुणाचा ?

अद्‌भुततेबाबत असे घडत नाही.

सोनपरी असो, बॅटमन असो, स्टार वॉर असो त्यात अवास्तवता नसते; वेगवेगळ्या स्तरांवरची आणि वेगवेगळ्या प्रकारची अद्‌भुतता असते. अद्‌भुतता अवास्तव नसते, ती वास्तवाच्या मागे दडत नाही ती उघड उघड वास्तवातीतता असते. मी 'वास्तव' नाहीच, असे ती खुलेआम सांगत असते. माझा आस्वाद वास्तव म्हणून घेऊच नका, वास्तवभिन्न अनुभव म्हणून घ्या असे ती सांगत असते.

ही वास्तवभिन्नता ही अतिशयोक्तीतून, कधी कल्पनाविलासातून, कधी वैज्ञानिक संभवनीयतेतून तर कधी मानसशास्त्रीय किंवा अध्यात्मशास्त्रीय शक्यतांतून प्रकटत असते; तिचा प्रकार आणि स्तर कोणताही असो, ती वास्तवाचा मुखवटा कधीच घालत नाही, ती आपणांस कधीच फसवीत नाही.

अवास्तवता, निर्माता आणि आस्वादक यांच्या कच्चेपणातून निर्माण होत असते; अद्‌भुतता आस्वादक आणि निर्माता यांच्या सर्जनशील कल्पकतेला आवाहन करीत असते; आश्चर्य म्हणजे ती वास्तवाची जुळी बहीण असते.


३

माऊलीची माऊली

मधली पोरं अशीच असतात. मीपण तर मधलीच होते. वरची गेली, खालची गेली - मी वाचले. मधली अशीच असतात. मी तुझं मन बरोबर ओळखलं आहे.

तुला काय वाटतंय, मी खूप दु:खीकष्टी आहे. का ? तर म्हणे मला दिवसभर खूप काम करावं लागतंय. डोंबलं तुझं. कसलं रे काम सहा माणसांचं ? मला माहीत आहे पुढे कधीतरी बायका सुटवंग होतील - त्यांना असतील एकदोनच पोरं किंवा एकही नाही त्या होऊ देणार. त्यांना नवरे मात्र... त्या द्रौपद्या सुखी असतील म्हणतोस का ? नाव नको घेऊ. असंच असतं बाबा माणसाचं. नापुती रडते, सातपुती रडते आणि एकपुतीही रडते. असंच असतं. पहिल्यांदा म्हणजे माणसाचं मन निर्मळ व्हावं लागतं. तुला हरप्पाची कहाणी माहीत आहे ना ? अरे, तुझ्या जन्माच्या वेळीच तर गेला तो हिमालयात. हिमपुरुषच होता तो. तू आणि मी काय सोसतोय् ? काहीच नाही. त्यानं फार सोसलं. घरदार सोडलं. संसार सोडला. रानोमाळ हिंडला. तेव्हाच त्याला कळलं की माणसं दुष्ट नाहीत, अडाणी आहेत, पंडित तर जास्तच अडाणी आहेत - ते अडाण्यांना न कळणाऱ्या भाषेत उपदेश करतात; तुला वनभाषेत उपदेश केला तर कळेल ? त्या महात्म्यानं देशीबोलीत देवज्ञान दिलं - अडाण्यांना. म्हणून इतके शहाणे त्याच्या वाणीनं उजळले. त्याच्या देशी वाणाला तुला नागर करायचं आहे. तू मंत्र नको देऊस, सूत्र नको देऊस, तू तुझं मनच त्यांना दे. तू भाग्यवान आहेस. या गावानं आपल्या अवघ्या

कुटुंबाला एकांत दिला आहे : तुम्हा पोरांना संसारमुक्त केले आहे. आभार मान या लोकांचे. माझी काळजी सोड. काम ? कामानी काही माणूस झिजत नाही. उलट सांधे मोकळे होतात - तनाचे आणि मनाचेही. पूर्वी चारू वाक् करणारा एक पंडित होता. म्हणतो काय, जे दिसतं तेवढंच खरं. एवढं एक आयुष्य खरं. अर्थ आणि काम हेच तेवढे पुरुषार्थ. मी कोणाची पोरगी आहे हे माहीत आहे ना तुला ? माझ्या माहेरी सात पिढ्या सिद्धीच्या आणि विद्येच्या आहेत. तू फक्त ह्यांना आणि दादाला पाह्यलंय. मी दोन कुळांच्या सात पिढ्या जाणल्या आहेत. तुला माहिती नाही, या चौदा चौकड्यांचा तू गोविंदविडा आहेस; आणि तू माझ्या एवढ्याशा काबाडकष्टांची चिंता करतोस ? तू वेडा आहेस. ज्यांच्याकडे पोरवडा आहे, चार-चार पिढ्या ज्यांच्या घरात एकत्र नांदताहेत त्या माउल्यांकडे पाहा, त्यांची चिंता वाहा - तू आता मोठा झाला आहेस - ही आई काही तुला फार काळ पुरणार नाही; तुलाच आई व्हायचं आहे. तो चारुवाणी शहाणाच होता त्याला म्हणा, ज्या बाईला चौदा पोरं होतात तिला तू म्हणशील, "सुख घेणे हेच महत्त्वाचं ?" अरे, आधी काही तसं रसायन शोधून काढा. तत्त्व आचरणात येतात तेव्हाच त्यांचं खरेखोटेपण ठरतं. त्याचंही बरोबरच होतं म्हणा, जो उठतो तो संन्याशाच्या गोष्टी करतो. अरे, सगळे मुंडन करतील तर मुंडन करायला कोणी शिल्लक राहील ? सांग. हे बोकेसंन्यासी आणि या सोकावलेल्या बायका यांना काय वैराग्याचा अर्थ कळणार ! मुनी, तुम्हाला संसार आणि संन्यास, प्रवृत्ती आणि निवृत्ती, लोकवाणी आणि देववाणी, काव्य आणि अध्यात्म यांचा एकमेळ साधावा लागेल. बाळा, तुला माहीत आहे, तो हिमपुरुष उत्तरेकडे का गेला ते ? अरे, तिकडून झुंडीच्या झुंडी येत होत्या.



वखवखलेल्या. त्यांचे विचारच अतिरेकी. त्यांचं मनच आपल्याला बदलावं लागेल. तो हिमपुरुष त्यासाठी तिकडे गेला.

अरे बाबा हे कळलं पाहिजे कोणाला केव्हा काय 'उपदेश करायचा हे कळलं पाहिजे. नुसतं ज्ञान असून चालत नाही, शहाणपणही असावं लागतं. पश्चिमेकडे जाणाऱ्याला पूर्वेकडे जा असं कधी सांगू नकोस; पश्चिमेकडे कसं जायचं, का जायचं ते सांग. मला सांग, असं एक तरी कर्म आहे का की जे उपजतच निर्मळ आहे ? अगदी तुम्ही काय म्हणता ते सत्कर्मसुद्धा ? त्याची आसक्ती असेल तर ? ग्यानबा, सत्कर्माची सुद्धा आसक्ती बरी नाही बरं !

तू म्हणतोस, मला कृष्ण व्हायचं नाही, कृष्णमित्र व्हायचंय - पेंद्या, सुदामा, अर्जुन. तुला लेकरू व्हायचंय, पण मी सांगते तुला, उद्या हे जग तुला 'लेकरू' नाही म्हणणार 'माऊली' म्हणेल. तुला माऊलीच व्हायचंय जगाची. या जगाला तुला पुनर्जन्म द्यायचाय. इथे धर्माच्या नावाखाली भ्रष्टाचार करणारे आहेत - 'वरून कीर्तन, आतून कपट' अशी म्हणच आहे. त्यांची व्यंकटी तुला धड करायची आहे. तुला एकट्याला हे साधणारच नाही - ह्यांना कुठे साधलं ? तुला तुझ्यासारख्यांचे बोलके सागर, फिरती उपवनं तयार करावी लागतील.

मी फार दिवस तुला पुरणार नाही; पण फार दिवस आपला वियोगही होणार नाही. तू लवकरच माझ्याकडे येशील. तेव्हा मला 'आई' म्हणून हाक मारशील ? की तेव्हा तू इतका मोठा होशील की मलाच तुला 'माऊली' म्हणावं लागेल ? तेव्हा मला आशीर्वाद देशील की मलाच नमस्कार करशील ? आपण काय फक्त शरीरानं अस्तित्वात असतो ? आपण अस्तित्वात असतो संबंधानं. या उभ्या जगाशी तू संबंध जोडशील तेव्हा तू तिथेही असशील आणि माझ्याजवळही असशील.

तेव्हा तुला जनलोक 'संत' म्हणतील, 'योगी' म्हणतील, 'माऊली' म्हणतील; दिंडीपालखीतून, वाळवंटातून आणि गाभाऱ्यांतून तुझा जयघोष होईल तेव्हा इथे पाण्याखालून माझा शब्द तुला ऐकू येईल "माझं लेकरू !" जमिनीत खोल जायचं की पाण्यात खोल उतरायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं. ह्यांनी आणि मी गंगा-यमुनेत जायचं ठरविलं आहे. तिथली सरस्वती गुप्तपणे मी तुझ्याकडे धाडणार आहे. ती तू जनलोकात उजळ कर. असं बोल की त्यात ग्रामीण आणि नागर, दृष्टान्त आणि सिद्धांत असा भेदच राहू नये. बुत्ती तुला दीक्षा देईल. तो दिसतो साधा; पण फार खोल आहे ते पाणी. बुत्ती तुला सर्व देईल; पण तो श्रेय नाही घेणार. तू शब्दांनी बोलशील; तो तुलाच आपले माध्यम करील. जनलोकांना प्रश्न पडेल, हे शब्द कोणाचे ? तुमचे दोघांचेही नाहीत. ज्ञान काय कोणा एका व्यक्तीच्या मालकीचे असते ? ते तर स्वायत्त असते; फक्त ते याच्या-त्याच्या प्रज्ञेतून वाहत असते; होतं असं कधीकधी - वाहता वाहता कुठे कुठे ते गढूळ होतं, कुठे साकळतं. मग गुरूचं ज्ञानही शिष्याला शुद्ध करून घ्यावं लागतं.

असं पाहा, हे शहाणे मी वक्ता, तुम्ही श्रोता, तो गुरू, हा शिष्य, हे भारत, ही भगवद्गीता, ही संस्कृत, ती देशी अशी द्वैताची भाषा बोलतात. या कर्माला काय म्हणावं ? आचारातली विसंगती सहज लक्षात येते; विचारांतली विसंगती फार सूक्ष्म असते - ती अनुभूतीने दूर करावी लागते. तू बोलशील तेव्हा बोलण्याचे कर्मसुद्धा श्रोत्यांना अर्पण करू टाक; श्रेय बुत्तीला देऊन टाक. सर्वत्र शिवशक्तीच तर नटली आहे - उत्पत्तीपासून विलयापर्यंत. संस्कृत-देशी, गीता-भाष्य, गुरू-शिष्य, भक्त-भगवंत, वक्ता-श्रोता ही शिवशक्तीचीच तर रूपे आहेत. असं शिवशक्तीचं विलसित तू साकार करशील तेव्हा तूच कृष्ण असशील - तूच अर्जुन असशील, तूच 'तू' असशील - तूच 'मी' तेव्हा आपलं मायलेकराचं नातं शिवशक्तीचं नातं होऊन जाईल !

■■■

अनुक्रमणिका

भवताल :

।। पाब्लो नेरूदाच्या कविता ।।

[पाब्लो नेरूदा. जन्म - १९०४. भूप्रदेश - लॅटिन अमेरिका. देश -चिली. मूळ नाव - नेफ्ताली रेयास. स्पॅनिश भाषेतील नोबेल पारितोषिक विजेता कवी. भारताला भेटी दिल्या. अनेक देशांमध्ये राजदूत म्हणून काम पाहिले. व्यक्तित्वात आणि काव्यात रांगडेपणा. लढवय्या बाणा. कामगार आणि 'नाही रे' वर्गाच्या बाजूने कविता उभी केली. विलक्षण प्रतिमासृष्टी. १९७३ साली सी.आय.ए. च्या पाठिंब्याने जनरल पिनोचेत (जो नुकताच मरण पावला) याने लष्करी उठाव केला. लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या, नेरूदाचा मित्र चिलीचा अध्यक्ष ॲलेंदे आणि नेरूदा यांना गोळ्या घातल्या. 'मिगुअलला पत्र' - ही कविता नेरूदाने व्हेनेज्युलात राहणाऱ्या कलाकार मित्राला - मिगुअल ऑंतेरो सिल्वाला संबोधून लिहिली आहे. कवितेत - क्यूबाचा विख्यात कवी निकोलस गुलेन याचा उल्लेख आहे. 'मिगुअलला पत्र' या कवितेचा अनुवाद सविता जाजोदिया यांनी केला आहे. इतर कविता मिळविणे आणि त्यांचा अनुवाद याबाबतीत प्रा. अश्विनीकुमार विष्णू यांचे सहकार्य लाभले. - संपादक]

१. आठवण

आठवण, गव्हाच्या शेताच्या मध्यात
एक जांभळं झाड अफूचं
रेशमाहून खूप खूप रेशमी
आणि सर्पसुगंध असलेलं.
बाकी काय मग, चुरगळलेलं आणि
अस्ताव्यस्त
कापलेलं सोनेरी गव्हाचं रान.

मी त्या जाळ्यात गुरफटलो होतो
एकदा नाही अनेकदा,
थ्रेशरच्या बाजूला
एका जंगली सफरचंदासोबत
जे उलगडलं होतं रतिभावाने
आणि अचानक थ्रेशरनं
उडवलेल्या भुश्श्यामध्ये
भरून उरला दर्प
वीर्याचा आणि चंद्राचा.

२. मी परत येईन

केव्हातरी नंतर
पुरुष किंवा स्त्री वा प्रवासी कोणी -
इथे पहा, इथेच शोधा मला,
या पाषाणांच्या गर्दीत, समुद्रात,
फेसामध्ये,
उसळणाऱ्या प्रकाशात
इथे पहा, मला इथे शोधा
मी काहीही न बोलता
आवाज न करता, मुखविहीन, शुद्ध रूप असा
मी इथे येईन
इथे मी पुन्हा बनेन पाण्याचा,
त्याच्या उद्दाम हृदयाचा वेग.
इथेच मी हरवेनही, सापडेनही पुन्हा, असेन
इथे कदाचित पाषाणही आणि मौनही.

अनुक्रमणिका

3. शब्द

तो रक्तात जन्माला आला,
शब्द,
वाढला काळ्याकभिन्न शरीरात
धडका देत झेपावला
ओठांतून, मुखातून.

दूर आणि जवळ
आणखी जवळ तो येत राहिला
मृत पूर्वजांकडून,
भटक्या वंशावळीतून
आणि पाषाणांनी उभारलेल्या
प्रदेशातून,
जे प्रदेश थकून गेलेल्या
अभागी टोळ्यांमुळे;
कारण ज्यावेळी दु:ख उतरले
रस्त्यावर,
खेडीपाडी चालू लागली
आणि नवी पृथ्वी आणि पाणी
यांचा संयोग झाला पुन्हा
नव्याने स्वत:चे शब्द रूजविण्यासाठी.
आणि हा असा आहे वारसा
ही आहे हवा जी जोडते
मृत माणसे आणि अजून
जाग आली नाही अशा नव्या
जीवांच्या पहाटेला.

अजून थरथरतं वातावरण
भय आणि रूदन यांनी
भारलेल्या पहिल्या शब्दामुळे.
तो उगवला छायांमधून
पण अजून तरी कोणतेही गर्जन नाही
तरी झणत्कार निनादतो
त्या शब्दाचा जो
उच्चारला गेला पहिल्यांदा
कदाचित तो होता फक्त एक उसासा,
किंवा एक थेंब
आणि तरीही त्याचा घबघबा
कोसळतो आणि कोसळतोच आहे.

नंतर शब्द होतो अर्थसंपृक्त.
शब्दांना दिलं गर्भारपण
आणि भरून टाकलं जीवनांनी.
जन्म आणि आक्रंदन
होकार, स्पष्टता, बळ
नकार, विनाश, मृत्यू
क्रियापदांने धारण केल्या सर्व शक्ती
आणि अस्तित्व आणि जीवनसत्व
यांना एकजीव केले त्याने
एका विद्युतभारित सौंदर्यात.

शब्द, मानव, व्यंजना.
प्रकाशाची पृथुलता आणि घट्ट चांदी
वंशपरंपरेने लाभलेले पात्र
जे स्वीकारते रक्ताची संवादिता
इथेच सामावली शांतता
परिपूर्ण मानवी शब्दात
आणि न बोलणं म्हणजे तर
मरणं जीवंतांच्या मध्ये
केसांच्या मुळांपासून उसळते भाषा
तोंड बोलतं ओठांच्या हालचालीविना
आणि डोळेच अकस्मात बनतात शब्द.

मी शब्द घेतो आणि पडताळतो
जणू तो आहे परिपूर्ण मानवी आकार,
त्याच्या पोशाखाने मी होतो आनंदित.
आणि मी विहरतो भाषेच्या
प्रत्येक स्वरलहरीतून
मी उच्चारतो आणि मी येतो
भाषेविना
शब्दांची परिसीमा असलेल्या शांततेपर्यंत.

माझे पिणे, शब्दांच्या नावाने
एक शब्द मी उचलतो किंवा
काचेचा भरला चषक,

आणि मी पितो भाषेची मदिरा
किंवा अपार जलसंसार
किंवा मातृरूप झरा शब्दांचा
आणि ग्लास आणि पाणी आणि मद्य
मिळून जन्माला घालतात माझे गाणे
कारण क्रियापद हेच असतं मूळ
आणि जगण्याची धारा
ते असतं रक्त,
रक्त जे व्यक्त करतं त्याचा गुण
आणि असतं तत्पर वाहण्यासाठी
देत राहतं स्फटिकाला स्फटिकपण,
रक्ताला रक्तपण
आणि जीवनाला जीवंतपण,
देतात शब्द.

४. मिगुअलच्या नावाचे एक पत्र

(नेरूदाच्या एका प्रदीर्घ कवितेचा प्रारंभिक भाग.)

निकोलस गुलेनच्या हाती मिळालं तुझं पत्र
अदृश्य रूपाने त्याच्या कपड्यांवर,
त्याच्या डोळ्यांत लिहिलेलं.
किती खूष आहेस तू, मिगुअल,
किती खूष आहोत आपण दोघे !
एका अशा जगात,
जी बहुतांशी कुजलेल्या गिलाव्याने झाकली आहे
निरुद्देश्य कुणी प्रसन्न नाही,
पण आपण आहोत.
मी कावळ्याला उडताना पाहतो
त्याच्यात असं काही नाही
ज्याने मला तो
अपाय करू शकेल.
विंचवाप्रति जागरूक रहा
तू आपल्या गिटारला पॉलिश करतोस.
कविता लिहिताना आम्ही
रानटी प्राण्यांच्या मध्ये राहतो,
आणि जेव्हा आम्ही माणसाला स्पर्श करतो
शिळ्या भाकरीसारखे
त्याचे तुकडे-तुकडे होतात.
तुला, व्हेनेज्युलात तुला जन्मापासून अधिकार आहे
त्या सर्वाला एकत्र करायचा
ज्याला वाचवणं शक्य आहे
मी मात्र जीवनाच्या फुललेल्या निखाऱ्यांना
चहूबाजूंनी आपल्या हातांनी
घेरून ठेवतो.
किती आनंद आहे मिगुअल !
तू विचारतोस की मी कुठे आहे ?
मी सांगीन तुला.
पण फक्त राज्यांचा आवश्यक तपशील देत,
हाच की,
उंच सुळक्यांनी भेदलेल्या छेदलेल्या या समुद्रतटावर
सागर आणि शेतं निकट येतात
निकट येतात -
लाटा आणि देवदार वृक्ष,
समुद्री कावळे आणि घारी,
गवताळ जमीन आणि फेन.
तू कधी एक संपूर्ण दिवस
सागरी पक्ष्यांच्या सहवासात
हे पहात घालवला आहेस
की ते कसे उडतात ?

ते असे उडतात
जणू साऱ्या जगाची पत्रं
ईप्सित जागी नेत आहेत.
पेलिकन असे उडतात
जणू वाऱ्याची जहाजं आहेत.
आणि दुसरे पक्षी उडतात
सुसाट तीरांसारखे,

इंडियन तटांवर नीलमण्यांच्या पापुद्र्यांसवे पुरलेल्या
व्हॉईसरॉय आणि मृत सम्राटांचे
संदेश घेऊन जाताना;
आणि सामुद्री इतके शुभ्र पांढरे की
सतत विसरत राहतात
त्यांचे निरोप. -
मिगुअल, आयुष्य आकाशासारखं वाटतं

जेव्हा आम्ही
प्रेम आणि युद्ध करीत असतो,
शब्द, जे भाकरी आणि दारू आहेत
अजून अवमूल्यित झाले नाहीत
कारण रस्त्यांवर भटकताना आमच्यापाशी
बंदूक आणि कविता
बरोबरच असतात.
मिगुअल, त्यांना ठाऊक नाही
आमचं काय करायला हवं,
मारायच्या खेरीज त्यांना आणखी काय करता येणार
आहे ?
आणि तो देखील एक चांगला सौदा होणार नाहीत-
ते काहीसुद्धा करू शकत नाही,
फक्त रस्त्यापलीकडे तिकडे
भाड्यानं एक खोली घेऊन
आमच्या मागं लागतील,
म्हणजे मग आमच्यासारखं हसणं आणि किंचाळणं
त्यांना शिकता येईल.
मी जेव्हा प्रेम कविता लिहीत होतो,
ज्या सर्व बाजूंनी माझ्या आतुन उत्स्फूर्त झाल्या,
आणि विषादाने मरत होतो
भटक्या, निर्लज्ज शब्दांना कुरतडत,
त्यांनी मला म्हटले,
'किती मोठा माणूस आहेस तू, थियोक्रायटिस !'
मी थियोक्रायटिस नाही,
मी जीवन जगलो आहे,
त्याचं चुंबन घेतलं आहे,
आणि तेव्हा खाणींच्या भुयारातून गेलो आहे
हे पाहण्यासाठी की दुसरे लोक कसे रहातात
आणि जेव्हा बाहेर आलो
माझे हात
घाणीनं आणि औदासिन्यानं बरबटलेले होते.
मी आपले हात उंचावून जनरलांना दाखवले,
आणि म्हटले,
'या अपराधाचा मी भागीदार नव्हे.'
प्रतिक्रियेत त्यांनी खोकायला सुरुवात केली
तिरस्कार दाखवला
'हॅलो' म्हणायचं सोडून दिलं
आणि थियोक्रायटिसच्या नावानं मला
पुकारायचं थांबवलं.
मग सारं संपवलं
माझा अपमान करून
आणि सारं पोलिस दल
मला पकडण्यासाठी तैनात करून.
कारण ईश्वर आणि ब्रह्म या विषयांशी फक्त
निगडित राहणं
मी चालू ठेवलं नाही.

(या कवितेचा अनुवाद - सविता जाजोदिया)

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. 'युगवाणी' हे त्रैमासिक स्वरूपात निघणार असून जुलै २००६ ते जून २००७ या वर्षातील चार अंकांची वर्गणी १०० रु. आहे.
३. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
४. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
५. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
६. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
पत्ता १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२.

अनुक्रमणिका

॥ येथून पुढे ॥
आदिवासी कवितेचा महत्वाचा टप्पा

नामदेव चं. कांबळे

आदिवासी ही आदिम वन्य जमात. त्या अर्थाने ती देशाची मूळ निवासी असतानाही आदिवासींचे नामांतर, आधी वनवासी व नंतर विमुक्त जाती असे करण्यात आले. हे त्यांचे 'एलिनेशन' ह्या एलिनेशनमुळे हा मानवी समूह प्रस्थापित समाजापासून भावनिक आणि लौकिक दृष्ट्या दुरावला. बंधुत्वाला मुकला. माणूसपणाला पारखा झाला. आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित झाला. ही वंचना त्याने स्वतःहून ओढवून घेतली नाही तर प्रस्थापित समाजाने त्याचेवर ती लादली.

वेळोवेळी आदिवासींचे हे दुःख कवितांमधून व्यक्त झाले आहे. अलीकडेच प्रभू राजगडकर यांचा 'येथून पुढे हा कवितासंग्रह आला. तो आदिवासींचे एलिनेशन, त्यातून त्यांचे वाट्याला आलेले वर्तमान जीवन, त्या जीवनाबद्दलची चीड, पूर्वापार शोषणाविरुद्धची युद्धमनस्कता व्यक्त करतो.

काळ बदलला की जीवनाचे आयाम बदलतात. पूर्वापार समस्यांमध्ये भर पडते. मूलभूत गरजांसह अन्य गरजा निर्माण होतात. मूळ प्रश्नांना फाटे फुटून प्रश्नांचे जाळे निर्माण होते. या सगळ्या गोष्टींना कवी, कलावंत आपापल्या परीने भिडत असतात. वाहरू सोनवणेचा १९८७ चा काळ, भुजंग मेश्रामचा १९९० चा काळ आणि प्रभू राजगडकरांचा २००६ चा काळ त्यामुळेच सारखा असू शकत नाही. तत्कालीन आदिवासींचे जीवन, प्रश्न, समस्याही सारख्या असू शकत नाहीत. आदिवासी कलावंत तत्कालीन प्रश्न, समस्यांना भिडले. आपापल्या परीने त्यांनी आदिवासी जीवन वाचकसंमुख केले. कवितेपुरता विचार करायचा झाला तर मला तरी वाहरू सोनवणेनंतर भुजंग मेश्राम आणि अलीकडे प्रभू राजगडकर यांचाच विचार करावासा वाटतो. कारण 'येथून पुढे' हा कवितासंग्रह मला 'गोधडं', 'ऊलगुलान'चा पुढचा व महत्त्वाचा टप्पा वाटतो.

दऱ्याखोऱ्यात राहणारा, वनउपजांवर उदरनिर्वाह करणारा आदिवासी जगण्यासाठी भटकंती करतो आहे. कारण एका ठिकाणी राहून उदरनिर्वाह भागणार नाही. मग आपल्या कच्च्या बच्च्यांचे काय असे दडपण त्यांचेवर आहे. या भटकंतीमध्येही तो माणुसकी जपून आहे.

स्थितीतून स्थित्यंतर व्हावे अशी भावना राजगडकर व्यक्त करतात. आदिवासी संस्कृती चवीने चघळण्याचा विषय, तर त्यांचे जीवन चर्वितचर्वणाचा विषय झाल्याचे आपण पाहतो आहो.

आदिवासींच्या दुःखाची ओळखदेख नसलेला प्रस्थापित समाज त्यांचेच दुःख त्यांना सांगत आला आहे. आदिवासी बोलायला लागतो तेव्हा 'अरे, दुःखाचा स्तर असाही असतो तर !' असे आश्चर्य व्यक्त करीत ऐकत असतो. त्यामुळेच विचारांची फक्त देवाणघेवाण होते; पण आदिवासींच्या दुःखाचे परिमार्जन केल्याच जात नाही. असे राजगडकर आपले मत नोंदवितात. वाहरू सोनवणे 'चळवळ म्हणजे' या कवितेतून -

अनुक्रमणिका

चळवळ म्हणजे काही
दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे
की नदीला आलेला पूर नव्हे !
चळवळ म्हणजे माणूसकीचा गाभा
सतत विकसित होत जाणारा प्रवाह

असे चळवळीचे वेगळेपण सांगतात तर प्रभू राजगडकर -

आणि काजळलेल्या रात्रीची
भयावहताही प्रवृत्त करते
एका उठावासाठी

- अशी चळवळीची प्रवृत्ती आणि उद्देश स्पष्ट करतात. एकीकडे सरकारचे जाचक कायदे, दुसरीकडे आदिवासींचा कळवळा असल्याचा आव आणीत विस्फोटक होत जाणारा नक्षलवाद, तिसरीकडे पोलिसांची आदिवासींकडे पाहण्याची संशयी दृष्टी अशी भयावह परिस्थिती असतांना, त्यात हा आदिम मानवी समूह दबून पिचून जात असताना, तो कधी तरी संघर्षावर उतरणार हे खरे तर फार पूर्वी प्रस्थापित वर्गाच्या आणि सरकारच्याही लक्षात यायला हवे होते. पण नाहीच आले. त्यामुळेच-

आगीत चालत जावं लागेल
चालत जावा
सूं सूं गोळ्या सुटल्या तरी
रक्ताचा झेंडा फडकवत जावा

अशी आदिवासींची प्रातिनिधिक चीड वाहरू सोनवणे यांना व्यक्त करावी लागली. आदिवासींनी पुकारलेल्या संघर्षाची ती नांदी होती.

व्यापाराच्या उद्देशाने अगर भूमीच्या अभिलाषेने माणसांनी वनांचा नाश केला. सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले. याची जाणीव होताच सामाजिक वनीकरण निघाले. 'एक मूल एक झाड', 'मानव बचाव, जंगल बचाव' अशा घोषणा आल्या.

प्रत्येकांनी छातीवर स्टीकर लावून
चौकाचौकात सभा घेतल्या, घोषणा दिल्या.
'मानव बचाव, जंगल बचाव.'
शहराच्या चौकात जमा झालेली निसर्गप्रेमी
माणसं तणावग्रस्त ३७ कलम सारखे सभेतून चालते
झाले. मग प्रत्येकाने एकेक झाड आणले नर्सरीतून,
'मानव बचाव, जंगल बचाव' म्हणत रोपण केले.

अशी अंमलबजावणीही झाली. (येथून पुढे ४०) त्यांचे हे कृत्य मानभावीपणाचे असल्याची कवीची फक्त धारणाच नाही तर तो त्याचा विश्वास आहे. त्यामुळेच आजच्या माणसांची जंगलाविषयीची कणव कवीला 'सौ चुहे खाके बिल्ली हजको चली !' अशी मानभावीपणाचीच वाटते.

आदिवासींची वस्ती म्हणजे पाडा. अनेक पाड्यांचे मिळून गाव होते. पाडा असो अगर गाव असो तेथील लोकांच्या प्राथमिक गरजा म्हणजे निवारा, पाणी, रस्ते, रोजगार व औषधोपचार.

नंतरच्या गरजांविषयी न बोललेलेच बरे. दळणवळणासाठी रस्ते नाहीत. पोटापाण्याचा रोजगार नाही. नदीकाठी राहूनही नदीला पाणी नाही. अशी आदिवासींची खेडी. त्यामुळेच -

आता मी पाहू इच्छित नाही
एक उध्वस्त खेडे भावनांचे

अशी चीड राजगडकर व्यक्त करतात. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेत, त्यांचे दैन्य दूर करण्याचा आव आणीत प्रस्थापित समाजातील माणसे आपले संख्याबळ वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात.

ढोंगी लोकांचे ढोंग उघडे करीत आपल्या समाजाला
आता तरी तुला निघायलाच पाहिजे ह्या कोषातून.
तुझ्यातून सरकारी, स्वयंसेवी
तथाकथित मानवतावादी खूप खूप प्रयोग झाले
आणि तरीही तू मात्र तिथेच ?

असा सावधगिरीचा इशारा प्रभू राजगडकर देतात.
भुजंग मेश्राम यांनी

उद्याच्या एकात्म गणसमाजासाठी
मी करतोय अंधाराशी शय्यासोबत

- ही नवव्या दशकातील आदिवासींची भावना व्यक्त केली होती. आज आदिवासी हा मिशनरी, सर्वोदयी, साम्यवादी, हिंदुत्ववादी यांच्या दावणीला बांधून घ्यायला तयार नाही. कारण त्याला त्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव झाली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे उलटून गेलीत. तरीही

स्वातंत्र्याची पहाट आदिवासींसाठी उगवलीच नाही. त्याचा उपभोग घेणे तर फार दूरची गोष्ट. ही बाब आदिवासींना बोचते आहे. म्हणूनच राजगडकर म्हणतात -

आम्ही आता किती सहन करावे
असे बाजारात बसणे.
आता आम्ही शोधतो स्वतंत्र अस्तित्व
आम्ही कशा कराव्यात गप्पा दुसऱ्या तिसऱ्या स्वातंत्र्याच्या
जेव्हा अद्याप शोधतो आम्ही पहिले स्वातंत्र्य.

भुजंग मेश्रामांच्या 'ऊलगुलान' मध्ये इंद्रावतीचा उल्लेख येतो. प्रभू राजगडकरांच्या 'येथून पुढे' मध्येही इंद्रावती येते. आदिवासींच्या जीवनात इंद्रावतीचे असे अनन्यसाधारण स्थान आहे. ती त्यांची जीवनदायिनी आहे आणि सांस्कृतिक धरोधरही आहे. इंद्रावती त्यांची जीवनभाषा आहे आणि त्यांच्या दुःखाचा वेदही आहे. इंद्रावती महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भाच्या टोकावरून वाहते. छत्तीसगड, ओरिसा अशी वाहत जाते व गोदावरी नदीला मिळते. तिच्या कडेकडेने गोंड, माडिया, भिल्ल व इतर आदिवासी राहतात. प्रदेशभिन्नतेमुळे त्यांची संस्कृती थोडीफार वेगळीवेगळी असेल पण त्यांचे दुःख-दैन्य, शोषण-वंचना, समस्या-प्रश्न सारखेच आहेत.

तू म्हणजे संस्था, तत्त्वज्ञान
'तू' पण कधी बघितलं नाही मी तुझ्यात
ह्या माणसांच्या जंगलात

- अशी साम्यवाद्यांविषयी राजगडकर कृतज्ञता व्यक्त करतात. साम्यवाद्यांच्या कामगारप्रेमातून आणि वनक्षेत्रात होणाऱ्या कामगारांच्या शोषणातून नक्षलवाद निर्माण झाला. आधी भला वाटणारा हा मानवी समूह नंतरच्या काळात कसा माणूस भक्षक झाला हे आपण पाहतोच. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा', हा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना दिला. ते शिकले. संघटित झाले. संघर्षही करू लागले. त्यांचे पाहून आदिवासीही शिक्षणाकडे ओढला गेला. अज्ञान, दारिद्र्य, वंचना, शोषण यांच्या चरकात पिळला जात असूनही आदिवासी तरूण शिकू लागला आणि -

अध्याय सुरू होताना नव्या संघर्षाचा
सोबत होते रात्रीला शब्द आपले
म्हणून सामील झालो संगरात
आता सर्व काही बदलले
संदर्भही वाकविले गेले
जेथे माणसच वाकतात वेतासारखी.

'निमित्त - डॉ. बाबासाहेब आंबेडकर' - या कवितेत कवी असा अनुभव मांडतो. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर दलितांमधला एकोपा भंगला. आदिवासीही दुभंगला. त्याचेच फलित म्हणून आदिवासी माणूस, समाजकल्याण मंत्री असतानाही चिरडलाही गेला. नेते समाजापेक्षा स्वतःला मोठे समजू लागल्यावर आणि माणसे वेतासारखी वाकू लागल्यावर यापेक्षा वेगळे काय घडणार !

आफ्रिकेतला निग्रो काळा. वर्गसंघर्षाचा बळी. आर्थिक विषमतेने बाधित. त्यांचा नेता नेल्सन मंडेला तुरुंगातून सुटणार हे कळताच राजगडकरांना कोण आनंद होतो ! स्वाभाविकही असते ते. मंडेला दुःखी - वंचितांचा, अज्ञानी - गरीबांचा वाली. आदिवासींचीही परिस्थिती निग्रोंपेक्षा फार वेगळी नाही. निग्रो गोऱ्यांच्या दृष्टीने उपेक्षित; तर आदिवासी प्रस्थापित समाजाकडून दुर्लक्षित; दोघांतही अज्ञान, दुःख, दारिद्र्य. दोघांचीही वंचना. दोघांचेही शोषण ! शिवाय म. गांधींच्या निग्रोंच्या आंदोलनातील नेतृत्वातून त्यांची व भारतीयांची नाळ जुळलेली. नेल्सन मंडेलाच्या मुक्ततेची प्रकाशकिरणे भारतातील वनप्रदेशात पडतील. आदिवासींना अंगभर कपडा मिळेल असा आशावाद राजगडकर 'नेल्सन मंडेला' या कवितेत व्यक्त करतात. आदिवासींचे नेतृत्व करण्याची गळही मंडेलाला घालतात.

आदिवासी जीवनात अज्ञान, भूक यांचा अंधार असला तरी त्यालाही आनंदाची किनार असते. म्हणूनच -

...सर्वच रात्री भयाण असतात असे नाही.

- अशी ग्वाही राजगडकर देतात. 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' हे संत तुकारांचे कवन त्यांना आठवत असावे. किंवा आदिवासींची आनंद शोधण्याची साधने - गाणी, नृत्य, वाद्य तरी त्यांना

आठवत असावीत. गाणी, नृत्य, वादन हे तर आदिवासी जीवनाचाच भाग आहेत. तुकारामांचा गौरव करतांना ते म्हणतात

तुकाराम ते एक जडत्व
सारं अध्यात्म झूठ की बरोबर
असू दे चर्चा सुरू
पण तुझ्यासारखा अंगार मला नाही आढळला कुठे

भुजंग मेश्राम यांना, आदिवासींना आलेले आत्मभान ही त्यांच्या अंतर्बाह्य बदलाची शोधयात्रा वाटते; तर प्रभू राजगडकर यांना बदलासोबत इतिहासाची आठवणही ताजी ठेवावीशी वाटते. आदिवासींनी आत्मसंशोधन करावे, आपली आजची परिस्थिती काय आहे, त्याचे कारण कोणते आहे, ह्या परिस्थितीचे फलित काय असू शकेल आणि या सगळ्यांमध्ये आपली भूमिका काय आहे याचा शोध घेणे म्हणजे आत्मसंशोधन करणे. स्वतःचेच 'उत्खनन' करताना इतिहासाचीही आठवण असू द्यावी असे ते म्हणतात. कारण भूतकाळ, वर्तमानातील दुःख, दैन्य, शोषणाविरुद्ध चीड निर्माण करीत असतो. वर्तमान काळ परिस्थितीशी दोन हात करायला शिकवितो. आणि भविष्य घडविण्याची दृष्टीही देत असतो.

भूक मोठी की अन्नाची चव मोठी ? असा कळीचा प्रश्न कवी 'राष्ट्रपिता बापू'ला विचारतो. म. गांधींनी मिठाचा सत्याग्रह करून भारतीयांच्या चवीचा प्रश्न सोडविला. पण असंख्य भारतीयांचा, त्यातल्या त्यात आदिवासींचा भुकेचा प्रश्न अद्याप अनुत्तरितच राहिला, याची जाणीव म. गांधींना करवून देत कवी म्हणतो -

मूठभर मीठ उचललेस प्रतीक म्हणून
इथे चिमूटभर अन्नासाठी किती दिशा ?
आज असतास तर कळले असते
तू जागवलेल्या माणसाचं जग आणि
तूही नव्या दृष्टीनं पाहू लागला असता आणि मग
मूठभर मिठाऐवजी ढिगभर माणसं जमवून दिली
असती धडक कुलुपबंद गोदामावर.

भूक आदिम असूनही तीच नेमकी म. गांधींनी दुर्लक्षिली असा ठपकाही त्यांच्यावर ठेवतो.

'आपण गावावरचा अंधार दूर करू या !'

ही भावना म्हाताऱ्या आदिवासी स्त्रीचीच नाही तर ती समस्त आदिवासींची आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक अंधारात; दुःख, दैन्य, अंधश्रद्धांच्या काळोखात चाचपडणाऱ्या आदिवासींना तो संपावा असे फक्त वाटतच नाही तर अंधार संपावा म्हणून आपणच काही तरी केले पाहिजे असेही वाटते.

विपरीत परिस्थितीमध्ये सुद्धा माणूसपणाची, विश्व-बंधुत्वाची भावना त्याच्या मनात शाबूत आहे.

वाहरू सोनवणेंच्या 'गोधडं' मधील कविता, भुजंग मेश्रामांच्या 'ऊलगुलान'मधील कविता, निखळ आदिवासी जाणिवेच्या कविता असून, 'येथून पुढे'मध्ये आदिवासी जीवनजाणिवांसह कवीची मध्यमवर्गीय मानसिकताही पाहायला मिळते. त्या मध्यमवर्गीय जाणिवांच्या कविता टाळून निखळ आदिवासी कवितांचा समावेश असलेला 'येथून पुढे' आला असता तर कविता संग्रहाचे मूल्य आहे त्यापेक्षा वाढले असते हे निश्चित.

प्रभू राजगडकर रानावनाशी संबंध विरळ झालेला, शहरात रमलेला कवी असून शहरी वातावरणात रूळल्याने त्यांचे ठिकाणी मध्यम वर्गीय भावभावनांचा, क्रिया प्रतिक्रियांचा शिरकाव झाला. त्यानेच -

आम्ही मणिबेली दंडकारण्यात
कुजत राहावे
आम्ही त्यांच्या सिद्धांताचे हत्यार व्हावे,
त्यांनी संस्थांची संस्थाने करून
सुखासीन जगावे
ही कोणत्या गणिताची रीत !

अशी त्यांची मध्यमवर्गीय राग-संतापाची भावना व्यक्त होते. कवितासंग्रह वाचतानाही त्यांनी केलेली निभर्त्सना, दिलेला नकार, केलेला विद्राह संयमित स्वरूपातच भेटतो. दलित साहित्यातील स्थित्यंतरासारखेच हे आदिवासी कवितेचे स्थित्यंतर मानावे लागेल.

■ ■ ■

['येथून पुढे - प्रभू राजगडकर. प्रकाशक : जागरूक प्रकाशन, चंद्रपूर. किं. - ५० रु. प्रथम आवृती जानेवारी २००६]

जाणिवांचे पात्र रूंद केले आहे. जसे आरंभीच अंकात 'शंकर पळशीकर' या जिनिअस आणि प्रतिभाशाली, भारतीय स्तरावर नोंद कमवलेल्या थोर चित्रकाराची ओळख दिलेली आहे. अलीकडे ही दृष्टी "मौज" वगळता इतर कुणाकडे विरळच दिसते. 'युगवाणी'चे हे पहिले रंगीत 'पान' सुद्धा प्रगल्भ व कष्टपूर्वक आणलेले आहे. शिवाय 'भवताल' मधून चंद्रकांत देवताले यांच्या कविता (अनुवाद डॉ. चंद्रकांत पाटील) दिल्या आहेत. अनुभवांची लोकविलक्षणता आणि जाणिवांमधून उमटणारे बदलांचे प्रतिबिंब - यादृष्टीने अनुवादित कवितांचे वैश्विक मूल्य महत्त्वाचे आहे. (आत्मप्रसन्न, उथळ, सुमार नव्या कवींना सूज्ञपणाचे नवे भान शिकवण्याची क्षमता या अनुवादात साठवलेली आहे.)

(३) 'युगवाणी'च्या प्रत्येक अंकात काही पाने अनुवाद, भाषांतर यांना वाहिलेली असतील." भारतीय आणि जागतिक भाषांमधील काही साहित्यप्रकारांचे अनुवाद देण्यामागील हेतू संपादकीयात नमूद केला आहे.

यातून, 'युगवाणी'चे व्रत आणि 'युगवाणी'ची वाङ्मयीन भाषिक बांधिलकी दृक्‌गोचर होते. जगात काय सुरू आहे, हे सर्जकप्रक्रियेत प्रविष्ट असणाऱ्यांना कळून घेता यायलाच पाहिजे. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, मॅकमिलन अथवा अवघ्या देशाच्या स्तरावरून पुष्कळ प्रतिभात्मक वाङ्मय, भाषा, जाणिवा, शैली, प्रवाह, अनुभव या वेगवेगळ्या प्रकारांमधून पुष्कळ नवे मांडले जाते आहे. असे एक व्यापक 'व्हिजन' 'युगवाणी'ने स्वीकारले आहे; याचा फार आनंद झाला. त्यामुळे, एक उत्तम झाले की केवळ "मराठी-मराठी" एवढाच एक ध्वनी अंगिकारून 'युगवाणी' दाखल होण्यापेक्षा "वैश्विकता" ही तिची धारणा भाषा, वाङ्मयाच्या दृष्टीने फार निरामय ठरणार आहे.

(४) 'नोंदी' मधून 'कथात्मसाहित्य' यावर श्याम मनोहर यांचे छापलेले टिपण लेखक म्हणून प्रत्येकासाठी साधना म्हणून आणि लेखकाने किती खोल स्वत:त उतरून तळठाव शोधावा; यादृष्टीने अभ्यासनीय आहे. (अशी विलक्षण ऊर्जा असणारी महत्त्वाची भाषणे "युगवाणी' ने निरंतर छापावीत, अशी विनंती)

(५) गो. पु. देशपांडे, वसंत आबाजी डहाके या दोन महत्त्वपूर्ण चिंतकांचे दोन्ही लेख निश्चित, पायाभूत भूमिकांवर उभे असणारे असून, साहित्याच्या बाहेर जाऊन संस्कृती, चळवळ, प्रदेश, भाषा, आंदोलनं यांचाही एक अमीट ठसा लेखक व कलाकृतींवर हमखास उमटतो. यादृष्टीने, संशोधनप्रधान हे दोन्ही लेख जतन करून ठेवावे असे ठरतात.

(६) अंकामध्ये अनंत अमदाबादकर, सुखदेव ढाणके, अजिम नवाज राही यांच्या कवितांचा समावेश आहे. शिवाय, दिवाकर कृष्ण आचार्य यांची दीर्घकथा, ग्रंथपरीक्षणे भा. ल. भोळे, रमेश अंधारे यांची आहेत. विविधता, संतुलन आणि वेगळेपणाचा चिंतनशील वेध याचे स्पष्ट दर्शन उपरोक्त मजकूरामधून होते.

'ॲसिडिटी'सारखे कुणी स्पर्श न केलेले विषयक्षेत्र कवी राही यांनी कवितेसाठी निवडून एक अलग अनुभव कवितेतून मांडला; तो नवा आणि वेगळा ठरावा. ढाणक्यांच्या कविता आणि काही अभंगांमधून मनस्वीपणाने घेतलेला "मनशोध" प्रत्ययकारी अशा स्वरूपाचा आहे. अमदाबादकरांची कविता एकदम नूतन व तिच्या प्रतिमाप्रचितीमुळे लक्षवेधी ठरू शकते.

मुळातच, "सूर्याखालच्या आणि सूर्यापलीकडच्याही ज्ञात-अज्ञात विश्वाचे अपरिचित कंगोरे" 'युगवाणी' मधून ठसठशीत उमटावेत, ही संपादकांची धारणा जशी महत्त्वपूर्ण आहे; तद्वतच ती पुढल्या अंकांचे रूप आणि अंकांचा पोत सांगणारी म्हणूनही अत्यंत महत्त्वाची आहे.

अलीकडे सांगोपांग समीक्षा अभ्यासायला मिळण्याविषयीचे दारिद्र्य वाढत चाललेले आहे. संगीत आणि चित्रकलेकडे निरामय पहाणारे डोळे संपुष्टात येतात की काय, अशी भीती वर्धित होऊ लागलेली आहे. संशोधनाचेही असेच होऊन बसले आहे. संशोधनामागील गांभीर्य आणि त्यास संलग्न असणारे

'इंटरप्रिटेशन' उरलेले नाही. अनुवादासंबंधीचाही वाढता आळस मराठी भाषा, वाङ्मयाच्या निरामयतेसाठी उपकारक नाही. कविता - जगण्यापासून वास्तवापासून गंभीरता गमावून बसून ती शब्दसंभ्रमाच्या गदारोळात सापडली आहे. कवितेच्या संदर्भात उथळपणाने विचार केला जाऊ लागला; स्वस्त मुबलक कविता पाहताना असे जाणवू लागले. अशा परिस्थितीमध्ये पहिल्याच अंकापासून 'युगवाणी'ने संशोधनाची महत्ता समजून घेतली. चित्रकला या फार महत्त्वाच्या कला-क्षेत्राबद्दल आत्मीयता व वजन समजून घेतले. कवितेत वेगळे कुठे काय उमटतेय; याचा शोध 'युगवाणी' घेत आहे. वैचारिकता आणि साहित्य, संस्कृती आणि वाङ्मय, चळवळ आणि लेखक यांचा चिंतनशील समन्वय 'युगवाणी'ने या अंकात सुंदर राखलेला आहे.

शुद्धलेखनाकडे लक्ष देऊन भाषाशुद्धतेची आणि लेखनशुद्धतेची कास धरावी अशी 'युगवाणी'ने पृष्ठ कम्रांक ९६ वर 'लेखकांसाठी सूचना' मध्ये नमूद केलेली भूमिका तेवढीच मूल्यगर्भ ठरावी.

"एखादी वाङ्मयपत्रिका ही फक्त चालवणाऱ्यांची जहांगिरी नव्हे तर ती पत्रिका, वाचनसंस्कृती आणि प्रतिभावंत-प्रज्ञावंत यांची सामाजिक : सांस्कृतिक संपत्ती आहे" हे जाणवावे; इतके निर्मळ धोरण 'युगवाणी'च्या पानोपानी दिसते.

स्वच्छ अंतःकरणाने भाषेबद्दल, वाङ्मयाबद्दल, संस्कृतीबद्दल तमाम दुनियेच्या 'दृष्टी'तून आपण विचार आणि चर्चा करावयास शिकलो पाहिजे; असे अप्रतिम ईप्सित 'युगवाणी'ने स्वीकारलेले दिसते. हे छान व महत्त्वाचेच !

- केशव सखाराम देशमुख

युगवाणीचा नवा पर्व अंक मिळाला. अंक देखणा आणि चांगला झाला आहे. शुभेच्छा !

- सतीश काळसेकर

॥ साभार पोच ॥

(१) निरिच्छ नभ (कवितासंग्रह) - विनायक त्र्यं. पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर-४१३७०९ मूल्य ७० रु.

(२) गावाच्या आकाभोवती (कवितासंग्रह) - प्रकाश किनगावकर, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., भुलाभाई देसाई रोड, मुंबई-४०००२६ मूल्य १२० रुपये

(३) पाढा (कवितासंग्रह) - केशव सखाराम देशमुख, साक्षात प्रकाशन, सी-४, भगीरथ एनक्लेव्ह, गारखेडा, औरंगाबाद-४३१००५ मूल्य १०० रुपये

(४) संध्याछायेच्या प्रकाशात - सौ. इंद्रायणी बोधनकर, इसाप प्रकाशन, १९०, सहयोगनगर, नांदेड मूल्य १२० रुपये

(५) पर्जन्यास - डॉ. उर्मिला चाकूरकर, संवेदना प्रकाशन, बी १५, सुखकर्ता, चिंचवड गाव, पुणे-४११०३३ मूल्य ६० रुपये

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
॥ कार्यवृत्त ॥
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २००६

५ जुलै विदर्भ साहित्य संघ व हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वोदय आश्रम, विनोबा विचार केंद्र येथे स्व. श्रीमती वृंदा दत्तात्रय मुनशी यांच्या 'पैंजण पाऊल' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले.

२१ जुलै - भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार लोकमान्य टिळक यांच्या १५० व्या स्मृती जयंती वर्ष समारोपाच्या निमित्ताने 'लोकमान्यांचे नेतृत्त्व' या विषयावर माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांचे व्याख्यान विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात झाले.

५ ऑगस्ट - विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांचा 'सई' हा दीर्घ सांगीतिक काव्यवाचनाचा कार्यक्रम सांस्कृतिक संकुलात संपन्न झाला.

१६ ऑगस्ट - डॉ. सीमा साखरे यांच्या 'अल्बम' या स्त्रीवादी कविता संग्रहाचे प्रकाशन विदर्भ साहित्य संघ व सीमा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने झाले.

१९ ऑगस्ट - विदर्भ साहित्य संघ व मार्कंडेय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. विजय यंगलवार यांच्या 'पद्मशाली यशोगाथा' या ग्रंथाचे प्रकाशन सांस्कृतिक संकुलात झाले.

९ सप्टेंबर विदर्भ साहित्य संघातर्फे विदर्भस्तरीय उ. रा. गिरी स्मृती काव्यस्पर्धा व शिवा राऊत स्मृती कविसंमेलन विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात आयोजित करण्यात आले.

१० सप्टेंबर - विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र 'युगवाणी' या नियतकालिकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध नाट्य लेखक प्रा. महेश एलकुंचवार यांच्या हस्ते साहित्य संघाच्या सांस्कृतिक संकुलात झाले.

२००१-२००६ या कार्यकाळातील हा पहिला अंक होय.

२६ ऑक्टोबर - विदर्भ साहित्य संघ व मंगेश प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. विनय वाईकर यांच्या 'लोखंडी पूल' या कथा संग्रहाचे प्रकाशन सर्वोदय आश्रम, विनोबा विचार केंद्र या स्थळी संपन्न झाले.

शाखावृत -

अकोला

१६ जुलै श्री. सुरेश पाचकवडे यांच्या 'गोंदणवेणा' या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले अध्यक्षस्थानी प्रा. नारायण कुळकर्णी-कवठेकर होते. प्रकाशन डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते झाले.

२० सप्टेंबर - विदर्भ साहित्य संघ अकोला शाखा व न्यू इंग्लिश हायस्कूल अमृत महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्व. उ. रा. गिरी स्मृती बालकवी संमेलन' आयोजित करण्यात आले. ३५ बालकवींचा या संमेलनात सहभाग होता. प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती रमणा जोशी होत्या. तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वि. ज. क्षीरसागर होते.

लाखनी

६ ऑक्टोबर विदर्भ साहित्य संघाच्या लाखनी शाखेचा २९ वा वर्धापन दिन दि. ६ ऑक्टोबर २००६ रोजी संपन्न झाला. अध्यक्षस्थानी कवी हिरामण लांजे हे होते.

■ ■ ■



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका